

# मॉडर्न





क्रिडा संघटना १९८५-८६



कला मंडळ १९

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

मॉडर्न महाविद्यालय पुणे ५.

# मॉडर्न

# १९८५-८६

## संपादन समिती

अध्यक्ष :

प्राचार्य : स. य. गंभीर.

समिति सदस्य :

प्रा. व. य. भिडये
प्रा. सुलभा देऊस्कर
प्रा. सुरेखा परब
प्रा. बा. गो. वाणी
प्रा. अ. बा. दांडेकर
प्रा. गीताराम गायकवाड

संपादक :

डॉ. शं. ना. नवलगुंदकर

विद्यार्थी-प्रतिनिधी :

श्री. ठकार अभय यशवंत, द्वि. व. शास्त्र

मुखपृष्ठ : प्रताप चव्हाण

सहाय्य : श्री. अजितकुमार नायर, बारावी वाणिज्य
श्री. शंकर विजय ,,

प्रकाशक : प्राचार्य स. य. गंभीर
मॉडर्न महाविद्यालय
शिवाजीनगर, पुणे ४११००५.

मुद्रक : श्री. राजू मराठे
सूर्य प्रिंटर्स,
१६८५, शुक्रवार पेठ, पुणे २.
९८४, सदाशिव पेठ, पुणे ३०.

ठसे : श्री. सुधीर खाडिलकर
सुप्रीम प्रोसेस
टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

# मनोगत

यंदाचा नियतकालिकाचा अंक आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. नियतकालिकाच्या द्वारे विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या मनात असलेल्या विचारांना आणि कल्पनांना अभिव्यक्तीचा मार्ग उपलब्ध होतो. त्यांच्या समोर चैतन्यदायी नैपुण्यांचा आदर्श ठेवला जातो. विविध उपक्रमांची नोंद घेतली जाते. व्यक्तिमत्त्वाच्या विकासात ह्या सर्व गोष्टींना विशेष महत्त्व असले तरी प्रत्यक्षात आमच्या समोर काही गंभीर स्वरुपाच्या मर्यादा आहेत.

महाविद्यालयाच्यासमोर काही मूलगामी समस्या उभ्या आहेत. विद्यार्थीसंख्या ही महत्त्वाची समस्या आहे. १९७० मध्ये अवघे ७०७ विद्यार्थी होते. आज ही संख्या ४००० पेक्षा अधिक आहे. प्रभावी शैक्षणिक प्रक्रियेतील हा एक अडथळा आहे. आपापल्या क्षेत्रात गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने प्राध्यापकांसमोर अनेक अडचणी आहेत. तथापि आपल्या महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांनी आपली शैक्षणिक उंची वाढवण्यासाठी केलेली धडपड उल्लेखनीय आहे. शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा कारभार हा एक प्रश्न आहे. वाढलेल्या कामाच्या प्रमाणात कर्मचारी संख्या वाढायला हवी. महाराष्ट्र शासनाला याची दखल घ्यावी लागेल. २१ व्या शतकाला सामोरे जाण्याची चर्चा सर्वदूर ऐकू येते. त्या दृष्टीने शैक्षणिक परिवर्तन अपेक्षित आहे. लवकरच नवा आराखडा तयार होईल. शास्त्रीय दृष्टी आणि चारित्र्य विकसित व्हावे म्हणुन शिक्षणाला नवी दिशा दिली जाईल. अशा प्रकारच्या परिवर्तनाचे आव्हान आपणास स्वीकारावे लागणार आहे. त्या दृष्टीने रचनात्मक बदल करावे लागतील.

या वर्षी आपले उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ हे सेवानिवृत्त झाले. एक शिस्तप्रिय शिक्षक म्हणून त्यांचा लौकिक सर्वमान्य आहे. त्यांना या नंतरचा काल सुख समृद्धीचा जावो ही सद्‌भावना. ज्या प्राध्यापकांनी आणि विद्यार्थि-विद्यार्थिनींनी विशेष प्राविण्य संपादन केले त्यांचे हार्दिक अभिनंदन ! नवागतांचे स्वागत, निवृत्तांना शुभेच्छा !

या अंकाच्या प्रकाशनाच्या कामी अनेकांची मदत झाली आहे. विशेषत: प्रा. गीताराम गायकवाड व प्रा. सुनील दाढे यांचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. सर्वांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत आहोत. मुद्रक श्री. राजू मराठे (सूर्य प्रिंटर्स) यांच्या विलक्षण उत्साहामुळे हा अंक वेळेत पूर्ण करता आला. त्यांना धन्यवाद !

संपादक

## पुरुषोत्तम करंडक विजेता संघ



## वक्तृत्व व वादविवाद मंडळ



## कालीदास संगीत स्पर्धा विजेता संघ



## राष्ट्रीय सेवा योजना



आंतर-महाविद्यालयीन बॉल-बॅडमिंटन विजेता संघ



आंतर-महाविद्यालयीन बॉल-बॅडमिंटन विजेता संघ



## आंतर-महाविद्यालयीन कबड्डी विजेता संघ



## आंतर-महाविद्यालयीन व्हॉलीबॉल संघ





डॉ. शं. ना. नवलगुंदकर
अध्यक्ष टिळक आयु. महा. समिती,
अध्यक्ष, पु वि. फे. को-ऑप. संस्था



सीताराम रायकर
नूतन सेक्रेटरी, प्रोग्रेसिव्ह
एज्यु. सोसायटी



प्रा. मुकुंद महाजन
अध्यक्ष, विद्यार्थी कल्याण मंडळ
पुणे विद्यापीठ



डॉ एस. वाय. परांजपे
प्रबंधक वाचणासाठी
इटाली येथे निमंत्रण



प्रा. प्रमोद पारखी
अध्यक्ष, कॉसमॉस बँक



कॅ. प्रा. पद्माकर आपटे
सर्वोत्कृष्टअधिकारी गौरव



प्रा. अरूण दांडेकर
होमगार्ड-विशेष सेवा पदक



प्रा. वसुंधरा हिरडे
M. P. S. C. परीक्षा उत्तीर्ण

विद्यावाचस्पती पदवी



प्रा. लक्ष्मण कान्हेकर
(प्राणीशास्त्र विभाग)



प्रा. सौ. भारती डोळे
(वाणिज्य विभाग)



प्रा. सुनिल दाढे
M. P. S. C. परीक्षा उतीर्ण

## प्रथम क्रमांकाचे मानकरी



कु. सिमंतिनी अभ्यंकर
तृतीय वर्ष शास्त्र



कु. सुजाता दातार
तृतीय वर्ष वाणिज्य



कु. अरूणा पंढरपुरे
तृतीय वर्ष कला



मोहंमद हनिफ शेख
एम. कॉम.



कु. निवेदिता बोडस
गणित तृ. व. शास्त्र



महेश भेलके
१२ वी शास्त्र



वंदना कुलकर्णी
१२ वी वाणिज्य



संगीता जाधव
१२ वी वाणिज्य



जयश्री ठाकूर
१२ वी कला



उद्धव सोनुले
१२ वी कला



निलेश जोशी
N D.A. करिता निवड



मंजुषा दातार
जिमनॅस्टिक



अनिल पाटील
I. C. S. R.



उज्वला कळसकर
I. C. S. R.



कामठे
फाइन आर्टस्



राजेंद्र यादव
U. R.



सुनंदा सुर्यवंशी
कबड्डी



वर्षा वाईकर
ज्युदो



सुषमा गटणे
N. C. C.



शामला पाटील
व्हॉलीबॉल, ॲथलेटिक



विनिता अवसरीकर
नेट बॉल, बॉलबॅडमिटन



सुनिल जाधव
N. C. C.



अनिल पवार
मॅरेथॉन, प्रथम



संतोष सावंत
लांब उडी



एस. जी. कोकाटे
कुस्ती


राजेंद्र हवालदार
मुष्टियुद्ध


संजय यनपुरे
व्हॉलीबॉल


जयदीप पाटणे
ज्युदो


बी. ए. वायकर
कुस्ती


अंजली दीक्षित
व्हॉलीबॉल


राजेंद्र खेडेकर
बास्केटबॉल


शुभदा शहा


गगन विहारी बोराटे

## यांनी जिंकला पुरूषोत्तम करंडक


अनिल डांगे
सॉफ्ट बॉल


राजेंद्र कदम
व्हॉलीबॉल


माधवी भावे
व्हॉ. अॅथलेटिक्स


बबन कामठे
कुस्ती


सुधीर पाळदे
व्हॉलीबॉल

# ' याचा विचार केलाच पाहिजे '

★

**राजाराम दिवेकर,** द्वितीय वर्ष शास्त्र

लोकशाहीचे हे पायाभूत तत्त्व एकदा मान्य केलें की नागरिकांच्या मूलभूत किंवा जन्मजात हक्कांच्या किंवा स्वातंत्र्याच्या आड येणारे कोणत्याही धर्माचे, कोणतेही नीति-नियम दुय्यम महत्वाचे ठरतात. अग्रक्रम मिळतो तो नागरिकांच्या मूलभूत हक्कांना आणि ज्या प्रमाणात परंपरागत आचारविचार या मूलभूत हक्कांशी विसंगत असतील. तितक्या प्रमाणात संकोच होतो तो या परंपरागत आचारविचारांचा. लोकशाही हक्कांचा मुळीच नव्हे.

या दृष्टीने 'युनो' सारख्या जागतिक संस्थेने 'मानवी हक्कांची' म्हणून एक सनद तयार केली आहे. जगात आज दोन-तीनशे राष्ट्रे आहेत. त्यांचे धर्म, भाषा हे सर्वस्वी भिन्न आहेत. त्यांचे वंश व रंग हेही भिन्न आहेत. पण ज्या ज्या राष्ट्रांनी 'मानवी हक्कांच्या' या सनदेस स्वेच्छेने मान्यता दिली. त्या सर्व राष्ट्रांमधून नागरिकाचे हे मूलभूत हक्क एकच मानलें गेले आहेत. एखादा धर्म, एखादी परंपरा कितीही जुनी असो. त्यामधील नीति-नियमांच्या तरतूदी या मानवी हक्कांच्या सनदेशी विसंगत असतील तर तो धर्म अगर ती परंपरा प्रथम बदलली पाहिजे. सनदेतील मूलभूत हक्कांना प्राधान्य मिळाले पाहिजे. त्यांचा केव्हाही संकोच होता कामा नये ही विचारसरणी मुख्यत्वे या सनदेमागे आहे.

भारतासारख्या लोकशाही देशातील सरकारांचे हे पहिले कर्तव्य आहे. की मानवी प्रतिष्ठा राखणाऱ्या नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे महत्व आपल्या समाजाला पटवून देण्यासाठी त्या सरकारांनी सदैव जागृत असले पाहिजे. धर्मभावनेचा पगडा हा शतकानुशतकाचा जुना आहे. त्यामुळे असंख्य प्रकारचे अन्याय, विषमता, जुलूम हे धर्माच्या नावाखाली पिढ्या न् पिढ्या निमूटपणे सहन केले गेले. पण धर्माने निर्माण केलेल्या या मानसिक गुलामगिरीतून सुटका करणे हेच भारतासारख्या लोकशाही सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे.

पण 'धार्मिक ढवळाढवळी' चा बाऊ करून आजचे सरकार आपली लोकशिक्षणाची व जागृतीची ही महत्वाची जबाबदारीच अंगाबाहेर टाकत आहे. वास्तविक शाहबानू केसने व उच्च न्यायालयाच्या निर्णयाने एक सुवर्णसंधी भारताच्या लोकशाही सरकारला मिळवून दिली होती. या संधीचा फायदा घेऊन पंतप्रधानांनी असे ठणकावून सांगणे जरुर होते की, " २६ जानेवारी १९५० " पासून 'लोकशाही' हाच भारताचा सर्वश्रेष्ठ धर्म बनलेला आहे. भारतामधील अन्य सर्व धर्म मग ते कितीही हजारो वर्षाचे जुने असोत—त्यांचे स्थान लोकशाही धर्मापुढे दुय्यमच राहील. प्रत्येक नागरिकाला आपला धर्म पाळण्याचे पूर्ण स्वातंत्र्य राहील पण ज्या वेळी लोकशाही धर्मातील मूलभूत हक्कांशी जुन्या धार्मिक नीति-नियमांचा वा परंपरांचा संघर्ष येईल त्यावेळी लोकशाही धर्माने दिलेला मूलभूत हक्क हाच सर्वश्रेष्ठ समजला जाईल.

पण आमचे आजचे सत्ताधारी सरकार शाहबानूच्या पाठीशी उभे राहिले नाही. एका तलाक पीडित दुर्दैवी महिलेचा साध्या पोटगीच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे त्यांना हे आपले कर्तव्य वाटले नाही. याउलट दिल्लीत अखिल भारतीय मोमीन परिषदेचे उद्घाटन करताना—

" मुस्लीम व्यक्तीगत कायद्यात कोणतेही बदल करण्याचा माझ्या सरकारचा विचार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातून निर्माण झालेली परिस्थिती आणि कायद्याच्या १२५ व्या कलमातून मुस्लिमांना वगळण्याची मागणी याबाबत सरकार गंभीर विचार करीत आहे !" असे आश्वासन खुद्द पंतप्रधानांनीच दिले अज्ञ व अडाणी मुस्लिम (पुरुष) समाजाचे लोकशिक्षण करण्याची व मुल्ला मौलवीच्यां मानसिक गुलामगिरीतून त्याला सोडवण्याची आपली नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे असे या सत्ताधाऱ्यांना वाटलें नाही. उलट, ती त्यांना धार्मिक जीवनातील ढवळाढवळ वाटली.

वरील सर्व गोष्टीवर एकच पर्याय तो म्हणजे 'समान नागरी कायदा' केलाच पाहिजे.

'वंदे मातरम्'

□

# मोरपीस

★

**संजय गोरले,** प्रथम वर्ष शास्त्र

" ए स्क्यूज मी "

" येस "

" एक मिनिट हं,"

" बोला."

" मला तुमचं 'मोरपीस' हवंय."

" का ? फार आवडलेलं दिसतंय !"

" तसं काही नाही. पण... मी त्यातली एक कथा साप्ताहिकात वाचली. शिवाय आत्ताच फंक्शन मध्येही तुम्ही एक कथा वाचून दाखवलीत. त्यावरून अंदाज केला की ते नक्कीच वाचण्यायोग्य असणार."

" नुसतं वाचण्यायोग्यच !"

" ते मी संपूर्ण वाचल्याशिवाय कसं सांगणार,?"

" हो."

" नक्की."

" हो."

मी पुस्तक दिलं.

" परत कधी देणार ?"

मिस्कील भाव तरळले.

" अभिप्राय सांगताना."

" अभिप्राय कधी सांगणार ?"

" पुस्तक देताना."

गालावर खळी पाडत ती खुदकली आणि निघून गेली. अर्ध्या एक तासापूर्वीच मी कॉलेजच्या गॅदरींगमध्ये माझ्या 'मोरपीसा' तील एक कथा वाचून दाखविल्यावर ती भेटली होती. माझे पुस्तक मागण्याकरिता. इतके दिवस मी तिच्याशी बोलावे म्हणत होतो पण विषय सापडत नव्हता. विषय कदाचित सापडला असता पण मला स्वतःला धीरच होत नव्हता. आणि आज ती स्वतःहून माझ्याशी बोलली. माझं 'मोरपीस' नेलं. शिवाय पुस्तक देताना झालेला तो मखमली स्पर्श... मोरपीसासारखाच मुलायम. दिवसभर मी नुसता स्वप्नात असल्यासारखाच वावरत होतो. आणि पुन्हा भेट ?.. हो ... होणार होती ना ! अभिप्राय सांगताना आणि...पुस्तक देताना.

माझ्याच वर्गात होती तो. अवखळ आणि बालीश. मी ज्या दिवशी तिला पाहिलं होतं तेव्हांच मला ती आवडली होती. तिच्या आठवणीत दोन दिवस कसे गेले ते कळलेच नाही. असाच संध्याकाळी काहीतरी लिहित बसलो होतो. तेवढ्यात फोन वाजला.

"हॅलो. कोण बोलतंय ?"

"मी..."

मी आवाज ओळखला. हृदयाची धडधड वाढली. आवाजावर ताबा मिळवीत मुद्दामच विचारले,

"मी म्हणजे कोण ?"

"मी क्षितिजा."

थोडा वेळ शांतता.

"पुस्तक वाचलं ?" मी.

"हो."

"कसय !"

"फारच छान" तिचा मुलायम शब्द आणि मला स्वर्ग गाठल्याचा आनंद.

"कोणती कथा आवडली ?" मी.

"मोरपीस."

"ती आवडली ? का आवडली सांगू शकाल ?"

"मला त्यातील कथानक फार आवडलं. विशेषत: तो शेवटचा प्रसंग फार आवडला."

"कोणता ?"

"ती कथा-नायिका म्हणजे आलोका आपलं प्रेम व्यक्त करण्याकरिता आशुतोषला पुस्तकातून मोरपीस पाठवितेना तो प्रसंग मला फार आवडला."

"तो प्रसंग आवडला ! तो तर एक साधारण प्रसंग आहे. त्यात येवढं आवडण्यासारखं काय आहे ?"

"ते तुम्हाला उद्या समजेल." आणि तिने अचानक फोन बंद केला.

सकाळी व्हरांड्यातच वाचत बसलो होतो. क्षितीज आली. पुस्तक दिलं. "थँक यू" म्हणून निघून सुद्धा गेली. मी नाराज झालो. तिच्याशी काय बोलायचे, कसे बोलायचे हे ठरवलेले विचार क्षणात कोलमडले. खिन्न मनाने मी पुस्तक हातात घेतले. तिचा स्पर्श झालेले. मनात हळूहळू आनंद संचारला. पुस्तकाला सुवास येतोय असे उगाच वाटू लागले. हळूवारपणे मी पुस्तक उघडले आणि...आणि ताडकन् उभा राहिलो. आतमध्ये एते सुरेख मोरपीस होते. ते मी अलगद हातात घेतले. ते मोरपीस नव्हते. माझे हृदय होते. आपल्या गहिऱ्या रंगांनी मला खुणावत होते. माझ्या हातात चैतन्यान डोलत होते. माझ्या हृदयासारखे. क्षितिजाने मला से सांगताच मला अभिप्राय समजला होता. पुस्तकाबद्दलही आणि माझ्याबद्दलही.

□

# अशियाई क्रीडा स्पर्धा

★

**विजय रंगराव दळवी,** द्वितीय वर्ष कला

आशियाई खेळाडूंना स्वतंत्र मैदान मिळावे. त्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळावा म्हणून १९५१ साली "आशियाई क्रीडा स्पर्धा" सुरू झाली. या स्पर्धेची कल्पना प्रा. जी डी. सोंधी यांनी मांडली. या प्रकारच्या स्पर्धा भरविल्या जाव्यात यासाठी त्यांनी खूप परिश्रम घेतले.

खेळामुळे अनेक लोक एकत्र येतात. शेजारी राष्ट्रातील लोक एकत्र येतील, एकमेकांना समजून घेतील, त्यांच्यात मैत्री वाढेल, वेड, शत्रूत्व कमी होईल, सद्भावना निर्माण होईल हा या पाठीमागचा उद्देश होय. तसेच खेळांमुळे संस्कृतीची देवाणघेवाण सुद्धा होते. पंतप्रधान पंडीत नेहरु यांनी आशियाई क्रीडा स्पर्धेला पाठिंबा दिला. अर्थिक सहाय्यही दिले. १९५१ सालच्या आशियाई स्पर्धा प्रथमतः नवी दिल्ली येथे झाल्या.

जागतिक पातळीवरच्या 'ऑलिंपिक्स्' स्पर्धा पूर्वीपासून चालूच होत्या. या स्पर्धेमध्ये जगातले वरच्या दर्जाचे खेळाडू भाग घेत असत. यामुळे आशियाई देशातल्या खेळाडूंना पुढे यायला वाव मिळत नसे. आशियाई देश मागासलेले होते. त्यामुळें खेळाडूंचा दर्जा सामान्य होता. खेळाड्चा दर्जा वाढविणे त्यांचे सामने आखणे महत्वाचे होते. १९४७ साली आशियाई देशांचे एक संमेलन भरले होते. त्यात ही कल्पना मांडण्यात आली. १३ फेब्रुवारी १९४९ रोजी नवी दिल्लीत आशियाई क्रीडा स्पर्धांच्या नियामक मंडळाची स्थापना झाली. "पुढचे पाऊल पुढेच टाका" हे आशियाई स्पर्धांचे ध्येयवाक्य ठरले.

११ मार्च १९५१ रोजी दिल्लीच्या नॅशनल स्टेडियम' मध्ये पहिल्या आशियाई स्पर्धेला सुरुवात झाली नवीचा उगम हा लहानच असतो. तशी आशियाई स्पर्धेची सुरुवात लहानच होती. खेळांची संख्या, खेळात भाग घेणाऱ्या राष्ट्रांची व खेळाडूंची संख्या अल्प होती. १९५१ नंतर दर ४ वर्षांनी आशियाई देशात या स्पर्धा भरत गेल्या. त्याप्रमाणे खेळांची संख्या, खेळात भाग घेणाऱ्या राष्ट्रांची संख्या व खेळाडूंची संख्या वाढत गेली.

आतापर्यंत झालेल्या आशियाई स्पर्धा पुढीलप्रमाणे –

| क्रमांक | वर्ष | ठिकाण | खेळ | देश | खेळाडू |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९५१ | नवीदिल्ली | ६ | ११ | ६०० |
| २) | १९५४ | मनिला | ८ | १८ | १,०२१ |
| ३) | १९५८ | टोकियो | १३ | २० | १,४०० |
| ४) | १९६२ | जाकार्ता | १३ | २० | १,५०० |
| ५) | १९६६ | बँकॉक | १३ | २० | १,९४५ |
| ६) | १९७० | बँकॉक | १३ | १८ | २,००० |
| ७) | १९७४ | तेहरान | १६ | २५ | ३,००० |
| ८) | १९७८ | बँकॉक | १९ | २५ | ३,००० |
| ९) | १९८२ | नवीदिल्ली | २१ | ३० | ५,००० |

१९८२ साली झालेल्या नवव्या आशियाई स्पर्धेसाठी २१ खेळ निवडण्यात आले होते. ते पुढीलप्रमाणे :–

१) हॉकी २) फुटबॉल ३) हँडबॉल ४) व्हॉलीबॉल ५) बास्केटबॉल ६) टेनीस ७) टेबल टेनीस ८) बॅडमिंटन ९) धर्नुविद्या १०) नेमबाजी ११) अॅथलेटिक्स

१२) जिम्नॅस्टिक्स् १३) सायकल चालन १४) हॉर्स रायडिंग १५) वजन उचलणे १६) कुस्ती १७) मुष्टीयुद्ध १८) जलतरण १९) यॉटींग २०) रोईंग २१) गोल्फ.

या स्पर्धेत सुमारे ३० देशांच्या ५,००० खेळाडूंनी भाग घेतला होता. या खेळात जपानने आजपर्यंत तुफान यश मिळविले आहे. प्रत्येक वेळी पहिला क्रमांक मिळविला व आठव्या आशियाई स्पर्धेपर्यंत टिकविला.

१९७४ साली चीनने आशियाई स्पर्धेत प्रवेश केला. स्पर्धेत चुरस वाढली. ज्या ज्या ठिकाणी आशियाई स्पर्धा झाल्या तेथील खेळाडूंना त्याचा फार फायदा झाला. त्या देशांच्या पदकांच्या संख्येत भर पडली. त्यांचा खेळातील क्रमांक सुधारला.

भारताने आत्तापर्यंत आशियाई स्पर्धेत एकदाच हॉकीतले सुवर्णपदक मिळविले आहे. ते म्हणजे १९६६ साली बँकॉकला. फुटबॉलमध्ये भारताला दोन वेळा सुवर्णपदक मिळाले आहे. १९५१ साली दिल्लीला व १९६२ साली जाकार्ताला अॅथलेटिक्सने भारताला फार मोठा हात दिला आहे. थाळीफेक व गोळाफेक यात भारतीय खेळाडूंनी बऱ्याच वेळला आघाडी टिकविली आहे व अजिक्य पदही पटकावले आहे. याखेरीज कुस्ती, नेमबाजी, मुष्टीयुद्ध या खेळात भारताचे खेळाडू सुवर्णपदकाचे मानकरी झालेले आहेत. नेमबाजीत रणधीरसिंग तर मुष्टीयुद्धात हवासिंग यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

१९ नोव्हेंबर १९८२ पासून सुरू झालेल्या नवव्या आशियाई स्पर्धेची जलद तयारी करण्यात आली होती. या समारंभाचे उद्घाटन 'पं. जवाहरलाल नेहरु स्टेडियम' येथे दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते अतिशय भव्य प्रमाणात करण्यात आले. बलबिरसिंग व डायना सेनिस यांनी आशियाई स्पर्धेची ज्योत प्रज्वलित केली. पंडीत रवीशंकर यांच्या हस्ते उस्फूर्त सतार वादनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली.

हत्तीची उभी प्रतीकृती म्हणजे "अप्पू" हे नवव्या आशियाई स्पर्धेचे प्रतीक होते व हे प्रतीक फार प्रसिद्ध झाले होते. भारत सरकारने अशी काही विशेष पोष्टाची तिकीटे व पैशाची नाणी तयार केली होती की ज्यावर "अप्पू" चे चित्र होते. अशा प्रकारे अनेक क्रीडा स्पर्धा पैकी 'आशियाई क्रीडा स्पर्धा' या यशस्वी क्रीडा स्पर्धा मानल्या जातात. ☐

# हुंडा बंदी, शक्य की अशक्य

★

**संध्या गो. रांगणेकर,** तृतीय वर्ष वाणिज्य

हुंडा-मुलीच्या बाबतीत देणे आणि मुलाच्या बाबतीत घेणे, हे एक समीकरणच बनले आहे. साधा सोपा दोन अक्षरी शब्द पण त्यात किती वधूंचे आणि वधूपित्यांचे प्राण गुंतलेले आहेत याची गणती करणे अशक्यच.

हुंडयाचा तसा अर्थ सोपाच. मुलीच्या वडिलांनी आपल्या मुलीच्या लग्नात स्वेच्छेने काहीतरी वस्तू म्हणा, पैसे म्हणा मुलाच्या वडिलांना भेट म्हणून द्यायचे. पण हाच हुंडयाचा अर्थ मोठा अवघड करून टाकला आहे.

तशी हुंडा देण्याची पद्धत पूर्वीपासूनच चालत आलेली आहे. पूर्वीच्या काळी एका-एका कुटुंबात ८ ते १० मुले असायची आणि मग त्या कुटुंबातील एखादा हुशार मुलगा थोडें फार शिक्षण घेऊन एखाद्या सरकारी ऑफिसात नोकरीस लागायचा त्या काळातील अशा शिकलेल्या आणि सरकारी ऑफीसात नोकरीस असणाऱ्या मुलाची स्थिती 'वासरात लंगडी गाय शहाणी' याप्रमाणे होई. साहजिकच त्या मुलासाठी वडिलांनी केलेला खर्च, त्याची नोकरी व शिक्षण यामुळें त्याचे समाजातील स्थान याला अनुसरून त्याला योग्य प्रमाणात हुंडा रूपी परतफेड मिळे.

पण आजही तशी स्थिती का रहावी ? शिक्षण आणि सरकारी नोकरी हे तर आज सर्रास झालेले आहे. 'वासरात लंगडी गाय शहाणी' अशी स्थिती आज राहिलेली नाही. उलट सगळ्या गायीच आहेत. त्यात चुकून एखादे वासरु सापडेल.

हुंडया सारखा कलंक समाजावर लावला तो समाजातील मोठ्या (अर्थातच संपत्तीने) लोकांनी. गर्भश्रीमंत असणारे हे लोक हुंडयाच्या बाबतीत मागे पुढे बघत नाहीत. आपली लेक आपल्या पेक्षा श्रीमंत व्हायला हवी हा उद्देश असताना मग हुंडा देताना हात का आखडता घ्यायचा. पण हुंडा देताना अगर घेताना हे लोक मध्यमवर्गीयांचा आणि गरीबांचा कधीच विचार करीत नाही.

शेवटी माणूस म्हणजे सामाजिक प्राणी. भोवतालच्या समाजात काय चालले आहे, त्याचेच तो अनुकरण करतो. समाजात रहाणाऱ्या या मोठ्या लोकांचे अनुकरण हे मध्यमवर्गीय व गरीब लोक करतात आणि मग हुंडया सारख्या अशा वाईट पद्धती समाजात रूढ होतात. मुलाच्या लग्नात अगदी मनाला वाटेल तेवढया हुंडयाची मागणी करून आपली वर मातापित्याची हौस भागवून घेतात, भरपूर मान सन्मान मिळवून घेतात. परंतू त्या वेळी त्यांना आपल्या मुलीचे लग्न व्हायचे आहे याची जाणीव नसते. स्वत:वर हुंडा देण्याची वेळ आली की मग ते हुंडा बंदी चळवळ, हुंडा देणे पाप व गुन्हा कसा आहे याची महती पटवून देण्याचे प्रयत्न करतात. हे सर्व करुन देखील नाईलाज झाला की मग कर्ज काढून शेत अगर घर गहाण टाकून लग्नात हुंडा द्यायचा. पण हुंडा देताना हुंडा देऊन देखील आपली मुलगी खरोखरीच सुखी आहे काय ? याचा विचार त्यांच्या मनाला शिवूनही जात नाही. पैशाची हाव असणाऱ्यास कितीही दिले तरी पुरे पडत नाही. पैसे नाही तर गाडी, टिव्ही या ना त्या रूपाने तो आपली लालच भागविण्याचे प्रयत्न करत असतो आणि मग देणाऱ्याचे हात खुंटले की आत्महत्येचे प्रकार उदभवतात.

याला कारणीभूत आहे आजची तरुण मंडळी. इतर बाबतीत राजी असणारे मियाँ-बिबी (प्रियकर-प्रेयसी) हुंड्यांच्या बाबतीत राजी नसतात आणि मग मियाँ-बिबी राजी तो क्या करेगा काजी ' ही म्हण खोटी ठरुन हुंडा रुपी काजीला मध्ये पडणे भाग होते. आजच्या तरूण मंडळींना सिगारेट ओढताना अगर इतर वाईट गोष्टी करताना आपल्या पिताजींचा सल्ला घेणे महत्वाचे वाटत नाही पण हेच जर लग्नाच्या वेळी हुंडा न घेता लग्न कर असे सांगितले तर मात्र ' छे बुवा आपण वडिलांच्या पुढे जाऊ शकत नाही. ते म्हणतील ती पूर्व दिशा ' असे बोलून ते मोकळे होतात.

आजच्या तरुणींची देखील तीच स्थिती आहे. शिकल्या सवरलेल्या आणि स्वतःच्या पायावर उभ्या असल्या तरी ' लग्न करीन तर हुंडा न घेणाऱ्याशी ' असे म्हणण्याची हिम्मत त्यांच्यात नसते. मग तसे प्रत्यक्ष करणे तर दूरच राहिले.

ही हुंड्यांची रूढी दूर करावयाची असेल तर सर्व प्रथम आजच्या युवक-युवतींचे मत परिवर्तन होणे आवश्यक आहे. जुन्या आणि बुरसटलेल्या विचारांची चौकट तोडून टाकून त्यांनी बाहेर पडले पाहिजे. युवकानी हुंडा न घेण्याचे व युवतींनी हुंडा न देण्याचे पक्के ठरविले तर वर पित्यांनी व वधु पित्यांनी हुंडा देण्याचा अगर मागण्याचा प्रश्नच येत नाही.

मोठ्या लोकांनाही ह्या हुंडा देण्या घेण्या पासून परावृत केले पाहिजे. यासाठी सरकारने हुंडा बंदी संबंधी कायदे केले पाहिजे. हुंडा बंदी चळवळी सुरू करून त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे.

हुंडा बंदी शक्य करावयाची असेल तर युवक वर्ग हाच त्याचा मूळ पाया आहे आणि हा पायाच भक्कम असेल तर हुंडा देण्या घेण्याची पद्धत बंद होण्यास अशक्य ते काय आहे. !

□

# चंद्री (व्यक्तिचित्रण)

★

**कु. संगीता दत्तात्रय जाठवडेकर,** प्रथम वर्ष वाणिज्य

हू ! हू !! हू !! काय ही थंडी ! असे म्हणून मी अंगावर चादर ओढून, अंग आखडून झोपले. असे झोपण्यातही काही आगळेच सुख असते आणि ते मी मनसोक्त अनुभवत होते आणि नकळत माझा डोळा लागला. उठले तेव्हा बाहेर लख्ख उजेड पडला होता. चंद्री हातात खराटा घेऊन वाड्यातील चौक मनापासून झाडत होती. तिच्या हालचाली मी टिपत होते. तिच्या अंगावर नेहमी मळलेले परकर, पोलके असे. पायात तुटलेल्या किंवा किमान पाच-सहा वेळा शिवलेल्या चपला असत. कपाळावर कुंकू, नाकात नथ असे. अशा तिच्या अवताराचे मला हसू येई. पण जेव्हा तिची आणि माझी मैत्री झाली तेव्हा मात्र मी तिच्याकडे सहानुभूतीने पाहू लागले.

चंद्री रंगाने सावळी असली तरी नाकी डोळी निटस होती. तिच्या नजरेत विलक्षण तेज होते. तशी ती चलाख होती. बोलायला तर अगदी फटाकडी. चंद्री म्हणजे आमचे चालतंबोलतं वृत्तपत्रच. दररोज ती मला आमच्या बिल्डिंगमधल्या बातम्या तिखट, मीठ लावून सांगते आणि मी पण त्या बातम्या चविष्टपणे ऐकते. तर अशी ही चंद्री.

थोडया वेळाने चंद्री माझ्यासमोर हजर झाली. तिच्या अधिऱ्या नजरेतून तिला काहीतरी नवीन बातमी सांगायची आहे हे मी ओळखले आणि विचारले, "काय चंद्राबाई, आज कुठली बातमी आणलीत?" त्यावर ती म्हणाली, "आजची बातमी हीच की मला इथल्या म्युनसिपालटीच्या शाळेत घातलय माझ्या मायच्या मागे मी शाळेत नाव घालण्यासाठी लागले होते. तुमच्याजवळ एखादी जुनी पाटी असली तर द्या' हे ऐकून माझे कुतुहल जागे झाले आणि मी तिला अनेक प्रश्न विचारले, "अग पण तू तर येरवडयापासून शनिवारपेठेत चालत येतेस. तुला जमेल का शाळेत जायला?" या माझ्या प्रश्नावर चंद्रीने मला तिची सारी माहिती पुरवली. चंद्रीला शिकायचे वेड होते. येरवडयाच्या शाळेत ती चवथी पास झाली होती. पोरगी आता मोठी झाली म्हणून तिच्या आईने तिला शाळेतून काढून, काम करायला लावली. कारण दोन वेळेच्या पोटाचा प्रश्न होता. आणि आता एका शिक्षिकेच्या घरी काम करत असल्यामुळे, त्या शिक्षकेने तिला म्युनसिपालटीच्या शाळेत प्रवेश घेऊन दिला होता. हे सर्व ऐकून मला आनंदच झाला. मी चंद्रीकडे कौतुकाने पाहू लागले, तिच्या अभ्यासाची चौकशी करू लागले.

काही दिवस चंद्रीची आणि माझी भेटच झाली नाही. एकदा अचानक ती आडोशाला वहीवर काहीतरी लिहीत बसलेली मला दिसली. अभ्यास करण्यात ती इतकी मग्न होती की तिचे माझ्याकडे लक्षच नव्हते. अखेर मीच तिला तिच्या ध्यानसमाधीतून जागे केले. मी काही बोलण्याच्या आत तिच्या तोंडाचा पट्टा सुरू झाला. नेहमीप्रमाणेच आमच्या गप्पा झाल्या. चंद्री दररोज पहाटे थंडीत, डोक्यावर लोखंडाचे जड घमेले घेऊन तिच्या मायबरोबर येत असे. नंतर कोणाची भांडी घास, तर चौक घास, अशी अनेक कामे ती करत असे. दिवसातील बराच वेळ पाण्यात वावरल्यामुळे तिचे पाय पांढरे झाले होते. पायाला भेगा पडल्या होत्या. काम करून हातही निबरट झाले होते. अशाही परिस्थितीत चंद्री शिक्षण घेत होती. म्हणून तिला शक्य तितकी मदत करायचे मी ठरवले. तिला मी दोन-तीन वह्या घेऊन दिल्या. तसेच माझा जुना स्वेटर, एक पाटी, पेन तिला दिले. चंद्री आता माझ्यावर भलतीच खूष होती. माझी कामे ती अधिक आवडीने करू लागली. कुठलेही काम करण्याची तिची तयारी असे.

तिची वार्षिक परीक्षा झाली. चंद्री चांगल्या मार्कांनी पास झाली. निकाल लागला त्या दिवशी चंद्री फारच आनंदात होती. तिचे प्रगतीपुस्तक घेऊन ती माझ्याकडे आली. पण चंद्री आज विचित्रच वागत होती असे मला वाटले. कारण नेहमीसारखी ती धडाधडा बोलत नव्हती. ती आज अबोल आणि काहीशी लाजरी वाटत होती. मी तिचे कौतुक केले आणि चांगलें यश मिळावल्याबद्दल तिला साखरभात खायला दिला. तेवढयात तिची माय आली व चंद्रीचे लग्न जमल्याची सनसनाटी वार्ता तिने मला सांगितली. त्या वेळेस चंद्री इतकी लाजली की तिने लाजून तोंडात बोटे घालायचेच शिल्लक ठेवलें होते. चंद्रीचे हे रूप मला अगदी नवखे होते. आठ दिवसांनी तिचे लग्न एक ट्रकड्रायव्हरशी होणार होते. मी तिची खूप चेष्टा केली. चंद्रीने मला आग्रह करून लग्नाला बोलावलें होते. तिच्या आग्रहानुसार मी तिच्या लग्नाला गेले होते. नंतर मात्र तिची आणि माझी भेटच झाली नाही. चंद्रीचे लग्न झाल्यामुळे एक चालते बोलते वृत्तपत्रच बंद पडले. कधी कधी चंद्रीची फारच आठवण येते. सतत कामात असणारी, एखाद्या कागदाच्या टिचभर चिटोऱ्यावर पेन्सिलने लिहिणारी, गरिबीमुळे असहाय्य झालेली चंद्री माझ्यासमोर येते आणि मनासमोर प्रश्न उभा रहातो की अशा कितीतरी असहाय्य चंद्रा आपल्या समाजात असतील?

□

# जीवन

★

**कु. शिरीष चिंचनसुरे,** द्वितीय वर्ष शास्त्र

" जीवन " केवळ तीन अक्षरी शब्द ! पण किती वेगवेगळी रुपे आहेत, किती वेगवेगळे रंग भरले आहेत त्यात !

जीवनाचे वर्णन करताना कुणीतरी म्हटले आहे की– जीवन एक रणभूमी आहे. या रणभूमीवर सारखे संघर्ष चाललेले असतात. प्रत्येकालाच या रणभूमीवर लढावे लागते. जय-पराजयाला स्विकारावे लागते. या संघर्षात जे बलवान असतील, सत्ताधीश असतील, लखपती असतील त्यांचाच पुष्कळदा विजय होतो. दीन दुबळे, प्रामाणिक, दरीद्रीनारायण यांना पराभवच स्वीकारावा लागतो.

" सत्याचा विजय होतो " असे म्हणतात पण तो फार उशीरा.

जीवनाचं पर्यायी नावच भ्याडपणा ठरेल. कारण, इच्छा मारून तडजोडी स्वीकारत जगणे हेच खरं जीवन आहे. मग ते आवडो न आवडो, मान्य असो किंवा नसो.

जीवनाचे दुसरे रूप – शेक्सपीअरच्या भाषेत वर्णन करावयाचे म्हटले तर– " जीवन एक रंगभूमी आहे " येथे प्रत्येकाला कोणती ना कोणती भूमिका रंगवावी लागते. जे नाही ते आहे असं दाखवावं लागतं. कधी कधी एकाच व्यक्तीला अनेक विविधरंगी, भिन्न भिन्न भूमिकाही रंगवाव्या लागतात. कधी मुलीची तर कधी खाष्ट सासूची ! ज्याला सुंदर अभिनय जमेल तो या रंगभूमीवर यशस्वी झाला असे समजावे.

ग. दि. माडगूळकरांनी जीवनाला एका वस्त्राची उपमा दिली आहे. ते म्हणतात–

'एक धागा सुखाचा शंभर धागे दुःखाचे' सुख दुःखाचा धाग्यांनी विणलेले सुंदर वस्त्र म्हणजे जीवन ! पण प्रत्येकालाच जीवनाचे असे सुंदर वस्त्र वाट्याला येत नाही. कधी कधी हे जीवन विषाचे रूप घेऊन येते. तरी पण ते अव्हेरून चालत नाही. श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी मीरेनं जसं हसत हसत विष प्राशन केले तसे जीवनरुपी विष प्राशन केले तरच मोक्ष प्राप्त होतो.

" मदर इंडिया " या चित्रपटाची नायिका म्हणूनच म्हणते की –

" दुनियामें हम आये हैं तो जीना ही पडेगा
जीवन है अगर जहर तो पीनाही पडेगा "

अशा प्रकारे जन्माला आल्यापासून मृत्यूची चाहूल लागेपर्यंत प्रवास करावाच लागतो. हे जीवन अटळ आहे तसाच मृत्यूही अटळ आहे.

जीवनरुपी रंगभूमीवर संघर्ष करीत, जीवनाच्या रंगभूमीवर अभिनय करीत पुढे पुढे जात रहायचे. हसत खेळत-कारण जीवनाची वरील प्रमाणे अशी विविध रंगी रुपे आहेत तसेच आणखी एक सुंदर रूप आहे ते म्हणजे–

जिंदगी एक सफर है सुहाना
यहाँ कल क्या हो किसनें जाना
हँसते गाते यहाँ से गुजर
दुनियाकी तू परवाह न कर
पीछे रह जायेगा ये जमाना

मग हाच संदेश घेऊन पुढे चालायला काय हरकत आहे ?

□

# 'गिर्यारोहण' मनातील सुखद अनुभव

✶

**कु. सुषमा कृष्णराव गटणे,** द्वितीय वर्ष वाणिज्य

---

खरंच, मी माझ्या आयुष्यातील तो आनंदाचा क्षण कधीही विसरणार नाही. तोच तो क्षण, ज्यावेळेस आमचे N. C. C. चे O. C. श्री. एस. व्ही. जोशी यांनी माझी मनाली येथे 'गिर्यारोहणासाठी' निवड केली तेव्हा मला इतका आनंद झाला की मी तो शब्दातून प्रकट करू शकत नव्हते. आणि एकदाचे कधी मनालीला जाते असे मला वाटत होते.

आम्ही N. C. C. तर्फे पुण्याच्या फक्त दोघीजणी होतो. कारण अशा मोठ्या कँपसाठी मर्यादित जागा असतात. कँपला लागणारी सर्व तयारी मी केली. आणि शेवटी मनालीला जाण्याचा दिवस आला दि. २८।५।८५ रोजी १ वा. आम्ही दोघी आमच्या बरोबर N. C. C. चे सर असे तिघेजण झेलम एक्सप्रेसने पुणे स्टेशनहून निघालो. दिवसभर आम्ही गाडीतच प्रवास केला. संध्याकाळच्या सूर्यास्ताचे दृश्य फारच मोहक होते. वेगाने गोल गोल फिरत टेकडीखाली जाणारा लाल तांबूससर रंगाचा सूर्य व तो टेकडीखाली गेल्यानंतर आभाळात राहिलेली लालसर सोनेरी छटा फारच सुंदर दिसत होती. तेव्हा सूर्य जणू सोन्याचा गोळा दिसत होता.

दि. ३०।५।८५ रोजी आम्ही अंबाला येथे उतरलो. हे शहर फारच मोठे व सुंदर होते. तेथे तीन चाकी सायकलच्या रिक्षा होत्या. तेथे पंजाबी व शीख लोक रहात होते. सिनेमा थिएटर लहान असून बाल्कनी असा वेगळा मजला नव्हता. परंतु शेवटच्या रांगेत बाल्कनी म्हणून कोच होते.

जेवणासाठी ढाबें होते दिवसभर अंबाला येथे राहिल्यावर रात्री ८-३० वा. मनाली येथे जाणाऱ्या बसमध्ये बसलो. बसमध्ये फारच गर्दी असून त्यात जास्त यात्रेकरू होते. आम्हाला पहाटे बसायला जागा मिळाली. पहाटे सूर्योदय खूपच छान दिसत होता. सुरूवातीला सुर्याची सोनेरी, लालसर किरणे आणि वेगाने गोल गोल फिरत सूर्य वर येत होता. पुढे गेल्यावर पांढऱ्याशभ्र पाण्याचा सुंदर धबधबा दिसला. नंतर मोठीच मोठी बियास नदी दिसली. जसजसे मनाली जवळ येत होते तसतशी थंडी अधिकाधिक जाणवायला लागली. उंच डोंगरातून गाडी जाताना फारच मजा येत होती. वाटेत एक देवीचे देऊळ लागले. तेथे गाडी थांबल्यावर तेथील पुजाऱ्यानें गाडीतील प्रवाशांना देवीचा प्रसाद दिला पुढे गेल्यावर बर्फाचे पर्वत दिसायला लागले. उंच मोठ्या पर्वताचा काही भाग बर्फाचा तर काही दगडांचा आणि त्यावर सूर्याचे किरण पडल्यामुळे तो चकाकत होता. त्यामुळे असें वाटत होते की त्या पर्वताने चंदेरी मुकुट धारण केला आहे.

आम्ही १०-३० वा. मनाली येथे पोहोचलो. तेव्हा मला खूपच आनंद झाला. तेथे आम्ही Institute of Mountaineering & Allied Sports, Manali येथे उतरलो. तेथे भारतातील १८ व एक ऑस्ट्रेलियातील अशा १९ मुली गिर्यारोहणासाठी आल्या होत्या. काहीजणी बांगलादेश, कर्नाटक, गोवा, गुजराथ इत्यादी राज्यातून N. C. C. तर्फे आल्या होत्या. तेथे सर्वांना समजणारी इंग्रजी व हिंदी भाषा बोलावी लागे. ऑस्ट्रेलियाहून आलेल्या सोरालला मनाली खूपच आवडली. तिने तीन-चार देशांचा प्रवास केला होता. परंतु ती म्हणाली की मी मनालीसारखे सृष्टी सौंदर्य कुठेच

पाहीले नाही. तिने तेथील संस्कृतीवर पुस्तक लिहिले आहे तेथे आमची राहण्याची सोय फारच चांगली होती. संस्थेच्या सभोवतालच्या बागेमध्ये निरनिराळ्या प्रकारची फुले, झाडे होती. एका बाजूला चकाकणारा बर्फाचा पर्वत, दुसऱ्या बाजूला हिरव्या झाडांची शाल पांघरलेला पर्वत, समोरुन उंचावरुन खळखळ वहात येणारे सूर्यप्रकाशाने चकाकणारे बर्फाचे पाणी, खरंच हे दृष्य खूपच सुंदर होते. तेथे जागोजागी रानटी गुलाब उगवलेले होते.

आमचा एकंदर २१ दिवसांचा कॅंप होता. पहाटे पी. टी. करून आम्ही Rock Climbing ला जायचो. नंतर आम्हाला विविध प्रकारच्या गाठी व त्यांचे उपयोग शिकवणे, तसेच दोरीच्या सहाय्याने रॅपलिंग (दोरीच्या सहाय्याने खडक उतरणे) सुद्धा शिकलो. दुपारी आम्हाला हवामानाबद्दल व प्रथमोपचाराबद्दल माहीती सांगत. दि. ८ रोजी आम्ही खूप उंच असलेल्या वसिष्ठ रॉकवर रॅपलिंग केले. संध्याकाळी तेथील मंत्री श्री. अशोककुमार गिलॉट यांच्या शुभहस्ते सिमल्याच्या मुलींना ट्रेकिंगबद्दल बॅचेस देण्यात आले. दि. १० रोजी फ्रेंडशिप (बर्फाचा) पर्वत (उंची १७.५३३ फूट) पाठीवर रुकसॅक व हातात आरस-ॲक्स घेऊन निघालो. वाटेत सोनांगनाला, रोहतांगपास, बियासकुंड येथे मुक्काम केला. तेथील फुले खूपच सुंदर होती. लालचोचीचे, पखांना मोरपंखी कडा व मध्ये काळा व पांढरा रंग असलेले सुंदर पक्षी होते. रात्री आम्ही उबदार असलेल्या स्लीपिंग बॅगमध्ये झोपायचो. दि. १६ रोजी पहाटे ५-३० वा. आम्ही फ्रेंडशिप चढायला निघालो तेव्हा खूपच मजा आली. परंतु थंडी फार होती. जणूकाही असे वाटत होते की आम्ही फ्रीजमध्ये बसलो आहोत. आम्ही १६.८०० फूट उंचीवर चढल्यावर आपण केवढे उंचावर आलो या विचाराने मला आनंद झाला. सभोवताली बर्फच बर्फ त्यावर सूर्याचे किरण पडल्यामुळे तो चकाकत होता. आम्ही खूप बर्फ खेळलो फोटो काढले. परंतु तेवढ्यात जोराचा स्नो-फॉल व्हायला लागला. त्यामुळे आम्ही आमच्या पायांच्या खुणांच्या सहाय्याने खाली आलो. नंतर आमची शिकवलेल्या अभ्यासाची परीक्षा झाली. आणि आम्हाला सर्टीफिकेटस् व बॅचेस मिळाले.

खरंच, मनाली शहर खूपच सुंदर आहे. विविध प्रकारच्या वस्तू असलेल्या तेथील बाजार पेठा खूप मोठ्या आहेत. तेथे चांगल्या दर्जाची लोकर मिळते. दगडांचे व खऱ्या मोत्यांचे दागिने घालायला तेथील लोकांना फार आवडतात. तेथील लोक दिसायला सुंदर आहेत. थंड हवामानामुळे लोकांचा रंग गुलाबी गोरसर आहे. तेथे सिनेमा थिएटर नाही परंतु व्हीडीओ केंद्र आहे. जेवायला ढाबे असतात. टुरीस्ट लोकांची रहाण्याची सोय चांगली आहे. लोक स्वभावानी खूप चांगले आहेत. तेथे उंचावर वसिष्ठ मंदीर व हिडिंबा टेंपल बघण्यासारखे आहे. गंगोत्री तर खूपच छान आहे. स्टेशनवर देवीचे देऊळ आहे. टिकी नावाचा पदार्थ चविष्ठ आहे. मनालीहून पुण्याला येताना वाटेत कुलु गांव लागले. चंदीगडला आम्ही एक दिवस राहिलो. ते शहर खूपच स्वच्छ आहे. व तेथे मोठ्या इमारती आहेत.

मनालीची राजधानी – सिमला.
क्षेत्रफळ – ५५,६७३ किलोमीटर.
१९८१ सालची लोकसंख्या ४२,८०,८१९.
भाषा – हिंदी आणि पुलारी.
मुख्यमंत्री – श्री. विरभद्रसिंग.
गव्हर्नर – श्री. होकीरी सेना.

मनुष्यजन्म माणसाला एकदाच मिळतो. तर आपणही एकदा मनालीला जाऊन तेथील निसर्गाच्या सौंदर्याचा आनंद लुटावा. तर तो जन्म सार्थकी लागल्यासारखे वाटेल.

□

# सावधान ! बुवाबाजी वाढते आहे

★

**सुषमा वर्तक**, प्रथम वर्ष वाणिज्य

---

विज्ञानाची भरारी सुरू झाली, आणि जे सहज प्रत्ययाला येत नाही, ते कशाला मानायचे ? असे प्रतिपादन सुरू झाले अदृश्यावरचा विश्वास नाहीसा होत चाललाय अशी मते एकीकडे प्रतिपादीत केली जातात, तर दुसरीकडे समाजात अंधश्रद्धा, बुवाबाजी, मठ, देवालये यांची पेवे फुटतात. हा विरोधाभास कसला ?

बुवाबाजी हा शब्द तसा खूप व्यापक अर्थाने वापरता येईल. सध्याच्या मनुष्याच्या जीवनातली त्याची ओढाताण, धकाधकी, किमान गरजा पुऱ्या करण्यासाठी करावी लागणारी उरफोड, वैफल्य, रोगराई अशासारख्या गोष्टींकडे पाहिले की विज्ञानाची गरज अपुरी वाटू लागते. मानवी मन मोडून टाकणारी स्थिती आली की त्याला, ज्ञानापेक्षा अज्ञानाचाच पसारा आणि प्रभाव जवळचा वाटु लागतो.

रुढार्थाने बुवाबाजी म्हणजे, कोंबडं कापणं, बळी देणं हे तर आहेच. पण याही पुढे जाऊन अज्ञान आणि अतीव दारिद्र्यामुळे मनाला येणारी असहाय्यता ही देखील बुवाबाजीला पोषक ठरते. अशावेळी मनाची स्थिती भाबडेपणाकडे झुकलेली असते. अशा व्यक्तिमनाचा फायदा घेऊन स्वार्थासाठी त्याचा वापर करून नजरबंदी करणारे लोक, शक्ती, व्यक्ती व त्यांची कर्तुत्वे ही देखील एक प्रकारची बुवाबाजीच नाही का? समाजातील अंधश्रद्धेचा कुशलतेने वापर करून घेणारे ते Mass Hypnotist च नव्हेत का ?

यश: प्राप्तीसाठी प्रामाणिक कष्ट करण्याऐवजी वैध-अवैध मार्गाचा अवलंब व त्यायोगे शिक्षणसंस्थात येणारी स्वार्थी हेतूंचा गढूळपणा ही ही एक बुवाबाजीच. राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार, नेतृत्व हे तर नाकारता येत नाहीच, पण मध्यमवर्ग, बहुसंख्य सामान्यजनही सुखाच्या लालसेपायी भ्रष्टाचाराच्या चिखलात खोलवर रुतत चालले आहेत. धर्मश्रद्धेचे स्वरुपात स्वार्थी हेतूंची गढूळता म्हणजे वाढती बूवाबाजी. आजची वाढती भक्तसंख्या म्हणजे केवळ भौतिक सुखाच्या लालसेने जमलेले मुंगळे असतात. लॉ. नं., सट्टा, स्त्रीवशीकरण इ. अनेक कारणांसाठी त्यांना याची आवश्यकता असते. हावरट हेतूंसाठी जेव्हा धर्मश्रद्धेचा गैरवापर सुरू होतो तेव्हा नंगाबाबासारखी बजबजपुरी माजलेली दिसते. श्री. रा. भ. पाटणकर म्हणतात 'ढोंगप्रवृत्तीला पुरक ठरणारी ही पापाचरणांची घाऊक दुकाने समाजावर फार खोलवर परिणाम करतात. अशा विषवेलीची मूळे समाजाची आर्थिक सामाजिक प्रगती खच्ची करतात, आणि गंमत अशी की असे भीषण अन्याय शहाजोगपणे प्रतिष्ठित समाजधुरिणांकडूनही स्वीकारले जातात.

तात्पर्य इतकेच, की विज्ञानयुग औद्योगिक क्रांतीपासून यंत्रविज्ञान क्रांतीकडे झपाटयाने झेप घेत आहे. ह्या प्रबोधनाच्या समरप्रसंगी जीवनांतील अचाट बदलाचा सहन न होणारा वेग, ताण अस्थिरता, भावनिक दारिद्र्य तंत्र-विज्ञानाच्या युगात माणसाची चाललेला क्रयबिक्रय अशासारख्या अनेक कारणांमुळे माणसाचे जीवन रिते भकास होत आहे. आजच्या लोकशाही जीवनात स्वातंत्र्य मूल्यांना कमालीची आगतिकता आली आहे. (वाढती लो. आणि नुकतीच झालेली भिवंडी दंगल) मुक्त लैंगिक संबंधातून निर्माण होणारे प्रश्न दिवसेंदिवस अधिकाधिक बेताल बनत आहेत. अनेक क्रांतीकारक शोधांमुळे

जग लहान बनले आहे खरे पण माणसाचे एकाकीपण वाढतेच आहे. परस्परशोषण, अंधश्रद्धा, धर्माच्या शाश्वत मूल्यांचा अतिरेक (खलिस्तान) अशासारख्या अनेक अध:पतनाच्या खुणा पुढारलेल्या राष्ट्रात प्रथम दिसू लागल्या हे विशेष. अमेरिकेतील सुशिक्षित गुन्हेगारीचे वाढते आकडे, मदिरा, अफू, चरस, गांज्या अशा पदार्थांचा वाढता काळाबाजार इ. चा जमाखर्च बघता ही गोष्ट सहज लक्षात येईल.

सत्ता, संपत्ती, थाटमाट, वैभव, पैसा यात खरी मन:शांती कधीच नाही. आपण नेहमीच त्याच्या मागे लागतो आणि कालांतराने रिते आणि भकास होऊन परत येतो. आणि ते रितेपण घालवण्यासाठी कोणत्यातरी कृत्रीम गुंगीच्या आधीन होतो. आज समृद्ध युरोपीय राष्ट्रांत कोकेन, हेरॉईन सारख्या आमली पदार्थांना बळी पडणाऱ्या तरुणांची संख्या वाढत असून सरकारचा तो डोकेदुखीचा विषय का बनला आहे ? त्याचे उत्तर ह्यात मिळेल.

आपण देवळात जातो, नारळ फोडतो, गुरुमंत्र घेतो पण कुठलाही गुरू किंवा पंथ खरी मन:शांती कधीच देऊ शकत नाही. आपले जीवन व्यापुन टाकणारे वैफल्य, पोकळी, असमाधान ह्यावर मात करणारा श्रद्धाभाव व आंधळ्या भक्तीचा त्याग यामुळेच खरी मत:शांती लाभते. हीच नि:संशय जीवनप्राप्तीची गुरुकिल्ली आहे.

(संदर्भ : अध्यात्माकडून विज्ञानाकडे)

श्री. हेमंत इनामदार, श्री. रा. भ.
पाटणकर श्री. हरिप इ...

□

# प्रकाश निर्मिती करणारे सजीव

★

**कु. पल्लवी शशीकांत जाधव,** द्वितीय वर्ष शास्त्र

शहरातील विजेच्या दिव्यांच्या झगमगाटातून बाहेर गेल्यास झाडाझुडुपांतून रात्रीच्या वेळी मधूनच छोटासा लुकलुकणारा उजेड दिसतो. हा उजेड एका छोट्या उडणाऱ्या किड्यामुळे असतो. या किड्यालाच आपण काजवा म्हणतो. दाट जंगलात कधीकधी एखाद्या मोठ्या झाडाची फांदी अंधारात मधूनच हिरवट प्रकाशाने उजळताना दिसते किंवा खोल समुद्रात पाण्यावर रात्री हिरव्या निळ्या रंगाची चकाकणारी चादर अंथरल्यासारखी दिसते. याही वेळी हिरवा-निळा प्रकाश निर्माण करण्यास कारणीभूत वेगवेगळे सजीवच असतात. अशा प्रकारे प्रकाश निर्माण करणारे सजीव पृथ्वीवर सर्व ठिकाणी आढळतात. जमिनीवर राहणाऱ्या अशा सजीवांची संख्या मात्र समुद्रतळांत वावरणाऱ्या सजीवांच्या तुलनेत फारच कमी आहे. गोड्या पाण्यात अगदी तुरळक सजीव प्रकाश निर्माण करू शकतात.

जमीनीवरील सजीवात काजवा हा जवळ जवळ सर्वांना माहित असणारा कीटक आहे. परंतु जंगलात कुजणाऱ्या झाडांच्या ओंडक्यावर वगैरे वाढणाऱ्या बुरशीमुळे प्रकाश निर्माण होतो हे फारच थोड्यांना

माहित असेल. समुद्राच्या पाण्यात तरंगणारे अगदी सूक्ष्म सजीव, ज्यांना डिनोफ्लॅजेलेटस् असे म्हणतात. त्यांची संख्या इतकी अफाट असते की प्रत्येक सूक्ष्म प्राण्याने निर्माण झालेला प्रकाश एकत्र येऊन समुद्राचा बराच पृष्ठभाग चकाकू लागतो. Coetenterata वर्गातले छत्रीसारखे दिसणारे अनेक पारदर्शक जेली फिश, झिग्यांच्या जातीतील काही प्राणी तर मृदुकाय प्राण्यांतील स्क्वीड नावाचे जलचर इत्यादी. त्यांच्या प्रकाश निर्मितीबद्दल प्राणीशास्त्रज्ञांना माहीत असून त्यांच्यावर बरेच संशोधन झाले आहे या प्राण्यांमधील बहुसंख्य प्राणी अपृष्ठवंशीय असून ते समुद्रातील अत्यंत खोल अंधाऱ्या पाण्यात वावरतात. पृष्ठवंशीय प्राण्यात फक्त काही सागरी मासेच स्वत: प्रकाश निर्माण करू शकतात.

प्रकाश निर्माण करणाऱ्या पद्धतीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की जरी विविध प्रकारच्या सजीवांमध्ये ही किमया दिसली तरी त्या मागची रासायनिक प्रक्रिया जवळजवळ सर्वत्र सारखी असते या क्रियेत मुख्यत: रासायनिक शक्ती (Chemical energy) चे प्रकाश शक्ती (light energy) मध्ये रूपांतर होते. असे रूपांतर शंभर टक्के Efficiency ने होते आणि शिवाय जराहि उष्णता निर्माण न करता होते. अशा प्रकारच्या प्रकाशास 'थंड प्रकाश' किंवा 'Cold light' असे संबोधतात. प्रकाश निर्माण करणाऱ्या बहुसंख्य प्राण्यांमधे ल्युसिकेरिन नावाचे एक द्रव असते. हे द्रव्य ल्युसिफसेज नावाच्या लवणाच्या सान्निध्यांत प्राणवायूशी संलग्न होते व ऑक्सिल्युसिफेरिन नावाचे द्रव्य, पाणी व कर्बद्विप्राणील वायू तयार होतो. हे ऑक्सिल्युसिफेरिन संयुग स्वत:ची रासायनिक शक्ती (Chemical energy) थोडाकाळ साठवून नंतर सोडून देते व त्याच शक्तीचे रूपांतर प्रकाशात होते. अर्थात ल्युसिफेरिन व ल्युसिफरेजचे अनेक प्रकारे अस्तित्वात आहेत.

प्रकाशाची निर्मिती प्रामुख्याने तीन प्रकारांनी होते. एक प्रकार म्हणजे पेशींच्या अंतर्गत भागात रासायनिक क्रिया होते व तेथेच प्रकाश दिसतो. दुसरे म्हणजे या क्रियेत लागणारी द्रव्ये पेशीबाहेर स्त्रवतात व तेथे रासायनिक क्रिया होते. तिसऱ्या प्रकारात मात्र प्रत्यक्ष प्रकाश निर्माण करणारे जंतू दुसरा एखादा सजीव आपल्या शरीरात साचवून ठेवतो व त्यांच्या मदतीने प्रकाश निर्माण करतो. या प्रकारे प्रकाश निर्माण करण्यासाठी निरनिराळे प्राणी विविध पद्धती वापरतात. काही जलचरांची आपण उदाहरणे बघितल्यास याची आपल्याला निश्चित खात्री पटेल.

नॉक्टिल्यूका या समुद्रातील सूक्ष्म एकपेशीय प्राण्यांत पेशीच्या आत रासायनिक क्रिया होऊन संपूर्ण प्राणी क्षणभर चमकतो. ही चमकण्याची क्रिया १/१० सेकंद असते व ती ठराविक कालावधीनंतर आपोआप होत रहाते. काही जेलीफिश मध्ये प्रकाश १ सेकंदभर टिकतो तर झिंगे आणि स्क्वीड मध्ये जवळजवळ २० सेकंदापर्यंत प्रकाश दिसतो. कीटोप्टेरस किंवा पॅडल वर्म नावाच्या समुद्रकृमीं मध्ये पेशीबाहेर स्त्रवलेल्या द्रव्यांची रासायनिक क्रिया होऊन जवळ जवळ ५ मिनिटांपर्यंत संपूर्ण कृमी चकाकत रहातो. पेन्नाटयूला किंवा सी-पेन नावाचा समुद्रातील एक प्राणी म्हणजे एक छोटया छोटया प्राण्यांची एक वसाहतच असते. यातील प्रत्येक छोटा प्राणी प्रकाश निर्माण करू शकतोच. हे सर्व प्राणी एकमेकाला मज्जातंतूसारख्या पेशीनी जोडलेले असतात या प्राण्याला एखाद्या भागास स्पर्श केल्यास प्रकाश निर्मितीची एक लाट निर्माण झाल्याप्रमाणे हळूहळू सर्व प्राणी चकाकू लागतात ! ही जणू एक प्रकारची समुद्रातील दीपमाळच ! पोरिकयाईस नावाच्या माशांमध्ये तोंडापासून मागे दोन्ही बाजूला प्रकाश निर्मिती करणाऱ्या ग्रंथी असतात त्या ग्रंथी मज्जासंस्थेच्या नियंत्रणाखाली असतात. योग्य वेळी तोंडापासून सुरू होऊन मागपर्यंत एका मागोमाग एक सर्व ग्रंथी प्रकाशाने उजळून निघतात, अगदी एखाद्या बोटीवरील दिव्यांप्रमाणे. काही मासे शरीरात विवक्षित जागी प्रकाश निर्माण करणारे जंतू पाळतात. हा माशांच्या पारदर्शक शरीरांतून बाहेर सहज दिसू शकतो. ॲनोमॅलॉप्स नावाच्या माशाला तर प्रकाश निर्मिती करणारी ग्रंथी हवी तेव्हा मागे पुढे ढकलता येते. गोनोस्टोमा सारख्या काही माशांमध्ये डोळ्यासारखी रचना असणारी प्रकाश-ग्रंथी असते. तिचा आकार साधारणपणे कपासारखा असून त्याची बाहेरील बाजू काळया रंगाची असते. आतल्या बाजूला प्रकाश परावृत्त करणारा पडदा असतो. या पडद्यापुढे

प्रकाश ग्रंथीच्या पेशी असतात आणि या पेशींच्या समोर भिंगासारख्या पेशी असतात. साहजिकच यांचा प्रकाश एखाद्या विजेरी प्रमाणे बाहेर दिसतो. मृदुकाय प्राणी स्क्वीड यांच्यातही प्रकाश ग्रंथीची रचना जवळ जवळ अशीच असते. काही मासे स्वतःचे स्वतः ल्युसिफेरिन द्रव्य करू शकत नाहीत. मग अशा वेळी दुसऱ्या प्राण्यांकडून ते प्राप्त केले जाते. या विविध उदाहरणांवरून असे दिसते की निसर्गात अनेक प्राणी आपापल्या परीने अगदी साध्या सोप्या किंवा अत्यंत प्रगत पद्धतीने प्रकाश निर्मिती करू शकतात.

सर्वसाधारणपणे सजीवनिर्मित प्रकाश निळसर किंवा हिरवट असतो. यॅमॅटोलॅपास नावाच्या स्क्वीड मध्ये तांबडा प्रकाश दिसतो तर काजव्याचा प्रकाश पिवळसर असतो. अर्थात फारच थोड्या प्रमाणात प्राण्यांचा अभ्यास झाल्यामुळे इतर रंगाचे प्रकाश किरण निर्माण होतात किंवा नाही याची माहिती नाही.

निर्माण केलेल्या प्रकाशाचा वापर नेमका कशासाठी केला जातो याबद्दलही फारशी माहिती उपलब्ध नाही. काजव्यामध्ये हा प्रकाश एक प्रकारचा संकेत म्हणून नर-मादी यांच्यामध्ये वापरला जातो. कदाचित माशांमध्ये पण त्याचा हाच उपयोग असावा. काही प्राण्यांमध्ये विशेषतः जे समुदायाने राहतात त्यांच्यात प्रकाश संकेताचा वापर संपूर्ण समुदाय एकत्र रहावा म्हणून केला जातो. काही प्राणी शत्रूपासून सुटका करून घेण्यासाठी शरीराचे काही चमकणारे भाग सोडून पळून जातात व आपला जीव वाचवू शकतात. अशा प्रकारे निर्माण केलेल्या प्रकाशाचा वापरही तितकाच विविध आहे.

□

# आजच्या मराठी नाटकातील स्त्री-दर्शन

**कु. राजश्री खैरे,** १२ वी ए. आर्टस्

नाटक हे असे एक बहुमूल्य माध्यम आहे की ज्यामुळे प्रत्येक मराठी माणसावर पाहिलेल्या नाटकाचा ठसा उमटला जातो आणि त्यातूनच प्रत्येक माणूस काही ना काही उचलत असतो, आपल्यात सामावून घेत असतो. मग ते चांगले असो अगर वाईट असो !

आजच्या नाटकांचा विचार केल्यास आपणास असे लक्षात येते की आजची नाटके फक्त गल्लाभरूच नाटके आहेत. अशा नाटकातून स्त्रीचीं अनेक आदर्श रुपे गाळून तिला फक्त एक 'स्त्री' म्हणूनच प्रेक्षकांसमोर ठेवले जाते. पूर्वी नाटकातून प्रत्येक स्त्री-रुपाचे दर्शन आपणास पहावयास मिळत होते. ती कधी आपले मातृत्व प्रेक्षकांसमोर सादर करीत होती. तर कधी साध्वी पतिव्रता प्रेक्षकांना मोहून जात होती, कधी ती एक अल्लड बहीण म्हणून प्रेक्षकांची मने जिंकत होती. तर कधी सून म्हणून सासू-सासऱ्यांच्या सेवेत आपणास दिसत होती. पण हे चित्र आजच्या काळात बऱ्याच प्रमाणात बदललेले आपणास दिसते.

आजच्या मराठी नाटकात स्त्री ही काय ऑफर करताना दिसते. तर हीच स्त्री कधी इरसाल मेव्हणीच्या भूमिकेत आपणास पहावी लागते. जी आपल्या बहिणीशी

प्रतारणा करून आपल्या मादक सौंदर्याचे दर्शन आपल्या मेव्हण्यास दाखवताना आपण पहातो. कधी कधी तर हीच आदर्श स्त्री आपल्या शरीराचा बाजार मांडून बसा लेली आपणास दिसते. फक्त अशाच प्रकारची नाटके दाखविली जातात असे नाही, काही चांगली नाटके आपण पहातो. त्यावरून आपण स्त्री-प्रतिमेबद्दल खूप चांगले विचार करतो. पण अशी नाटके पाहाण्यास किती जण जातात ? आपले आजोबा-आजी ही नाटके पहाताना दिसतात आणि लगेचच आपल्या लक्षात येते की आजची तरुण-पिढी ही फक्त स्त्री दर्शनांसाठीच असलेल्या माध्य-मांचा उपयोग करतात. आजचा प्रत्येक तरुण हा वास-नेने घेरला जात आहे. कारण त्यांच्यापुढे तसेच दर्शन घडवले जाते आणि हेच अनुकरण समाज करत असतो.

निर्माते अशी नाटके दाखवत नाहीत की ज्यामुळे स्वत: तोटयात जाऊनदेखील स्त्री ची अनेक चांगली रुपे प्रत्येक तरुणाच्या मनात ठसविली जातात, आणि स्त्रियांना आदराचे स्थान मिळवून दिले जाते. आई, सून, पत्नी, बहीण अशी स्त्रीची अनेक रुपे फारच थोडे निर्माते प्रेक्षकांसमोर आणतात आणि नाटके बघतात आपले आजोबा-आजी ! त्यांच्या मनावर अशी रुपे ठासून काय होणार ?

आपला समाज बिघडत चालला आहे, अशी गल्ला-भरू नाटके व चित्रपट पाहूनच ना ? प्रत्येक निर्माता आपण तोटयात येणार नाही हेच पहातो आणि त्यासाठी स्त्रीला कमीत कमी वस्त्रात प्रेक्षकांपुढे उभे केले जाते. तिच्यावरचे प्रणय-प्रसंग अधिक कसे भडक करावेत ? याचाच विचार निर्माता करीत असतो आणि नाटका-तील एक अतिशय देखणी स्त्री पैशासाठीच कमीत कमी वस्त्रात आपल्यासमोर बिनदिक्कत येऊन उभी राहाते. प्रेक्षकांसमोर थोडा रंगेलपणा दाखवून निर्मात्याचा गल्ला भरून देते आणि अशीच नाटके मोठ्या आवडीने पहाते आजची तरुण पिढी !

या सर्व गोष्टीचा परिणाम समाजावर होतच असतो. पूर्वी तो फारच चांगला होत होता तो आत्ता फारच वाईट होऊ लागला आहे. बलात्काराचे प्रमाण फारच वाढले आहे. पूर्वीच्या साध्वी पतिव्रता गेल्या नि थिल्लर आशू, ऑफर, चल आटप लवकर अशी नाटके आपल्या-समोर आली. आजच्या प्रत्येक निर्मात्याचे लक्ष आपल्या गल्ल्यावर असते तर त्याचा गल्ला भरून देणाऱ्या प्रत्येक तरुणाचे लक्ष हे स्त्री कडे असते. आजच्या मराठी नाटकातील एक एक प्रसंग आजचे तरुण मनात साठ-वितात आणि आपल्याच समाजातील, आपल्याच देशा-तील आपल्याच बहिणीचा बळी घेतला जातो. आपल्या देशाच्या स्त्रीची इज्जत राखणे, तिला सन्मानाने वागवणे हे त्या त्या देशातील प्रत्येक पुरुषाचे कर्तव्यच आहे हे आपण विसरत चाललो आहोत. समोर जे दिसते त्याचेच अनुकरण समाजात केलेले आपणास दिसते.

आजची तरुण पिढी ही चुकीच्या मार्गाने जात आहे. याला आपणच जबाबदार नाही का ? आपणच स्त्रीची अनेक आदर्श-रुपे न दाखवता स्त्री ला फक्त 'स्त्री' म्हणूनच दाखवतो. मग आपला समाज का नाही बिघड-णार ? माझ्या मते हे सर्व बदलायला हवे. मराठी नाटक हे समाजाला एक वेगळे वळण देणारे माध्यम आहे. याचा उपयोग करून आपण समाजापुढे स्त्रीला फक्त 'स्त्री' म्हणून न दाखवता तिची आदर्श रुपे दाखवायला हवी. तिचे मातृत्व दाखवून आजच्या प्रत्येक तरुणाला मातेचे प्रेम समजले पाहिजे. तिचे पातिव्रत्य पाहून प्रत्येक पुरुष आपल्या पत्नीस जरुर समानता देईल, नि स्टेजवर आपल्या बहिणीचे रूप पाहून आजच्या तरुणांना त्यांच्या घरी असणाऱ्या बहिणीची आठवण झाली पाहिजे. तिचे संरक्षण करण्याचे कर्तव्य त्याला समजले पाहिजे.

मग आजची तरुण-पिढी का बरे चुकेल ? त्याच्या मनातल्या वासनेला आळा बसेल आणि स्त्रीयांनादेखील एक आदराचे स्थान मिळेल. स्त्री जीवन हे खरोखरच आदर्श जीवन आहे हे आजच्या मराठी नाटकातून नाही का दाखवता येणार ? आपल्या समाजातील क्रूरता नाही का थांबवता येणार ? स्त्रियांना एक आदर्श स्थान आपण नाही का मिळवून देणार ?

हे सर्व जर आजच्या मराठी नाटकातून दिसले तर आपला समाज..आपला देश..निश्चित एक आदर्श निर्माण करील. आपला समाज, आपला देश आदर्श होणार तो आजचे मराठी नाटक पाहूनच ! आणि स्त्रियांना सन्मा-नाने वागवले जाणार आजचे मराठीनाटक पाहूनच !

# इंदिरा प्रियदर्शनी..एक अनुपम व्यक्तिमत्व

★

**वर्षा दीक्षित,** १२ वी वाणिज्य

आपल्या लाडक्या पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांचे व्यक्तिमत्व शब्दात व्यक्त करणे कठीण आहे.

१९ नोव्हेंबर १९१७ ला अलाहाबादच्या आनंद भवन मध्ये इंदिराजींचा जन्म झाला तेव्हा नेहरुंना अभिनंदनपर पाठविलेल्या पत्रात सरोजिनी नायडू म्हणतात, " भारताच्या नवजात आत्मांकुरास माझे प्रेमपूर्वक चुंबन." ' नव आत्मांकुर ' हा शब्द इंदिराजींनी किती सार्थ केला.

त्यांचे लहानपण अतिशय एकाकी होते. कारण तेंव्हा स्वातंत्र्य लढयात त्यांच्या घरातील मोठया माणसांनी स्वत:ला झोकून दिले होते. लहानपणीच इतक्या एकाकी वातावरणात रहावे लागले असते तर एखादा सामान्य माणूस कुठल्या कुठे बहकला असता. पण इंदिराजी असामान्य म्हणून त्यांनी आपला तोल न ढळू देता आपला व राष्ट्राचा विकास केला.

त्यांच्या अंगातील गुण म्हणजे अमाप धैर्य, दृढनिश्चय शिस्त, कर्तव्यतत्परता, उत्साह इ.

त्या शिक्षणासाठी पुणे, मुंबई, विश्वभारती, ऑक्स_फर्ड विद्यापीठ इ. ठिकाणी राहिल्या त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात पूर्व पश्चिमेचा सुंदर मिलाफ दिसून येतो. तसेच त्यामुळे त्यांना अनेक संस्कृतींची जवळून ओळख झाली. त्यांनी प्रत्येक ठिकाणच्या चांगल्या गोष्टी घेतल्या.

त्यांना लहानपणापासून राष्ट्राबद्दल अभिमान होता. आपणही काही कार्य करावे या हेतूने त्या कांग्रेसच्या कार्यालयात बारा वर्षाच्या असताना सभासद होण्यासाठी गेल्या पण वय लहान म्हणून त्यांना कांग्रेसचे सभासद होता आले नाही. तेंव्हाच त्यांनी छोटया मुलांची संघटना स्थापन करण्याचे ठरवले व आपल्या आईला त्या संघटनेचे नाव काय ठेवू असे विचारलें. तेव्हा कमला नेहरुनी ' वानरसेना ' हे नाव सुचवले व त्यांची संघटना स्थापन झाली व त्यात ६००० वर मुलंमुली सभासद होती. ही मूलं गुप्त पत्रे क्रांतीकारांना पोचवण्यवरच फक्त समाधान मानत नसत तर इंग्रजांवर छोटे छोटे हल्लेही करत व त्यांच्या कामात अडथळे आणत.

१९३१ ते १९३४ पर्यंत त्या पुण्यामुंबईत होत्या. पुण्यात त्या श्रीमती वकील यांच्या ' ज्युपिल्स् ओन स्कूल ' मध्ये शिकल्या. तेथून ३४ साली त्या ' शांती-निकेतनला ' गेल्या, पण ६ महिन्यातच त्या तिथून आई बरोबर युरोपात गेल्या. तेंव्हा नेहरुंना लिहिलेल्या पत्रात रविंद्रनाथ म्हणतात, " इंदिरेसारखी मुलगी शांतिनिकेनात असणे हा शांतीनिकेतनाचा गौरव आहे." १९३६ मध्ये त्या १९ वर्षाच्या असताना त्यांच्या आईचे दु:खद निधन झाले. पण त्या खचल्या नाहीत. पुढे ऑक्सफर्डच्या सोमरव्हिले कॉलेजमध्ये शिकल्या व भारतात परत आल्यावर कॉलेजमध्येच ओळख झालेल्या फिरोज गांधींशी २६ मार्च ४२ मध्ये विवाह केला. मुंबईत भरलेल्या ४२ च्या अधिवेशनाला त्या उपस्थित होत्या. त्या अधिवेशनात ' छोडोभारत ' चा ठराव झाला. तेव्हा त्यांना अटक होऊन ८ महिन्यांची शिक्षा झाली.

१९४४ मध्ये मुलांची आवड असणाऱ्यां इंदिराजींना पहिला मुलगा झाला तो म्हणजे पंतप्रधान राजीवजी

नंतर दोन वर्षांनी संजय झाला. भारत स्वतंत्र झाला. त्या नेहरुंची देखभाल करून काळजी घेऊ लागल्या.

१९५५ मध्ये त्या काँग्रेसच्या कार्यकारणीच्या सदस्या झाल्या. १९५९ मध्ये इंदिराजी काँग्रेसध्यक्ष झाल्या. १९६२ मध्ये त्यांच्या पतीचे दु:खद निधन झाले.

१९६४ मध्ये पंडीतजींचे निधन झाले. त्यानंतर त्या शास्त्रीजींच्या मंत्रीमंडळात प्रथम १९६४ मध्ये माहिती व नभोवाणी मंत्री झाल्या. व १९६६ मध्ये त्या प्रथम भारताच्या पंतप्रधान झाल्या. पंतप्रधानाच्या कारकिर्दीत त्यांनी बांगलादेश स्वतंत्र केला (१९७१)

१९७० मध्ये त्यांनी संस्थानिकांचे तनखे त्यांना भरपाई देऊन बंद केले. १९६९ मध्ये त्यांनी बँकाचे राष्ट्रीयकरण केले. १९७७ च्या निवडणुकांत त्या पराभूत झाल्या पण १९८० मध्ये त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. त्यानंतर त्यांनी १९८२ मध्ये दिल्लीत 'एशियाड' चे आयोजन केले. १९८३ मार्च तध्ये अलिप्तराष्ट्रांची परिषद दिल्लीत भरवली. त्याचे अध्यक्षपद भूषविले. जून ८४ मध्ये त्यांनी सुवर्णमंदीरात लष्करी कारवाई केली त्यांच्या कारकिर्दीचा एक डाग म्हणजे त्यांनी जाहीर केलेली आणीबाणी !

इंदिराजीच्या आठवणी सांगायच्या तर पाने पुरी पडणार नाहीत. पण त्यांची एकच खास आठवण सांगते. त्या जेव्हा पंतप्रधान नव्हत्या तेव्हा एक प्रसिद्ध गायिका त्यांना भेटायला गेली व तिने त्यांना एक पेन भेट दिले. त्यावर 'पंतप्रधान इंदिरागांधी' असे कोरलेले होते ते बघताच त्या म्हणाल्या मी आता पंतप्रधान नाही. तर ती गायिका म्हणाली, "पुन्हा पंतप्रधान व्हाल तेव्हा वापरा.' थोडे वर्षांनी इंदिराजी पुन्हा पंतप्रधान झाल्या तेव्हा ती गयिका काही कामासाठी त्यांना भेटायला गेली. त्यांनी तिचे काम समजावून घेतले व रिमार्क लिहायचा होता म्हणून सेक्रेटरीने नेहमीचे पेन पुढे केले पण त्यांनी ते पेन न घेता आपले ड्रॉव्हर उघडून त्या गायिकेने दिलेले पेन काढले व हसून रिमार्क दिला व सही केली.

त्या आपल्या छोटया छोटया अधिकाऱ्यांची सुद्धा खूप विचारपूस करत. त्यांनी अशी विचारपूस केली की अधिकाऱ्यांना गलबलून येई. जीवनात कुठलीही गोष्ट फुकट मिळत नाही हे त्यांनां माहीत होते.

'Greater the obstacle, more glory in over. coming it' हे त्यांचे तत्त्व होते.

तसेच 'ऐकावे जनाचे, करावे मनाचे' हे सुद्धा त्यांचे तत्व होते. त्यांना फ्रेंच वीरबाला 'जोन ऑफ आर्क' बद्दल विशेष आकर्षण होते व काश्मीरची राणी 'हब्बा खातून' ही त्यांची इतिहासातील आवडती व्यक्ती होती.

त्यांची किर्ती अशी होती की जी लोक निंदेने पुसली जाणार नाही. शेक्सपिअरने ज्युलियस सीझरच्या तोंडी एक वाक्य टाकले आहे–

'Cowards die many times before the rea death, The valiant tastes the death but once हे त्यांना लागू होते.

श्रीकृष्णाने अर्जूनाला म्हटले होते, 'जगलास तर जगाचा स्वामी होशील, रणी कामी आलास तर अमर होशील.'

इंदिराजींनी देशासाठी हौतात्म्य पत्करलं व त्या अमर झाल्या.

□

# स्त्री आणि समाज

★

**विक्रांत भ. कांबळे,** द्वितीय वर्ष वाणिज्य

---

स्त्री आणि समाज ह्यांच्यातील परस्परसबंध हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा व जाणीवपूर्वक लक्ष देण्यासारखा विषय आहे.

पुरातन कालापासून (आपले मूळ पुरुष मनु महाराज ह्यांच्या लेखीही) स्त्रीला शुद्राइतकीच किंमत लेखली गेलीय. हजारो वर्षात अनेक आमूलाग्र बदल झाले. अनेक अनिष्ठ रूढींचा नायनाट झाला परंतु स्त्री आणि तिच्याकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन मात्र आहे तोच राहिला आहे. राज्ये गेली महाराजे, राजे, सुलतान नामशेष झाले. १५० वर्ष भारत पारतंत्र्यात होता. या देशात अनेक बदल सुधारणा झाल्या. पण समाजाचा एक मूलभूत आधारस्तंभ मात्र वर्षानुवर्ष तसाच मोडकळलेल्या अवस्थेत आहे. हा आधारस्तंभ मजबूत करण्याचे, त्यात जिद्द आणण्याचे यत्न अनेक थोर युग पुरुषांनी केले. राजा राममोहन रॉयनी सतीची चाल बंद करण्याचा कायदा सरकारला अस्तित्वात आणण्यास भाग पाडले व एका भीषण नाटयावर पडदा पडला. आज २० व्या शतकात सतीची चाल ही पद्धत पूर्णतः नामशेष झाली आहे. महात्मा ज्योतीबा फुले व महर्षि कर्वे ह्यांच्या भीष्म प्रयत्नांनी स्त्री शिक्षण स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यात यशस्वी झाले. तरीही आज आपण असे छातीठोक पणे म्हणू शकत नाही. की सामाजीक पारतंत्र्यातून भारतीय स्त्री पूर्णपणे सुटली आहे. नाही कदापी नाही ! ह्याला जबाबदार कोण? तुम्ही, आम्ही हा समाज अन प्रत्यक्ष स्त्री सुद्धा !

आपला समाज, आपली संस्कृती ही मुळातच पुरुष प्रधान आहे. व ती तशीच ठेवण्यात आम्हा पुरुषाप्रमाणें स्त्रियांचाही हात आहे. मुलगी झाली म्हणताच त्या नवजात अर्भकाचा पिता जेवढा दुःखी होत नसेल त्याही पेक्षा ते मातृत्व लाभलेली माता होते. भारतात मुली दुर्भाग्याचे बाळकडू पिऊनच जन्माला येतात. मुलाला जन्म देणारी स्त्री श्रेष्ठ तर मुलीला जन्म देणारी हिण-कस ठरली जाते. मुलगा असेल तर आईच्या अंगावर अधिक व जास्तवेळ पिणार. मुलगी असेल तर लवकर तोडली जाणार. मुलाच्या आकांक्षेने नव्या गर्भधारणे-साठी ! 'पत्र नव्हे मित्र' असा घोष करणाऱ्या मुंबई-तील संस्कारशील वर्तमान पत्रातील मजकूर फारच बोलका आहे. "तुमचे भविष्य तुमच्या मुलाच्या हातात." आणि हेच संस्कारशील मन स्त्रीला जन्मा-पासून दुय्यम दर्जाची वागणूक देते. वैद्यकीय शास्त्रातील शोधामुळे गर्भपाताअगोदर स्त्रीच्या उदरातील गर्भ स्त्री की पुरुषाचा आहे हे ओळखता येते. खरे पहाता ह्या शोधाचा उपयोग गर्भ सुदृढ व निरोगी अवस्थेत आहे की नाही ह्यासाठी झालाय. पण मुंबईत तपासणी अंती असा निष्कर्ष निघालाय की ८००० पैकी ७९९९ हे गर्भपात केवळ मुलगी आहे म्हणून केले गेले आहेत जणू शास्त्राआधारे जन्माला येण्या अगोदर पासूनच स्त्रीवर अत्याचार होऊ लागला आहे असं वाटतं. स्त्रीचं आयुष्य हे दरएक क्षणाला तिचं तिलाच एक आव्हान म्हणून पुढं ठाकलं आहे. मग भावंडात एखाद्या गोष्टी-वरचा तिचा हक्क असो वा घरातील त्या मुलीचे स्थान हे बाळकडू व कमीपणाची भावना जागृत करण्याचे व बिंबवण्याचे अमूल्य कार्य आई प्रत्यक्ष जन्मदात्री म्हणज एक स्त्रीच करीत असते.

आज २० व्या शतकात ह्यात बराच फरक पडलाय. आपल्या बुद्धीने, चातुर्याने स्त्रीने बरीच पुढे भरारी मारली आहे. व समाज पुरुषाला दाखवून दिले की बघा आम्ही कुठे कमी पडतोय का ? अन् ह्याचाच पडताळा की काय म्हणून आपल्या भारतासारख्या विशाल देशाची धुरा तीन दशके आपल्या समर्थ बाहूत पेलला. स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी अन् आपल्या देशालाच काय पण साऱ्या जगाला दाखवून दिले की तुम्ही जरी आम्हांला अबला, दुर्बल मानलं तरी आम्ही अबला नाही, तुमच्या इतक्याच किंबहुना तुमच्यापेक्षा जास्त सबल धीरोधात्त व खंबीर आहोत.

आज आपण २१ व्या शतकाकडे वाटचाल सुंदर भविष्याची, आधुनिकतेची स्वप्ने पहात करीत आहोत. मग समाज बांधवानो विचार करा. "कॅम्पुटरच्या युगात प्रवेशायचं ते काय १८ व्या शतकातील वाहानाने" आज स्त्री मुक्त आहे. सर्व क्षेत्रात ती चमकत आहे असा कितीही घोष केला तरी विचार करा. काय खरो-खरच ती मुक्त आहे. नाही नाही अजूनही ती जोखंडात आहे गुलामगिरीच्या अन् त्याचं नाव आहे हुंडा ! दिसायला, वाचायला, मागायला, घ्यायला सोपी वाटणारी वस्तु पण एका सुंदर भावविश्वाची, नव्या नव्हाळीची संसार स्वप्ने जी तारूण्यात पदार्पण केल्यापासून उराशी बाळगत येणारी नववधू अन् केवळ आईबापाच्या असहायतेमुळे आपल्या राजकुमाराची व त्याच्या माता-पित्याची आघोरी हौस पूर्ण करता न आल्यामुळे हकनाक बळी जाणारी जणू मृत्यूपूर्वी सजवली जाणारी एक निष्पाप बाहुली आगीच्या खाईत लोटली जाते. का तर ती एक स्त्री आहे, अन्यायाचा प्रतिकार करू शकत नाही, अबलत्व लादलय तिच्यावर ह्या बेगडी समाजान. ह्याला जबाबदार आहोत. आपण समाज अन् प्रत्यक्ष जन्मदाते सुद्धा जे लहानपणापासून हाच भेदभाव करीत आले आहेत. हा मुलगा आणि ही मुलगी जणू "अरे ये मेरा बेटा ले आयेगा धनका पेटा, हाय ये मेरी लडकी ले जायेगी मेरे जीवनकी सारी पुंजी." अन् ह्याच कल्पनेतून जन्म घेतात अघोरी कृत्ये. आपल्या लेकीस सुनेला छळण्यास, मारण्यास तिचा जीवनअंत करण्यास कारणीभूत होतात. अशा अनेक पऱ्या आपली स्वप्नें उराशी घेऊन गेल्यात अनंताच्या प्रवासाला. ज्यांची नावे घेतानाही मनाचा थरकाप होतो.

☐ मंजुश्री सारडा पतीच्या अविवेकीपणाचा कळस.

☐ २९ जानेवारी १९७७ पैशाच्या लालचीपणातून सून पुष्पादेवीची सासु लिचमादेवीकडून जाळून हत्या.

☐ शैला लाटकर सासऱ्याकडून आलेली रक्कम संसाराला जणू कमी पडली म्हणून नवरा व सासूने जिवत जाळून जणू न पेलवणारा असा हुंडा हस्तगत केला व एक अलौकिक पराक्रम गाजविला.

☐ ममता अगरवाल नवऱ्याच्या संशयी स्वभावामुळे बळी गेलेली युवती. अशा अनेक बातम्या दररोज वाचताना मन बेचैन होतं. कधी संपणार ही लालसा. अविवेकीपणा. मन विचार करतंय "अरे आपण २१ व्या शतकात पदार्पण यशस्वीरित्या करतोय की विषय राहूनही पुढच्या सेमीस्टरला एटीकेटीच्या साह्याने पुढे ढकलल्या जाणाऱ्या विश्वास गमावलेल्या विद्यार्थ्यासारखे एक शतकातुन दुसऱ्या शतकात जाणार आहोत.

समाजातील मुठभर बंधु-भगिनींनी उठवलेल्या संपूर्ण स्त्रीमुक्ती चळवळीस हातभार लावा. आजच्या युवतीला व उद्याच्या मातेला ह्या हुंड्याच्या बंधनातून मुक्त करा. आपोआपच उद्याची येणारी पिढी ह्या हुंडारूपी अजगराच्या विळख्यातून मुक्त होईल. व आपल्याला दुवा देईल अन् जन्माला येईल एक निकोप, सदृढ असा भारत जो तेजस्वीतेनें पुढे सरकतोय. त्या तेजाला वलय येऊ दया. आत्मविश्वासाचं अन् त्यासाठी हवय पुर्ण स्त्रीमुक्तोच "तोरण" जेव्हा प्रत्येक युवक शपथ घेईल हुंडा घेणार नाही स्वतःच्या पत्नीला समानतेचा दर्जा देईल, तिच्याकडे उपभोगाची वस्तूपेक्षा एकजीवनसाथीदार म्हणून पाहील व शपथ प्रत्यक्ष आचरणात आणील

जेव्हा प्रत्येक सासू आपणही कधी सुन होतो हा विचार करील, प्रत्येक सासरा आपल्यालाही मुलगी आहे हे लक्षात आणील. प्रत्येक नवरा आपल्याला बहीण आहे हे लक्षात ठेवील.

☐

# कोकंब

★

कु. संध्या बा. देशमुख, द्वितीय वर्ष शास्त्र

महाराष्ट्रीय माणसाच्या जीवनात आमसूल हे नेहमी असतेच. हे आमसूल कोकंबाच्या झाडापासून करतात. रत्नागिरी, गोवा, कारवार या डोंगराळ व किनाऱ्याच्या कडेकपाऱ्यातून या झाडांची वाढ होते. तेथे त्याला रातांबी म्हणून ओळखतात. याशिवाय कोकमाला आम्लबीज, तीनरीडीक, कोकम, वाईल्ड मॅग्नोस्टीन् अशी नावे आहेत. तर वनस्पती शास्त्रज्ञांनी त्याचे नाव गार्सिनिया इंडिका असे ठेवले आहे. फ्रेंच वनस्पतीशास्त्रज्ञ 'गार्सिन' ह्यांच्या नावावरून त्याला 'गार्सिनिया' हे नाव दिले असावेसे वाटते. कोकमाची झाडे कुर्ग वायनाड इत्यादि ठिकाणी खूप वाढतात.

हा बहुवार्षिक वृक्ष असून उंच वाढतो. फांद्या लोंबत्या असतात. साल करडी असते. तर फांद्यांवर लव असून खोड गुळगुळीत असते. त्याची पाने लांबट, भाल्यासारखी असतात. रंग हिरवागार असतो. कोवळी पाने मात्र लाल तांबडी दिसतात. नोव्हेंबर ते फेब्रुवारीमध्ये फुले येतात. नर फुले व मादीफुले वेगवेगळी असतात. नरफुले फांद्यांच्या अगर पानांच्या बेचक्यात असतात. मादीफुले फांद्यांच्या टोकाला असतात. याची फळे एप्रिल–मे मध्ये येतात. कच्ची असताना हिरवी दिसतात. तर पक्व झाल्यावर त्याचा रंग गुलाबी काळपट तांबडा होतो. फळ वाटोळे, गुळगुळीत असते. आत ४ ते ८ बिया असून त्याला गर चिकटलेला असतो.

या झाडांसाठी जमीन रेताड ते लॅटराईट, खडकांची मातीची असलेली लागते. हवा दमट लागते. पाऊस भरपूर लागतो.

कोकंबाच्या फळाच्या सालीला आमसुले म्हणतात. पक्व फळांचे काप करतात. आत बिया गरात गुरफटलेल्या असतात. हा बलक बाजूला काढून भांड्यात साठवितात. त्याला रस सुटतो. या रसात मीठ घालतात. फोडीची साले प्रथम एक दोन दिवस सुकवून मग या रसात बुडवून ठेवतात. नंतर ती पुन्हा सुकवतात. परत रसात बुडवितात. याला 'पुटे देणे' म्हणतात. अशी ४–६ पुटे दिल्यावर आमसूल तयार होते. बाजारी मालाला आंब्याच्या कोयी व गर यांचे मिश्रण करून ते पाणी पुटे देण्यासाठी वापरतात. म्हणून ही आमसूले काळी लुसलुशीत व मऊ न दिसता अर्धवट किरमिजी रंगाची, वाळलेली व मिठाचे थर असलेली दिसतात. ती लवकर कोरडी पडतात. उत्तम आमसूल नेहमी तुकतुकीत, तेलपट, काळपट व मऊ असते. ते सहसा वाळत नाही. रस काढल्यावर बिया एका कोपऱ्यात साठवतात. व सवडीने उकळतात. त्यावर तरंग येतो. तो गोळा करून तेलाचे गोळे तयार करतात. यालाच आमसूलाचे तेल, भिरंडेल किंवा शिओब्रोपा ऑईल असे म्हणतात. साधारणपणे ३० टक्के तेल निघते. घुसळून काढलेले तेल फार स्वच्छ असते.

कुमठा व कारवार येथे पांढऱ्या कोकंबाची एक जात आहे ती तांबड्या कोकंबापेक्षा पित्तनाशक म्हणून प्रसिद्ध आहे.

कोकंब हा लागवडीस उत्तम आहे. यासाठी कलमे करणे फायदेशीर ठरते. मादी झाड लवकर लागावर येते. तर नर झाड म्हातारपणी लागावर येते. झाडे वेगवेगळी असल्याने ३० ते ३५ टक्के झाडे वाया जातात. मादी झाडावर कलमे करून लागवड करावी. २०, बाय

२० लागवड करावी. एकरी १०० झाडे लागतात. याचे उत्पन्न मात्र ८ ते १० वर्षांनी मिळते. दर एकरी सुमारे ४०० किलो आमसुले व १००० किलो तेल मिळते.

कोकंबाची कोवळी पाने आमांशावर पोटात देतात. पिकल्या फळांचा रस, साखर, मीठ एकत्र करून 'अमृत कोकम' तयार करतात. हे पित्तनाशक असून आतड्यांना मऊपणा येतो. पित्तामुळे अंगावर गांधी उठल्या तर फळाची साल कुस्करून अंगाला लावतात. त्यामूळे होणारी आग थांबते.

तेलाचा उपयोग आमांश, आव, हगवण, पोटदुखी, थंडीत पाय फुटणे, अंग फुटणे यासाठी उपयोगी आहे. पावसाळ्यात चिखल्यांवरसुद्धा तेलाचा उपयोग होतो. तेलाचा उपयोग मेणबत्त्या तयार करण्यासाठीसुद्धा वापरतात परंतु यासाठी खूप तेल लागते. तेलाचा उपयोग औषधात तर होतोच पण सौंदर्यप्रसाधनातही फार मोठ्या प्रमाणावर वापरतात. या तेलासारखे उपयुक्त तेलच मिळत नाही. परदेशी याला चांगली मागणी आहे.

फळातील रसातील पन्हे करतात. तिखटमिठाचा व गोडाचा स्क्वॅश करतात. याशिवाय आमसुलाची कढी, सार करतात. फळांची जॅमजेली करतात. याचे लोणचेसुद्धा चांगले टिकते.

□

---

**वाणिज्य संघटनेच्या प्रकल्प अहवाल स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या अहवालाचा परिचय-**

# दिवाळी अंक - एक व्यावसायिक दृष्टिकोन

★

**राजश्री देशमुख, शुभदा गोडबोले, वैशाली कानडे, मेघा जोशी.**
(सर्व द्वितीय वर्ष वाणिज्य)

---

विचारसंहिता विकसित करण्यासाठी आणि नवनिर्मितीचा आनंद उपभोगण्यासाठी प्रकल्प अहवाल हो एक नामी संधी आहे आणि म्हणूनच आम्ही प्रकल्प अहवाल स्पर्धेत भाग घेण्याचे ठरवले. अर्थात आम्ही निवडलेल्या यापूर्वीच्या दोन विषयात जरी केवळ निराशाच पत्करावी लागली हे कटु सत्य असले तरी आमच्या जागृत कुतुहलानेच आम्हाला दिवाळी अंक हा नविन विषय सुचवला.

साहित्यसेवेच्या बुरख्याआड लपलेली व्यवहारिकता म्हणजे दिवाळी अंकाचा व्यवसाय. या अहवालात आम्ही दिवाळी अंक व्यवसायिक दृष्टीकोनातून पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

कोणत्याही व्यवसायात त्याचे उत्पादन आणि विसरण ह्या दोन महत्वाच्या बाजू असतात. परंतु दिवाळी अंक उत्पादन, वितरण आणि प्रकाशनासाठी मिळणाऱ्या जाहिराती ह्या त्रि-सूत्रीवर अवलंबून असतो. इतर व्यवसायात आढळणारी पूरक आणि आवश्यक अशी विशेष सूत्रे देखील या व्यवसायात पाळली जातात. उदा.

१) उत्तम व्यवस्थापन, विशेषीकरण आणि मोठ्या

प्रमाणावर उत्पादन वाव.

२) कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन व त्यातून वाढत जाणारा नफा.

३) सखोल विचार करून ठरवावा लागणारा दिवाळी अंकाचा संभाव्य वाचकवर्ग.

४) चालू घडामोडीनुसार वाचक वर्गाची नवीन विषयांसाठी बदललेली मागणी.

याबाबत संपादकास अतिशय जागृत असावे लागते.

उत्पादनात सर्वसाधारण दिवाळी अंकांची पद्धत म्हणजेच लेख मिळविण्यापासून अंक विक्रीस सज्ज होईपर्यंतच्या पद्धतीचा विचार केला आहे. तर वितरणात, वितरणाची सर्वसाधारण साखळी म्हणजेच मुख्य दलालाकडून उप-दलालाकडे व त्यानंतर ग्रंथालयांकडे आणि किरकोळ विक्रेत्यांकडे आणि शेवटी अंतिम ग्राहकास म्हणजेच वाचकांपर्यंत अंक येऊन पोचतो. वरील उलाढालीत येणाऱ्या संभाव्य अडचणी आणि त्यांची कारणमीमांसा हा ही या अहवालाचा एक महत्वाचा भाग आहे.

व्यवसायात टिकून राहण्यासाठी नफा हा अतिशय आवश्यक, त्यासाठी नफ्याची संकल्पना म्हणजेच 'जमेची बाजू' आणि 'खर्चाची बाजू' व त्यांचे 'मूल्यमापन' व त्यात फेरफार करणारे काही घटक ह्यांचे समर्थन करण्याचा प्रयत्न या अहवालात केलेला आहे. तसेच 'कमी भांडवलात हा व्यवसाय कशा रीतीने काढता येऊ शकतो' हा ही व्यवसायिक दृष्टीकोनाचा एक भाग आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे ह्या व्यवसायाचे भविष्य. ह्यासाठी आम्ही मान्यवर संपादकांच्या मुलाखती ह्या अहवालात सादर केल्या आहेत.

अर्थात सर्वातून सारांश असा निघतो की दिवाळी अंकांना भविष्यात मागणी उज्वल असून व्यवसायिकरणाबरोबर जर दर्जा राखला गेला तर ती मागणी कायम स्वरुपाचीच मिळेल. पण नफा मिळवण्यासाठी केवळ विक्रीवर अवलंबून असण्याची आवश्यकता ह्या व्यवसायात आहेच असं नाही. जाहिराती मिळवण्याची शाश्वती असल्यास नफ्यास तोटा नाही.

जवळ जवळ सर्व संपादकांनी आणि प्राध्यापकांनी आमच्या या प्रकल्प अहवालाचे स्वागत केले आणि आम्हाला सहाय्य करून आमचा उत्साह वाढवला. अर्थात आम्ही त्यांचे मन:पूर्वक ऋणी आहोत. पण कदाचीत असाही निष्कर्ष काढता येईल की इच्छा आणि त्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्याची तयारी असेल तर सहकार्य आपोआपच मिळू लागते.

आम्ही प्रकल्प अहवालात भाग घेऊन काय मिळवलं असा पर्यायाने प्रश्न उपस्थित होईल. एखाद्या विषयाच्या खोलात शिरून त्याची माहिती मिळविण्याची आणि आपल्या कुतुहलावर शास्त्रीय पद्धतीने विचार करण्याची संधी आम्हाला या प्रकल्प अहवालाने दिली.

नुसतेच पुस्तक आणि त्याचे विश्व सोडून आपण शिकलेल्या गोष्टीची व्यवहारी जगात जमलेली सांगड आम्ही पाहू शकलो. कॉलेज, घर या दिनचर्येबरोबर मान्यवर लोकांशी चर्चा करण्याची आणि त्यांची मते जाणून घेण्याची इच्छा पूर्ण झाली. एकमेकांना सहाय्य करण्याची आणि मनाविरुद्ध किंवा अपेक्षेविरुद्ध जरी गोष्टी घडल्या तरी त्या सहन करण्याची मनाची तयारी वाढली.

श्रमाचे साफल्य होऊन आम्हाला प्रथम क्रमांक मिळाला व त्यातून आमच्या स्पर्धक वृत्तीला नक्कीच चेतना मिळाली.

☐

# ' माझ्या कल्पनेतील अधुनिक समर्थ स्त्री '

★

**कु. जयश्री विनायक लाटकर,** द्वितीय वर्ष वाणिज्य

" कार्येषुमंत्री, करणेषुदासी.
भोज्येषु माता, शयनेषु रंभा '।।

फार पूर्वीपासून म्हणजे वैदिक कालापासून स्त्रियांना आर्यांनी फार मोठे मानाचे स्थान प्राप्त करून दिलेले आहे. कारण स्त्रीच पुढील संततीला आदर्श म्हणून असते. पूर्वीपासून राजकारणापासून ते समाजकार्यापर्यंत स्त्रीचा सल्ला घेण्याची त्यांची प्रथा होती. समाज सुस्थिर चालण्यासाठी स्त्री–पुरुष रुपी रथाच्या दोन्ही चाकांची आवश्यकता आणि स्थिरता पाहिजे. तरच तो रथ व्यवस्थित चालू शकेल हे वरील श्लोकावरून दिसून येते.

कोठल्याही कार्यामध्ये ' कार्येषुमंत्री ' ती मंत्र्याप्रमाणे सल्ला देऊ शकते. इतर कामामध्ये दासीप्रमाणे, खाण्यापिण्याबाबत आई प्रमाणे, प्रणय क्रिडेमध्ये ती रंभा उर्वशी प्रमाणे असते. ' क्षमया धरित्री ' धरणीमाते प्रमाणे सर्व अपराध पोटात घालून ती क्षमा करणारी असते. अशा अनेक गुणांनी युक्त असल्यामुळे राजेलोकसुद्धा स्त्रियांचा सल्ला घेत असत.

पूर्वीच्या काळी स्त्रियासुद्धा मोठ्या पंडिता होत्या. गार्गी, वाचक्यनवी,, अहिल्या, दौपदी मैत्रेयी या स्त्रीया मोठमोठ्या पंडिताबरोबर वादविवाद करीत असत. श्री. आदयशंकराचार्य व मंडनमिश्र यांच्या वादात श्री. सरस्वतीला त्यांनी न्यायाधिश केले होते. यावरून स्त्रियांचा दर्जा केवढा मोठा होता हे आपणास कळून येते. तिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उदधारी हे आपल्याला माहीत आहेच. श्री. मारुतीरायाची आई अंजनीमाता आपल्या मुलाबद्दल श्री रामचंद्रांना केवढ्या प्रौढीने सांगते पहा.

" माझ्या दुग्धाचीही प्रौढी, ककीकळाची नरडी मुरडी
राबणदिकाही ही बापुडी, घुंघरही जेथे "

अशा वीरमाताच विरसू अशा आपल्या पूर्वीच्या स्त्रिया पराक्रमी होत्या. दशरथाच्या रथाचा कणा मोडला असता तो कैकयीने आपल्या हाताचा कणा करून दशरथाची लढाई जिंकून दिली. परंतु पुढे कालांतराने आपली संस्कृती मातृप्रधान होऊ लागली. त्यामुळे पुरुषाचे महत्व कमी होऊ लागले. कारण पराक्रमी मुलांच्या नावावरून लोक ओळखू लागले. उदा :– कौंतेय कुंतीचा मुलगा, गांग्येय–गंगेचा मूलगा भीष्म, सौभद्र सुभद्रेचा मुलगा असे गाजू लागले.

त्यामुळे पुरुषांचे महत्व कमी होऊ लागले. हे पुरुषांना अपमानास्पद वाटू लागले. म्हणून त्यांनी स्त्रियांच्यावर नानातऱ्हेची बंधने आणली स्त्रियांनी पतिव्रताच रहावे इतर कामात ढवळाढवळ करू नये. असे पुरुष स्वार्थी बनल्यामुळे आजमितीपर्यंत स्त्रियांना दुय्यम स्थान मिळाले. आणि त्यांना अबला ठरवल्या व त्यांना स्वातंत्र्य नसावे असा नियम केला.

" विनाश्रयेण जिवंते कवितां, लता वनिता "

" न स्त्री स्वातंत्र्य मर्हती '

परंतु अशा स्त्रियांना स्वातंत्र्य देवू नये. असा त्याचा चुकीचा अर्थ केला जातो. कवितेला कविचा, वेलीला झाडाचा, स्त्रीला पुरुषांचा आधार असावा असा अर्थ आहे. परंतु पराक्रमी स्त्रिला आधार पाहिजेच असा अर्थ केव्हाही होत नाही. वेळ प्रसंगी स्त्रिया सुद्धा पुरुषांपेक्षा पराक्रमी असू शकतात. उदा. – जोन ऑफ आर्क ही

साधी खेडवळ तरुणी सर्व देशाची, लोकांची आधारशिला बनली होती. ती पुढे होताच सर्व सैन्य तिचे मागुन मरण्यास तयार होत असत. असे प्रत्यक्ष इतिहास सांगत आहे. परंतु अशा पराक्रमी स्त्रियांना पुरुषांनी झाडाला बांधून जाळून मारले. आणि स्त्री जातीला उन्नत करण्याचा महान अपराध पुरुषांनी केला.

आणि इथून पुढे स्त्रियांची कष्टाची जिणी सुरू झाली. वरील कारणांमुळे स्त्रियांना घराच्या बाहेर पडू देत नसत. त्यांना कोणत्याही प्रकारे स्वातंत्र्य दिले जात नसे. नुसते घरात सासरे असतील तर नवऱ्याच्या पुढे उभं रहायचं नाही. पुरुष गप्पा मारत असतील तर स्त्रियांनी तर त्या जागी ढुंकूनही पहायचे नाही. कोणा त्याही कारणासाठी त्यांनी स्वयंपाकघराच्या बाहेर पडायचे नाही.

स्त्रिया अशा अनेक अडीअडचणींना तोंड देत आपल्या संसाराचा गाडा पुढे रेटत असत. समाज एखाद्या स्त्रीच- नवरा अचानक वारला तर स्त्रियांचे केशवपण केले जाई. तिची सावली सुद्धा कोणाच्या अंगावर पडणार नाही याची पूर्णपणे काळजी घेतली जाई. तिला सामाजिक स्वातंत्र्य अजिबात दिले जात नसे. तिच्यावर घरात फक्त मुलांना जन्म देणे आणि सांभाळ करणे हा शिक्का तेव्हापासून तिच्यावर मारला गेला आहे. तसेच तिला आर्थिक स्वातंत्र्य सुद्धा नव्हते. नवरा कमावून आणून जे देईल तेवढ्यावरच तिला आपल्या संसाराचा गाडा, चालवावा लागे.

जेंव्हा जेंव्हा स्त्रिया आपला विचार बोलून दाखवत तेंव्हा त्यांना न बोलण्यास सांगत. एखादा निर्णय जेंव्हा घेतला जाई तो सर्व घरातील कर्त्यापुरुषांना विचारूनच. स्त्रियांना यामध्ये अजिबात वाव दिला जात नसे.

पूर्वीच्या काळी म्हणजेच स्त्रीला जेंव्हा कोणतेच अधिकार दिले जात नसते तेंव्हा बालविवाहाचे प्रमाण जास्त असे. जेंव्हा एखाद्या स्त्रीचा मुलगा किंवा मुलगी जन्माला येते तेंव्हा तिचे किंवा त्याचे लग्न ठरवले जाई. १०–१२ वर्षाच्या मुलीचे लग्न २५ वर्षाच्या माणसाशी लावून दिले जाई.

एखाद्या म्हाताऱ्याची खाष्ट बायको वारली तर तो मनात म्हणतो, सुटलो हिच्या तावडीतून, कचाटयातून, कटकटीतून. पण एखाद्या स्त्रीचा नवरा वारला तर हिंदू स्त्रियांची भावना अशी होणार नाही. हिंदू परंपरेने स्त्रीने पती हा देवाप्रमाणे मानला आहे. तो कसाही असो. आळशी, द्रष्ट, भ्रष्ट, खादाड, शरीराने दुबळा व मनाने भेकड कसाही असो पण नवरा हे सौभाग्यचिन्ह मानून सामान्य जनमतानें आतापर्यंत चालत आलेले आहे.

स्त्रियांना रात्रंदिवस घरात रहावे लागले. त्यामुळे साहजिकच व्रतवैकल्याकडे त्यांचा कल जावू लागला. सोळा सोमवार कडक करण्याचे प्रकार जास्त वाढू लागले. पांढरे शनिवार इ. समजा एखाद्या स्त्रिच्य, हातून चुकून मंगळसूत्र तुटले तर तिच्या हातापायांना कंप सुटू लागे. भिती प्रचंड वाटू लागे. आपल्या मुलांना नवऱ्याला काही होऊ नये यासाठी ती संतोषी माते सारखी व्रत शोधून काढे. ती त्यातच दुबळी, भीत्री निराधार, बनत गेली. आणि त्याचा फायदा लोक उठवू लागले. तिच्याकडे उपभोगाची वस्तू म्हणून पाहू लागले.

पण १७ व्या शतकापासून शिवाजी महाराजांचे राज्य सुरू झाले. फक्त राज घराण्यातील स्त्रियांना शिक्षणाची सोय सुरू झाली. अशा स्त्रियांना दांडपट्टा चालवणे, भालाफेक, घोडयावर बसणे, तलवार चालवणे इ. शिक्षण दिले जाऊ लागले. त्यातच स्त्रियांना थोडया फार प्रमाणात घराबाहेर पडण्यास मिळाले.

त्यातच शिक्षण जास्त नसल्यामुळे व त्यांची विचार करण्याची शक्ती जास्त नसल्यामुळे त्यांना थोडया फार कमी प्रमाणात लेखले जाई. त्यांना दुय्यम दर्जाचे स्थान प्राप्त झाले. पण टिळक, आगरकर, महात्मा गांधी, राजाराम मोहन रॉय, जवाहरलाल नेहरु त्यांची बहिण विजयालक्ष्मी पंडित, आंबेडकर आणि असे कितीतरी लोक मोठ्या प्रमाणावर स्त्रियांची ही कोंडी सोडवण्यासाठी पुढे धावून आले.

त्यानंतर स्त्रियांना भाषण स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य वैचारिक स्वातंत्र्य, सामाजिक स्वातंत्र्य देण्यात आले.

त्यातून मोठमोठ्या स्त्रियांची निर्मिती झाली. उदा :– पंडीता रमाबाई, नेहरूंची बहिण विजयालक्ष्मी पंडीत, अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई आणि अशा कितीतरी स्त्रिया निर्माण झाल्या, होताहेत आणि होतील.

आणि त्यांनी आपल्या भोवतालची एक एक बंधने सोडून देण्यास सुरुवात केली. स्त्री ही शिक्षणासाठी, कोर्स करण्यासाठी, नोकरी करण्यासाठी घराबाहेर पडू लागली. त्यांचा थोड्या फार प्रमाणात बाहेरच्या जगाशी संबंध आला. इंग्रजी शिक्षणाचा पगडा त्यांच्या मनावर असल्यामुळे त्या थोड्या फार प्रमाणात चांगल्या गोष्टींचा विचार करू लागल्या. स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी धडपडू लागल्या. त्या प्रगतीच्या ध्येयाकडे जाण्यासाठी आपले पंख हळूहळू पसरू लागल्या.

आता १९ व्या शतकाच्या सुरुवातीला याचा अनुभव जास्त प्रमाणात येऊ लागला आहे. एवढ्या प्रचंड भारताची पंतप्रधान सुद्धा एक स्त्री होऊ शकते. पंतप्रधान इंदिरा गांधी हे जिवंत उदाहरण आपल्या डोळ्यापुढे आहे. याचा केवढा अभिमान भारतीय स्त्रियांना आहे हे विसरून चालणार नाही. तसेच मार्गारेट थॅचर ह्या सुद्धा ब्रिटन सारख्या देशाच्या पंतप्रधान आहेत.

आता स्त्रिया पूर्वीची बंधने पाळूच शकत नाहीत उदा. चूल आणि मूल, हल्ली घरांघरांमध्ये इतक्य सोयी उपलब्ध झाल्या आहेत की तिला त्याचे काहीच महत्व वाटत नाही. समजा एखादे वेळेला तिला स्वयंपाक करायचा कंटाळा आला तर नवऱ्याला सांगून हॉटेलमधून जेवण आणू शकते. आणि मुलांचे म्हटले तर 'पाळणाघर' हे सर्वात चांगले सोयीयुक्त एक घरच आहे. हल्ली स्त्रिया पैशासाठी म्हणा किंवा घरची परिस्थिती तशी असते म्हणून म्हणा स्त्रिया नोकरीसाठी घराबाहेर पडत आहे. त्यामुळे मुलांचे प्रश्न आहेत, पण पाळणाघर असल्यामुळे त्यांची जास्त काळजी वाटत नाही.

आणि अशा प्रकारे स्त्रियांनी स्वतःच्या पायावर उभे राहून आपल्या कुटुंबाच्या आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी हातभार लावण्यासाठी सतत झटले पाहिजे आणि झटत राहतील अशी माझी खात्री आहे.

□

# याच्यावर उपाय काय ?

★

**तारक अ. राईलकर,** द्वितीय वर्ष शास्त्र

मुंबईमध्ये अलीकडेच जवळ जवळ ९ लाख रुपयांचे अमली पदार्थ पोलिसांनी जप्त केले अशी बातमी वर्तमान पत्रातून आली होती. पुण्यातही सात हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले गेले. आणखी एका पहाणीत असे दिसून आले आहे की पुण्यातील पन्नास टक्क्यांपेक्षाही जास्त विद्यार्थी हे व्यसनांच्या आहारी गेलेले आहेत. मुंबईत हे प्रमाण तर फारच जास्त आहे. हे व्यसनाधीन विद्यार्थी फक्त महाविद्यालयातील नाहीत तर काही विद्यार्थी शाळेतले सुद्धा आहेत. व्यसनाधीन विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाणही वाढत आहे.

हे असे का ? या "का" ला लवकरात लवकर उत्तर मिळाले पाहिजे कारण या "का" ला जर उत्तर मिळण्यास उशीर झाला, तर भावी तरूण पिढीचा भविष्य काळ धोक्यात आहे व त्यामुळे आपल्या देशाचे भवितव्य अंधारातच रहाणार आहे. पूर्वी एखादी व्यक्ती व्यसनाधीन आहे असे म्हटले की ती व्यक्ती सिगरेट ओढते, फार तर दारू पिते असा अर्थ होत असे. पण हल्ली त्याहूनही भयानक व्यसने लोकांना विशेषत: तरूणांना लागत आहेत. या व्यसनांमध्ये अमली पदार्थांचा समावेश आहे. या व्यसनांमुळे काय वाईट परिणाम होत नाही असे विचारा. सुरुवातीला, माणसाला या पदार्थांमुळे येणारी नशा आवडते, ती हवी-हवीशी वाटते, या नशेमुळे त्या माणसाला जगाच्या चितापासून अलिप्त झाल्यासारखे वाटते. ती व्यक्ती एका वेगळयाच विश्वात असते. हे विश्व असते त्याच्या कल्पनांचे, सत्याचा व या कल्पनांचा काडीचा ही संबंध नसतो. पण माणसाची ही अवस्था फारकाळ टिकत नाही. त्याला आपले दु:ख विसरण्यासाठी लवकरच या पदार्थांचा पुन्हा एकदा आसरा घ्याा वलागतो. एकदा माणसाने ह्या पदार्थांचे सेवन सुरू केले, की मग त्याला त्यांची सवय लागते. ह्या सवयीचे रूपांतर पुढे व्यसनात होते. आणि शेवटी हे व्यसन, त्याची आवश्यकता, त्याची नित्याची गरज होते. एकदा व्यसन लागले की ते सुटणे जवळ-जवळ अशक्य असते. आपले व्यसन सुटावे अशी कुणाची इच्छा असली तर त्याला प्रयत्नांची पराकाष्ठत करावी लागते व त्याला प्रचंड मानसिक बळ व तयारी लागते. नुसते इतरांचे " व्यसन मुक्त हो " असे प्रोत्साहन पुरेसे नसते.

मी आज येथे या अशा व्यसनांचे दुष्परिणाम सांगणार नाही. पण ही व्यसने मुळातच एखाद्याला का लागतात याचा विचार करायचा प्रयत्न करणार आहे. दहावीची परीक्षा झाली व निकाल लागला की यशस्वी विद्यार्थ्यांचे कॉलेज जीवन सुरू होतें. कॉलेजबद्दल स्वत:च्याच कल्पना असतात व कॉलेज जीवना-विषयी कुतूहल व आकर्षण असतं. शाळेत तासाला दांडी मारता येत नाही व समजा दांडी मारलीच, तर ते लगेच घरी कळते. मग घरातील वडीलधारी माणसांना "दांडी का मारली" ह्याचे कारण द्यावे लागते. जर सहज गंमत म्हणून दांडी मारली असेल, तर घरातील मंडळीकडून बोलणी खावी लागतात. वेळ प्रसंगी मार सुद्धा खावा लागतो. पण कॉलेज मध्ये हाच विद्यार्थी आला, की त्याला परिस्थितीतील बदल पटकन लक्षात येतो. कॉलेज मध्ये हवे ते व हवे तेवढे तास बुडवले तरी घरी पत्ता लागत नाही विद्यार्थ्यांच्या ह्या वयात त्याचे मन अपरिपक्व व कोवळे असते. त्याला चांगले काय व वाईट काय हे कळत नसते. त्यामुळे त्याच्या आजूबाजूला घडणाऱ्या सगळ्या घटना त्याच्या मनावर परिणाम करून जातात. ह्याच वयात विद्यार्थ्यास पूर्वीपेक्षा बरेच

जास्त स्वातंत्र्य मिळालेले असते पण दुर्दैवाने स्वातंत्र्याचा अर्थ बरेच वेळेला स्वैराचार असा घेतला जातो. विद्यार्थी कॉलेजचे तास बुडवून चकाट्या पिटत बसतात. कॉलेजचे कँटीन किंवा कॉलेज बाहेरचा कट्टा हे कधीही रिकामे दिसत नाहीत. मुले व मुली सुद्धा तास बुडवून हे उद्योग करत बसतात किंवा कुठल्यातरी सिनेमांला जाऊन बसतात. चित्रपटामधून व जाहिरातीमधून दिसणारी अश्लीलता त्यांच्या अपरीपक्व मनावर कळत-नकळत परिणाम करून जाते. शिवाय ह्याच्यात भर घालायला अश्लील पुस्तके, व काही प्रमाणात टेलीव्हीजन ही माध्यमे सुद्धा आहेतच.

चित्रपटांतून जे विद्यार्थ्यास दिसते, तेच त्यांना खरे आयुष्य वाटते. कारण बरोबर काय व चूक काय हा फरक त्याला कळत नाही. तो कॉलेजात चित्रपटांतील हिरोप्रमाणे वागायचा प्रयत्न करतो. "अमुक नट ऐटीत उभा राहुन सिगारेट ओढतो म्हणून मी सुद्धा तशाच पोझ मध्ये सिगारेट ओढली म्हणजे मी हीरो–सारखा दिसेन" असा त्याचा गैरसमज असतो. हिरो सारखे वागायचे म्हणजे मुलींशी बोलायचे व एखादीवर 'प्रेम' करायचे. ह्या अशा प्रेमाला अर्थ नसतो कारण त्या प्रेमाला खोली नसते व ते निव्वळ आकर्षण असते. काही काळानंतर मनाविरुद्ध घडणाऱ्या घडामोडींमुळे हा विद्यार्थी व्यसनाच्या अधिकच आहारी जातो.

मुले बिघडतात किंवा वाया जातात ह्याला हल्लीचे पालक सुद्धा जबाबदार आहेत. काही पालक आपल्या पाल्याचे नको असे फाजील लाड करत असतात. काही पालकांचा बहुतेक सर्व वेळ समाजातील आपला मान राखण्यात जातो. अशा परिस्थितीत आपल्या पाल्याकडे त्यांचे दुर्लक्ष होतें. पालक हे असे मुद्दाम वागतात असे माझे अजिबात म्हणणे नाही. पण तरीही या अशा वागण्याचा परिणाम त्यांच्या पाल्यावर नक्कीच होत असतो. त्यामुळे घरात या मुलांवर चांगले संस्कार होत नाहीत व त्यामुळे त्यांना नीतिमूल्यांची जाणीव असतेच असे नाही. त्याच्या अशा द्विधा मनःस्थीतीत भोवतालच्या घटना भर घालत असतात. आपल्या भोवतालची परिस्थिती त्याला कशी दिसते? त्याला सगळीकडे भ्रष्टाचार व राजकारण याचे राज्य दिसते. काही अपवाद वगळता जवळ-जवळ सगळ्या क्षेत्रात भ्रष्टाचार व राजकारण शिरलेले आहे. अशा परिस्थितीत जर आपले 'वजन' नसेल, तर पदरी निराशाच पडते कारण बरेच वेळा आपली योग्यता असूनही एखाद्या अयोग्य विद्यार्थ्यास प्राधान्य देण्यात येते. वरिष्ठ अधिकारी आपल्या सत्तेचा गैरवापर करत आहेत असे त्याच्या दृष्टीस पडते.

या सगळ्या कारणांमुळे मुलांच्या मनावरती विपरीत परिणाम होतो व त्यामुळे त्याच्या भावी जीवनावरही वाईट परिणाम होऊ शकतो. त्याच्या इच्छांचा, त्याच्या आकांक्षांचा, त्याच्या जिद्दीचा चुराडा होतो व त्याच्या मनात एक प्रकारची विकृती निर्माण होते. कुणाचे चांगले झालेले त्याला बघवत नाही व या विकृतीमुळे तो हिंसक होण्याची शक्यता वाढते.

आजच्या विद्यार्थिनी सुद्धा नको एवढ्या मोकळेपणाने वागत असताना दिसतात. पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण मुलीतच जास्त दिसते. त्यांची वेशभूषा व वागणे अगदी नाटकी वाटते. मी वरती "पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण" असा शब्द प्रयोग केला आहे. त्याचे कारण असे की या मुलींचे वागणे पूर्णपणे पाश्चात्यांसारखे नसते. ते थोडे फार भारतीय संस्कृतीला धरून असेही असते. दोन्ही संस्कृतीमधील फायदेच त्यांना हवे असतात, कर्तव्य मात्र नकोशी होतात. एकूण काय, त्यांना बिन कष्टाचे व आरामाचे जीवन हवे असते. बरेच वेळा मुली या मुलांना व्यसनी व "वाया–गेलेला" असे होण्यास कारणीभूत ठरतात. तासन्‌तास मुलांशी, काहीही कारण वा आवश्यकता नसताना, मुली वायफळ बडबड करीत असताना दिसतात. त्यांच्या खोट्या हसण्या–खिदळण्याने मुलांमध्ये बरेच गैरसमज निर्माण होतात व गैरसमज निर्माण होणे केव्हाही वाईटच. या मुलींपुढे ऐट मिरवण्यासाठी मुले आधी सिगारेट–वगैरे ओढतात. काही वेळेला आपल्यात किती "हिम्मत" आहे किंवा आपण किती "बेडर" आहोत हे दाखवण्यासाठी ही मुले प्राध्यापकांना उलट उत्तरे देतात किंवा त्यांचा अपमान करतात. हे सगळे मनाला चीड आणणारे असते तरी खरे आहे.

आपण सगळयांनी जरी प्रयत्न केला, तर सध्या दिसणारे हे चित्र आपल्याला सहज बदलता येईल. त्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यावर थोडे लक्ष ठेवले पाहिजे. कॉलेज जीवनाच्या पहिल्या दोन-तीन वर्षात विद्यार्थ्यास मार्गदर्शनाची आवश्यकता असते. कुणी तरी आपल्याला समजून घेतले पाहिजे असे वाटते. ही दोन-तीन वर्ष एकदा "सुरक्षितपणे" गेली, की मग मुले-मुली बिघडण्याची शक्यता बरीच कमी असते. विद्यार्थ्यांनी सुद्धा मृगजळामागे न धावता आपली विवेक बुद्धी जागृत ठेवून निर्णय घ्यायला शिकले पाहिजे. विद्यार्थी कसे बिघडतात याची अल्प कारणे मी मांडली आहेत. अजून बरीच कारणे अंधारातच असतील व आहेत. ही कारणे आपण शोधून काढली पाहिजेत व त्यावर उपाय शोधायला पाहिजेत. पाश्चात्याचे अंधानुकरण थांबवले पाहिजे. असे झाले. तर मला खात्री आहे, की तुमचे, माझे, आपल्या सर्वांचे भवितव्य उज्वल आहे.

□

# मराठी चर्चासत्र वृत्तांत

★

**प्रा. डॉ. स्नेहल तावरे**

डिसेंबर महिन्याच्या सुरवातीलाच विभाग प्रमुखांनी आपला मनोदय व्यक्त केला की, महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवा निमित्त मॉडर्न महाविद्यालयात "गेल्या पंचवीस वर्षातील मराठी भाषा व साहित्य" या विषयावर चर्चासत्र आयोजित करावयाचे आहे. डॉ. वि. भा. देशपांडे यांनी सुचविलेला कार्यक्रम अतिशयच चांगला होता. कारण महाराष्ट्र राज्य रौप्यमहोत्सवा निमित्त महाराष्ट्रातून अनेक उपक्रम झाले परंतु यामध्ये मराठी वाङ्मयाचा परिपूर्ण विचार नव्हता. आम्हाला सर्वांनाच ही कल्पना आवडली आणि उत्साहाने आम्ही कामाला लागलो. हे चर्चासत्र मोठ्या प्रमाणावर घ्यायचे, महाराष्ट्रातून ठिकठिकाणांहून मराठी विद्वानांना बोलबायचे. विशेष म्हणजे सर्वांची जेवणाची व राहण्याची सोय करायची म्हणजे खर्चाची मोठीच बाब होती. प्राचार्य श्री. गंभीर यांना अडचण सांगितली तेंव्हा त्यांनी तत्परतेने मदत करायचे आश्वासन दिले. हे आश्वासन अधिक मोलाचे होते. म्हणूनच बाकीच्या देणग्या पटकन मिळत गेल्या. भरीव स्वरुपाचे अर्थसाहाय्य देण्यात पुणे विद्यापीठ आणि रेणुका कन्स्ट्रक्शनचे श्री. मोहन चितळे यांचा प्रमुख भाग होता. तसेच कॉसमॉस बँक, विद्या सहकारी बँक आणि मॅजेस्टिक, श्री विद्या, मानसन्मान, उत्कर्ष, मेहता या प्रकाशन संस्था व जे. के. पॅकेजेस यांनी विनाविलंब अर्थसाहाय्य दिले, इतकेच नव्हे तर चर्चासत्राचे एकंदरीत भरीव यश पाहून मेहता पब्लिशिंगचे श्री. अनिल मेहता यांनी या चर्चासत्रातील मूळ निबंध आणि त्यावरी चर्चा यांचे एकत्रित पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरवले ही मोठी जमेची बाजू आहे.

महाराष्ट्राचा आणि मराठी भाषेचा अतूट असा संबंध आहे. महाराष्ट्राला पंचवीस वर्षे झाली म्हणजे मराठी साहित्याचा आणि भाषेचा विकास या पंचवीस वर्षात किती झाला याचे सिंहावलोकन करणे किती आवश्यक ठरते हे लक्षात येते. या चर्चासत्राचा आरंभ २८ फेब्रु-

वारीला दुपारी तीन वाजता झाला. अध्यक्ष प्राचार्य गंभीर आणि उदघाटक मराठीतील जेष्ठ साहित्यिक आणि मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. शंकर पाटील यांनी सभागृहात पदार्पण केले तेव्हा निरनिराळ्या महाविद्यालयातून विद्यापीठातून आलेल्या मराठी साहित्यिक व प्राध्यापकांनी, रसिक श्रोत्यांनी आकाशवाणी व दूरदर्शन यातील अधिकारीवर्गाने टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. तेंव्हा वातावरण चैतन्याने भरून गेले होते. या साहित्यिक मेजवानीसाठी प्रत्येक जण आसुसलेला होता. तेंव्हा ज्ञानेश्वरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून व दीप प्रज्वलीत करून श्री. शंकर पाटील यांनी या चर्चा सत्राचे उद्‌घाटन केले. डॉ वि. भा. देशपांडे यांच्या प्रास्ताविकानंतर शासकीय मदतीशिवाय हे चर्चासत्र घेण्यात येत असल्याचे प्राचार्य श्री. गंभीर यांनी सूचित केले. श्री. शंकर पाटील यांनी मराठी भाषेची व्याप्ती किती आहे आहे हे सांगताना विशद केले की, जेथे जेथे मराठी भाषा बोलली जाते तो तो भाग महाराष्ट्राचा आहे. मराठी भाषेतूनच सर्व पत्रव्यवहार झाला तर सामान्य लोकांनाही व्यवहार सुलभतेने होतील. आपल्याकडे आवश्यकता नसताना इंग्रजी भाषेचा पत्रव्यवहारासाठी जो वापर केला जातो तो थांबलाच पाहिजे ही गोष्ट थांबविणे आपल्याच हातात असते असे सांगून विद्यापीठ आणि श्री. शंकर पाटील यांच्यात झालेल्या पत्रव्यवहाराचे एक उदाहरण त्यांनी दिले. श्री शंकर पाटलांच्या मार्मिक उद्‌घाटकीय भाषणानंतर चर्चासत्राला आरंभ झाला. त्यामध्ये वेगवेगळ्या साहित्य प्रकारांवर जो चर्चा झाली त्यातील महत्त्वपूर्ण मुद्द्यांचा आलेख असा—

विषय : 'मराठी भाषा व साक्षरता, प्रसार माध्यमे'
अध्यक्ष : डॉ. अशोक केळकर
निबंध वाचक : १) डॉ. कल्याण काळे
२) श्री. वसंतराव कुलकर्णी
चर्चिक : १) डॉ. चंद्रशेखर बर्वे
२) श्री. विश्वास मेहेंदळे

पुणे विद्यापीठातील प्रपाठ डॉ. कल्याण काळे म्हणाले की, शासन व्यवहारात सर्वत्र मराठीचा वापर केला पाहिजे हे तत्त्वत: मान्य झाले असले तरी त्याची अंमलबजावणी होण्याला मात्र बराच कालावधी लागत आहे. पाठ्यपुस्तकांचे राष्ट्रीयकरण ही शिक्षणक्षेत्रातील एक महत्त्वाची घटना आहे. परंतु शालेय स्तरावरील मराठीच्या स्थानाला कॉम्प्युटर व इलेट्रॉनिक्स या विषयांच्या दबावामुळे धक्का पोचला आहे. तर महाविद्यालयीन स्तरावर "जीवनोपयोगी शिक्षण" या या प्रवृत्तीमुळे मराठी विषयाची लोकप्रियता नष्ट झाली आहे. एक चांगली गोष्ट निष्पन्न झाली ती म्हणजे "व्यावहारिक मराठी" या विषयाचा उद्‌भव होय. तसेच आधूनिक भाषा विज्ञानाचा उदय झाला असला तरी विद्यापीठीय स्तरावर त्याचे फारसे स्वागत झालेले नाही. हा पंचवीस वर्षांच्या कालावधीत सर्वसामान्य मराठी जीवनात मराठीबद्दल आस्था राहिलेली नाही. मराठीच्या लेखनपद्धतीबद्दल आराजक आहे. मराठी माध्यमाबद्दलही अनास्था आहे. मराठीची अनास्था दूर करण्यासाठी काही चळवळी अस्तित्वात आल्या. शिवसेनेने मराठी माणूस व त्याची प्रतिष्ठा जपण्याचे उद्दीष्ठ डोळ्यासमोर ठेवले मराठी अन्यायनिर्मूलन परिषदेने मराठीच्या अभ्यासक्रमातील प्रतिष्ठापनेवर भर दिला. मराठी अभ्यास परिषद ही मराठीच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रित करून वाटचाल करीत आहे असे डॉ. कल्याण काळे यांना वाटते. डॉ. अशोक केळकर यांनी नवीन पद्धतीचे व्याकरण शिकवायला शिक्षक सध्या उपलब्ध नाहीत. त्यामुळे प्रशिक्षित शाळांमध्ये पाठवले तरच मराठीचा दर्जा उंचावेल असे सांगितले.

आकाशवाणीबद्दल बोलताना श्री. वसंतराव कुलकर्णी परखडपणे म्हणाले की, आकाशवाणीवरील कार्यक्रम हे सामान्य जनांसाठी नसून केवळ मूठभर लोकांसाठी असतात. मराठी भाषिकांसाठी फार मोठे कार्य रेडिओने केले नाही. साक्षरतेचे कार्य समाज परिवर्तनासाठी आहे त्यामुळे माणसे तयार करण्याचे कार्य साक्षरता प्रसाराने केले पाहिजे. आकाशवाणी हे माध्यम कसे वापरायचे हे खूप लोकांना समजत नाही. अशीही खंत श्री. कुलकर्णी यांनी व्यक्त केली. श्री. विश्वास मेहेंदळे यांनी आपल्या वीस वर्षांच्या दूरध्वनीवरील प्रदीर्घ

सेवेचा अनुभव कथन केला. 'प्रतिमा आणि प्रतिभा' हा कार्यक्रमामुळे साहित्यिक कसे असतात, कसे बोलतात हे दूरदर्शनने सर्व सामान्यांना दाखवून दिले याशिवाय नाटचावलोकन, मुखवटे आणि चेहरे, ज्ञानदीप इत्यादि अनेक कार्यक्रमाद्वारे कलाकारांना दूरदर्शनमुळे उत्तेजन मिळाले. दूरदर्शनने मराठी भाषेला चांगले निवेदक व सूज्ञ संचालक दिले याची उदाहरणे म्हणजे स्मिता पाटील, सुधीर गाडगीळ, स्मिता तळवळकर आणि अनंत भावे इत्यादी. संपर्क माध्यमाची भाषा ही अतिशय वाङमयीन असते असेही श्री. मेहेंदळे म्हणाले, मराठी समीक्षक प्रा. स. शि. भावे यांच्या मतानुसार आकाशवाणी, दूरदर्शन प्रमाणेच वृत्तपत्रांचा वापर प्रसार माध्यमात व्हावा आणि जीवनाशी संबंधित असलेल्या विषयांचा त्यामध्ये अंतर्भाव व्हावा. प्रसार माध्यमावरील ही चर्चा चांगलीच रंगली.

शनिवार १ मार्च १९८६
विषय : कविता
अध्यक्ष : श्री. ना. धों. महानोर
निबंधवाचक : डॉ. अक्षयकुमार काळे
चर्चिक : १) डॉ. श्रीरंग संगोराम
२) डॉ. रेखा इनामदार

गेल्या पंचवीस वर्षातील मराठी कवितेचा विस्तृत आढावा डॉ. अक्षयकुमार काळे यांनी घेताना म्हटले की, अर्वाचीन मराठी काव्याचे पात्र आता विशाल झाले असून दिवसेंदिवस हे पात्र रुंदावत आहे. मुक्तशैलीच्या संजीवनीमुळे अभिव्यक्तीच्या तंत्रमुक्त वाटा अधिक मोकळ्या झाल्यामुळे कवितालेखनाला बहर आला आहे. कविता तृणासारखी वाढत असल्यामुळे मराठी काव्यसंग्रहांचे संख्याबळही वाढलेले आहे. यामुळे तिच्यातील सच्ची कविता कोणती आणि नकली कविता कोणती हे ओळखणं सध्या दुरापास्त झाले आहे. मुक्तशैलीमुळेच नव्हे तर अभिव्यक्तीच्या नवनव्या पद्धतीमुळे आणि विस्तारीत झालेल्या काव्यसंकल्पांमुळे कविता अधिकाधिकच गुंतागुंतीची झाली आहे. त्यात नित्यनव्याने निघणारे काव्यसंग्रह आणि त्यांची वर्तमानपत्री परिक्षणे व ती लिहून घेणाऱ्यांचा धंदेवाईक दृष्टीकोण यामुळे सर्वसामान्य वाचकवर्ग बुचकळ्यात पडला अशी खंत त्यांनी व्यक्त केली. अनेक प्रमुख कवींच्या काव्य प्रवृत्तींचा आढावा डॉ. काळे यांनी घेतला. हे चर्चासत्र खऱ्या तर्थाने रंगले ते प्रसिद्ध कवि श्री. ना. धो. महानोर यांच्या अध्यक्षीय भाषणामुळे. मी केवळ कविता करतो, त्याची समीक्षा करीत नाही. समीक्षेतील मला फारसे कळत नाही. असे म्हणत म्हणत त्यांनी गेल्या पंचवीस वर्षातील मराठी कवितेची ओळख टीकाटिप्पणीसह अनेक उदाहरणांच्या आधारे करून दिली. एखादा अनुभव जिवंत कसा होतो हे सांगताना स्वतःच्या कवितांबरोबर इतर कवींच्या अनेक जुन्या-नव्या कविता त्यांनी म्हणून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. यां भारावलेल्या वातावरणानंतर चौथ्या चर्चासत्राचा आरंभ झाला.

विषय : 'मराठी नाटक आणि रंगभूमी स्थितीगती'
अध्यक्ष : नाटच दिग्दर्शक, श्री. दामू केंकरे
निबंधवाचक : प्रा. पुष्पा भावे
चर्चिक : १) डॉ. अनंत देशमुख
२) डॉ. तारा भवाळकर

प्रा. पुष्पा भावे यांच्या निबंधातील काही निष्कर्ष असे होते, भारतीय रंगमंचपरंपरा आपण ब्रिटिश नजरेतून पाहिली, जीत समाजाच्या न्यूनतेवर यात करण्याचे साधन म्हणून तिचा वापर केला गेला. उभा केलेला रंगमंच 'उसना' असल्यामुळे तिचा टप्याटप्याने विकास होत गेला नाही. प्राधान्याने संगीत असणाऱ्या या रंगभूमीला नाटकाचे काव्यरुपाशी असणारे नाते गवसले नाही. सामाजिक मानली जाणारी नाटकेही क्वचितच एखाद्या सामाजिक प्रश्नांचा गाभा शोधताना दिसतात. नव्या फार्सचा शोध घेतला गेला, विपुल प्रमाणावर झालेले एकांकीका लेखन, स्वतंत्र आणि रुपांतरीत हे या कालखंडाच्या नाटचलेखनाचे वैशिटय मानावे लागेल. डॉ. तारा भवाळकर व

डॉ. देशमुख यांनीही आपली नाट्यविषयक मते मांडली.

विषय : 'आत्मचरित्रे'
अध्यक्षा : डॉ. सरोजिनी वैद्य
निबंधवाचक : डॉ. अंजली सोमण
चर्चिक : १) डॉ. म. वि. गोखले
२) प्रा. गंगाधर पाटील

'पंचवीस वर्षांतील आत्मचरित्रांचा शोध घेताना डॉ. अंजली सोमण यांनी आत्मचरित्राचा रूपबंध सादर केला. आत्मचरित्र कलात्मक होण्यासाठी कोणत्या घटकांचे अस्तित्त्व आवश्यक असते हे सांगून आत्मचरित्र हा लवचिक वाङमय प्रकार कसा आहे हे विशद करून त्यांनी अनेक उदाहरणें दिली. त्यांच्या विचारानुसार या कालखंडात अनेक उत्तम आत्मचरित्रे निर्माण झाली. दलितांच्या विद्रोही लेखनाने मराठी साहित्यावरील मरगळ दूर होऊन अस्पृश्यांचे जगणे लोकांसमोर आले, 'फॉर्म' चा बडेजाव कमी होऊन साहित्याच्या कलात्मकतेची कल्पना प्रगत झाली हे या पंचवीस वर्षांच्या कालखंडात घडले. डॉ. सरोजिनी वैद्य आणि डॉ. गोखले व प्रा. पाटील यांनी आत्मचरित्राबाबत आपण त्याच त्याच वर्तुळात कसे फिरत राहतो हे स्पष्ट केले. आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार इतर वाङ्मय प्रकारांच्या साहचर्याने कसा निर्माण होतो याचाही उल्लेख चर्चेत झाला.

विषय : मराठी संशोधन साहित्य
अध्यक्ष : प्रा. गो. म. कुलकर्णी
निबंधवाचक : डॉ. वसंत जोशी
चर्चिक : १) डॉ. ल. रा. नसिराबादकर
२) डॉ. गं. ना. जोगळेकर

अतिशय चिकित्सक पद्धतीने 'मराठी संशोधन साहित्य' या विषयावरील निबंध डॉ. वसंत जोशी यांनी सादर केला. संशोधनातील मूलभूत प्रवृत्ती असणाऱ्याचे कार्य यापूर्वीही चालू होते आणि यानंतरही ते चालू राहिलेले आहे हे विशद करताना त्यांनी प्रा. प्रियोळकर, प्रा. बनहट्टी, डॉ. मिराशी, ग. ह. रबरे, डॉ. कोलते, डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. यू. म. पठाण, प्रा. पा. ना. कुलकर्णी, डॉ. स. म. मालशे इत्यादी संशोधकांच्या लेखनकार्याची उदाहरणे दिली. तसेच विद्यापीठीय संशोधकांचा एक नवा वर्ग या कालखंडात निर्माण झाला आणि त्यामुळे काही नव्या समस्या उदयास आल्या आहेत. प्राचीन किंवा आधुनिक मराठी साहित्यिकांनी निर्माण केलेले अमराठी वाङ्मय हा सुद्धा एक अभ्यासाचा विषय होईल असे त्यांनी सूचित केले. पीएच्. डी. झाल्यावरही त्या त्या विषयावरील दोन-चार अभ्यासंपूर्ण निबंध प्रकाशित व्हावेत अशी इच्छा डॉ. जोगळेकरनी व्यक्त केली.

रविवार २ मार्च १९८६
विषय : कथा
अध्यक्ष : प्रा. वसंत दावतर
निबंधवाचक : प्रा. सुधा जोशी
चर्चिक : १) डॉ. विद्याधर पुंडलीक
२) डॉ. अ. वा. कुलकर्णी

रविवार दिनांक २ मार्चला सकाळी सातव्या चर्चासत्राचा आरंभ 'कथा' या वाङ्मय प्रकाराने झाला. नवतेच्या प्रवर्तनातून निर्माण झालेले कलात्मक स्वातंत्र्याचे नवे वातावरण कथास्वरुपाच्या अनेकविध शक्यतांचे नवे कलात्मक भान हे १९६० नंतरच्या कथाकारांना लाभलेले अर्थपूर्ण संचित होय, या नव्या कथादृष्टीतून त्यांना आवाहन मिळाले असे प्रा. सुधा जोशी यांनी कथेच्या संदर्भात आपली मते मांडली.

विषय : कादंबरी
अध्यक्ष : डॉ. भीमराव कुलकर्णी
निबंधवाचक : प्रा. दिगंबर पाध्ये
चर्चिक : १) डॉ. विलास खोले
२) डॉ. आनंद यादव

डॉ. दिगंबर पाध्ये यांची कादंबरांचा आढावा घेण्याची पद्धत मूलत: वेगळी होती, प्रमुख प्रवृत्तींचा परामर्श त्यांनी यावेळी घेतला. डॉ. आनंद यादव यांनी मराठी लेखकांमध्ये श्रम करण्याची प्रवृत्ती कमी असल्याची खंत व्यक्त केली. ज्याचे पाय मराठी मातीत रुजले आहेत, तोच मराठी साहित्याशी एकनिष्ठ आहे. गाडीत बसणाऱ्यांना हा स्पर्श कसा भावेल असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

विषय : पाठ्यपुस्तके : शालेय व महाविद्यालयीन
अध्यक्ष : डॉ. व. दि. कुलकर्णी
निबंधवाचक : डॉ. रा. सो. सराफ
चर्चिक : प्रा. स. शि. भावे

चर्चासत्राच्या शेवटच्या विषयावर बोलताना डॉ. सराफांनी गेल्या पंचवीस वर्षात पाठ्यपुस्तकांच्या संदर्भात जे विविध प्रवाह दृष्टोत्पत्तीला आले याचे दिग्दर्शन केले. अनेक मार्मिक उदाहरणे त्यांनी या प्रसंगी सांगितली. ही चर्चा चांगलीच रंगली. ती महाविद्यालयीन पाठ्यपुस्तके शिकवताना येणाऱ्या अडचणीमुळे. प्राध्यापकाला कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याचाही विचार येथे झाला.

तीन दिवस सतत चालणाऱ्या या ज्ञानसत्राच्या समारोप प्रसंगी अध्यक्ष प्रा. सीताराम रायकर होते. डॉ. वि. रा. करंदीकर आणि प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी अभ्यासपूर्णरित्या समालोचन केले. जेथे जेथे शक्य आहे, तेथे तेथे मराठीचा आग्रह धरा असा विचार डॉ. करंदीकरांनी प्रभावीपणे मांडला. या प्रसंगी डॉ. दत्तात्रय पुंडे यांनी संपादित केलेल्या 'वाङ्‌मयीन इतिहासाची संकल्पना,' या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. करंदीकरांच्या हस्ते झाले. अत्यंत भावपूर्ण शब्दात डॉ. पुंडे यांनी सर्वांचे आभार मानले आणि महाराष्ट्रातून ठिकठिकाणाहून आलेल्या साहित्यिकांच्या, अभ्यासकांच्या उपस्थितीत अभूतपूर्व चर्चासत्राचा समारोप झाला. या प्रसंगी एक पुस्तक प्रदर्शनही भरविण्यात आले होते. या लेखाच्या शेवटी असे म्हणावेसे वाटते की गेल्या पंचवीस वर्षांतील मराठी वाङ्‌मयीन इतिहास लेखनाबद्दलचे सूतोवाच या चर्चासत्रातून निर्माण झाले आहे.

□

## आगळे साहस

आपल्या महाविद्यालयातील एम्. कॉम. (प्रथम वर्ष) चे श्री. विजय वैद्य व बारावीतील विद्यार्थीनी कु. स्मीता नगरकर व कु. वर्षा बर्वे यांनी आपल्याच महाविद्यालयाचे माजीविद्यार्थी श्री. आनंत पाध्ये यांच्या नेतृत्वाखाली एक आगळे साहस केले.

यांनी एक रबरी होडी स्वत: बनवून त्यातून बामणोली ते वासोट किल्ला हा सुमारे ६ तासांचा प्रवास केला. त्यांना या प्रवासात वारा तसेच लाटांना तोंड द्यावे लागले. कोयनेच्या अथांग जलाशयात अशा परिस्थितीत केलेला हा प्रवास हे खरोखरच 'धाडस' होय.

या प्रवासाचे वैशिष्ट्य म्हणजे ट्रेकींग मध्ये अशा स्वरुपाच्या होडीचा वापर हा सर्वप्रथम केला गेला ही रबरी होडी फुगवल्यावर १२ फूट लांब होते. यात चार माणसे त्याच्या जवळील साहित्यासह (हॅवर सॅक वगैरे) बसू शकतात. प्रवासांसाठी वल्ही वापरली जातात. ही बोट गुंडाळून ठेवली तर एका 'सॅक' मध्ये मावते- वल्ही सुद्धा आयत्या वेळेस जुळवता येतात. हवा भरण्यासाठी पंप वगैरे काहीही लागत नाही. या होडीमुळे ट्रेकच्या वाटेत येणारी धरणे पार करणे सुलभ झाले आहे.

# अश्विन पुंडलीक आंतर-महाविद्यालयीन काव्यलेखन स्पर्धा

अश्विन पुंडलीक आंतर–महाविद्यालयीन काव्यलेखन स्पर्धेमध्ये १९८५–८६ चे पारितोषिक संगमनेर येथील संगमनेर महाविद्यालयातील विद्यार्थी श्री. प्रमोद बियाणी यांना मिळाले. त्यांनी "तुझ्यावरही कविता लिहिली असती" ही कविता सर्वोत्कृष्ठ ठरली. श्री. प्रमोद बियाणी यांनाच १९८४–८५ च्या स्पर्धेतही पारितोषिक मिळाले होते. अशा रितीने श्री. बियाणी हे या पारितोषिकाचे दुसऱ्यांदा मानकरी ठरत आहेत. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. देवळा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयातील श्री. अभय पवार, सटाणा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील श्री. कैलास पवार आणि अहमदनगर येथील अहमदनगर महाविद्यालयातील कु. प्रेरणा गोडसे यांच्या कविता उल्लेखनीय कविता ठरल्या.

यंदा स्पर्धेत एकूण १६ महाविद्यालयातील ४३ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. व स्पर्धेकरिता ८६ कविता पाठविल्या. पारितोषिक पात्र कवितेची निवड करण्याचे काम उपप्राचार्य सीताराम रायकर, डॉ. दत्तात्रय पुंडे व सौ. लीना पाटणकर यांनी केले. महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात हे पारितोषिक जाहीर झाले.

सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्याधर पुंडलिक यांचा मुलगा कै. अश्विन पुंडलिक यांच्या स्मरणार्थ मॉडर्न महाविद्यालय ही स्पर्धा आयोजित करते.

**डॉ. दत्तात्रय पुंडे, संयोजक**

अश्विन पुंडलिक आंतरमहाविद्यालयीन काव्यलेखन स्पर्धा

## 'तुझ्यावरही कविता लिहीली असती...'

तुझ्यावरही कविता लिहिली असती—
प्रिये !
या धारावीतल्या माणसांना
माणूसपण असते तर,
तुझ्या रेशमी हृदयावर
मी ही एक कविता कोरली असती.

तुझ्यावरही कविता लिहिली असती—
प्रिये !
दंगलीत हातपाय न गमवता
शांतपणे त्यांना जगता आले असते तर,
मी फक्त
तुझ्या मखमली ओठांवर
माझी कविता खेळवली असती.

तुझ्यावरही कविता लिहिली असती—
प्रिये !
घरी माझा बाप दुष्काळानें कासावीस नसता,
अन्
तुझ्या माझ्या प्रीतीसारखा
पाऊसही नियमीत बरसला असता तर'
मी तुझ्या अंगणातल्या
गुलमोहरावरही कविता लिहिली असती—

तुझ्यावरही कविता लिहिली असती—
प्रिये !
हे सगळे टोचलें नसते तर.
माझी कविता
फक्त तुझ्या माझ्या प्रीतमस्तकावर
शृंगारली असती.

प्रिये !
तुझ्या माझ्या गर्भरेशम दुनियेला
कसलेच संदर्भ नसते तर
मी फक्त तुझ्यावरच कविता लिहिली असती.

प्रमोद बियाणी
संगमनेर महाविद्यालय,
संगमनेर, ४२२६०५.

---

## हृया अनोळखी गावात

हृया अनोळखी गावात
पाऊल जरा जपुन टाक
हृया शब्दासारख.
जरा बहकलीस, पाऊल चुकलीस, तर—
गाव सारा पेटुन उठेल.
हृया शब्दांसारखा.

—कैलास पवार, कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, सटाणा.

## पहाट

थबकला,
चंद्र गाली
धुंद माळरानी
ओठात गीत घेऊनी
निघाल्या
पहाडावरल्या गौळणी

—अभय पवार
कला व वाणिज्य महाविद्यालय
देवळा.

## ' दिव्यात तरंगणाऱ्या '

दिव्यात तरंगणाऱ्या गावातून वाहात
गाडी केव्हा गेली कळलंच नाही...
उजाडलं, तेव्हा मी मुक्कास हरवून होते.
आतून नाती पुन्हा जखडताना अपर्यायी
प्लॅटफॉर्मवरच्या अंधूक प्रकाशात
बिछडणाऱ्यांच्या आणाभाका...
आठवणींच्या काजव्यांनी पुन्हा पुन्हा पेटत गेल्या
मी आत आत घुसमटत असताना
रस्ते अंगावर यावेत तस्से–
ऋतू बदलताना अचानक दंव घुटमळावं
शिवारात शुभ्र गायींचा कळप एकत्र यावा
तशी आभाळ गच्च माया उरात साठवताना
हवी नकोशी सावरी आभाळात सुटत जावी, अबंध
उखाण्यांनी तुझ्याशी खेळ मांडला विपर्यस्त
तेंव्हा उत्तर शोधताना घेतलेला वसा
काटेरी कुंपणासारखा
माझ्या पायाखाली येत राहिला.
अंधाराच्या हटवादी अव्हेरण्यात मी लुप्त होत गेले.
मला माहीत आहे.
तू शब्दांशी लपंडाव खेळण्यात गुंतला होतास...
माझ्या हाकांचा वणवा पेटत गेला
तू भांबावून गेलास, सावरलास, गहिवरलास, गुरफटलास
पुन्हा पुन्हा तू स्वतःशीस अनेक प्रश्न घोकलेस
त्यांना गोंजारलेस...आळवलेस...
अनुत्तरीतांकडे वळून पाहिलेस अनेकदा
तिमिर तणावांच्या तगमगीकडे दुर्लक्ष करून
तू आता या शांत तलावासाठी ये–
आनंद निर्णयाचे प्रतिबिंब उरात घेऊन
पूर्वेच्या लालीसाठी आसुसलेला हा तलाव
तेवढ्यासाठीच फक्त उचंबळतो आहे...!

कु. प्रेरणा गोडसे,
अहमदनगर महाविद्यालय,
अहमदनगर.

## निवडणूक

पाच एक वर्षांनी निवडणूक आली
नेतेमंडळीची कोण धावाधाव झाली ।। १ ।।

गरिबांच्या महाली कितीएक लावून गेले हजेरी
त्याबरोबर झाडून गेले आश्वासनांच्या फैरी ।। २ ।।

कोणी म्हणे नाही मला खुर्चीची हाव
मी फक्त घेतली तुमच्यासाठी धाव ।। ३ ।।

कोणी म्हणे करिन तुमच्या गरजा पूर्ण
पण या परिक्षेत करा मलाच उत्तीर्ण ।। ४ ।।

अशा तऱ्हेच्या आश्वासनांनी होरपळून जाई जनता
तरी प्रत्येकजण म्हणत असतो द्या मलाच मान्यता ।। ५ ।।

अखेर जनतेच्या प्रेमाने मिळतो याला हुद्दा
पण निवडणूक संपताच देतो जनतेलाच गुद्दा ।। ६ ।।

दोनच वर्षात येते त्याच्या दारी कार
कारमधून हिंडत असतो डौलाने घेऊन आरमार ।। ७ ।।

जनतेला करतो अगदी पिऊन कोळ
त्यावर वाढतो हा अवाढव्य पोळ ।। ८ ।।

अशा तऱ्हेच्या नेत्याला देऊ नये मान
आणि करू नये आपल्या हक्कांचा अवमान ।। ९ ।।

विद्या नाईक
अकरावी वाणिज्य

# उद्याची रात्र

रडरडूनी वाचूनि गीता
उठोनि मध्येचि अठवूनी माता
निशा हि जागवूनी काढली
आशा हि कशी मागे राहिली.
पावले मृत्युकडे वळली।

उद्याचा भयानक दिसला
अंगी दरदरुनी घाम फुटला
काळ काही केल्या थांबेना
जीवाचा कोंडमारा आवरेना
रोजचा अंधःकार संपला
रवीकिरण निर्दय दिसला
जीवनाची गीता ही संपली
यमदुतांची स्वारी–आली
पावले मृत्यूकडे वळली।

गळी गळपास अडकविला
आशेवरी पडदा पडलेला
मानवी न्याय संपलेला
क्रूरता क्षम्य नसलेला
यमदून मानव झाला

देहाची धडपड झाली,
पावले मृत्यूकडे वळली।

पार्श्वभूमी – कैद्याच्या फाशीच्या अगोदरची रात्र.

जगताप राजेंद्र बाबूराव.
द्वितीय वर्ष शास्त्र

□□

# तिची कहाणी

वाजवा रे वाजवा !
वाजली वाजंत्री सरला अंतरपाट
नवरी नवऱ्याची बांधली जन्माची गाठ
जेवणावळी होतात, आईस्क्रिम होते
मग निघते थाटामाटात वरात (१)

नव्या आशेने ती ओसांडते माप
पण होतो तिला फक्त मनःस्ताप
मनात असतात मोठ्या आशा
तिच्या वाटेला येते घोर निराशा (२)

नवरा म्हणतो, फ्रिज आण
नाहीतर होईल मारहाण
सासु नणंद करतात सत्ता
तिच्या डोक्यात घालतात बत्ता (३)

एक दिवस पेटते होळी
तिच्या जिवाची होते राखरांगोळी
सासु ओतते घासलेट, नवरा लावती काडी
तिच्या सर्वांगाची होते लाही लाही (४)

मग करतात सगळे आरडाओरडा
अहो अपघात झाला ! अपघात झाला !
तिची भरते शेवटची घटका
त्यांची होते निर्दोष सुटका (५)

अशी आहे तिची कहाणी
याची दखल घेईल का कोणी ?

कु. संगीता दत्तात्रय जाठवडेकर
प्रथम वर्ष वाणिज्य

## प्रतिक्षा

कळी उमलण्याचं स्वप्न पहात
वेडा चंद्र रात्रभर जागत होता.
कळी उमलणारच असा
त्याला विश्वास होता
सकाळ झाली कळी उमलली
पण पहायला चंद्रच कुठे होता

## परछाई

अंधाऱ्या विरहरात्री कुणीतरी
पापण्यांच्या पंखांनी वारा घालीत जोजवतय
लयीनं शांतपणे अंगाई गीत गातय
तळमळणाऱ्या मनाला शांततेचा लगाम घालतय
मी हळूवारपणे निद्रेच्या कुशीत शिरतोय.

मिलिंद वाईकर.
' प्रथमवर्ष वाणिज्य '

---

## एकात्मता

काही तरी करत रहा, जगासाठी झटत रहा,
ह्या मातीत जन्मलास या आईचे उपकार मानत रहा,
तू श्रेष्ठ आहे प्राणिमात्रात, तू विसरू नको जगास,
तू काहीही निर्माण करू शकतोस ह्या विश्वात.
स्वावलंबी बन तू, नको गरिबांचा तिरस्कार करू,
सर्व आपुले बंधु-माता-पिता मानुनी जगात रहा.
ह्या भूमीत जन्मलास, ही भूमी सत्यशामला कर तर,
जातिभेद सोडूनी एकतेचा संदेश पोचव घरादारा.
आपण सर्व एक आहोत असं निर्माण कर भारता
माणसाचा भरवसा नाही' आता आहे पण नंतर नाही.
ह्यासाठी क्षण घालवू नकोस, प्रयत्न तू करत रहा,
तर मिळेल तुला पुण्यलोकी आसरा.

राजेंद्र कांबळे.
द्वितीय वर्ष वाणिज्य

## ही तरी कविता जपशील ना !

नियतीच्या किमयेने
पुढील जन्मी भेटलो तर
या जन्मीचे विसरुन सारे
ओळख तर देशिल नां ! ॥

या जन्मी नाही जमली
पूर्ण कराया कहाणी आपुली
पुढील जन्मी नव्याने तरी
तो पुरी करशील नां ! ॥

या जन्मी सोडलीस साथ
तिन्हाईताचा पुढे धरशील हात
पुढील जन्मी स्वतःला विसरलो
तर माझाच पत्ता सांगशील नां ! ॥

तुझ्या माझ्या दिशा भिन्न
मिलनाचे दिसत नाही चिन्ह
पुढील जन्मी कधी दिसलीस तर
माझ्याच साठी थांबशील नां ! ॥

माझ्याशी अबोला धरलास तू
तरीसुद्धा फक्त एकदाच सांग नां ग
" माझ्या जनाजाच्या वेळी तरी
दोन अश्रू तेवढे ढाळशील नां ! " ॥

– सारंग

## मी कोण आहे ?

मी कोण आहे काय विचारता ?
मी आहे लोकशाहीची पाहुणी
देते मीच सर्वांना बसावयास जागा उसनी
आणि करते मीच सर्वांना लाच खाण्यास शहाणी
अशी आहे मी लोकशाहीची गृहिणी
माझ्याच हातात आहे सर्व देशाची राहणी
कोणाला हसविते, कोणाला रडविते
कोणाला हरविते, कोणाला फसविते
अशी आहे मी साधी सुधी गृहिणी
अनेक जण माझी स्तुती करती
आणि अनेक जण माझ्यासाठी दिन-रात झुरती
कोणाला उठविते, कोणाला चढविते
हे सर्व माझ्याच हाती. मी आहे साधी सुधी गृहिणी
ज्यास उठविते ते करतात माझी निंदानालस्ती
ज्यास बसविते ते स्तुती सुमनांचा वर्षाव करिती
किती करू मी माझी स्तुती
ओळखले नाही मला ? मी आहे खुर्ची

कु. वैशाली बसरावत
११ वी कॉमर्स

□□

## भावपुष्पे

भेटणाऱ्या भाविकाला टाळणे नाही बरे
शब्द कोरे, मानभावी, बोलणे नाही बरे ॥ १ ॥

पारदर्शी रंग आले ते माझ्या डोळ्यातले
ओढ माझी जाणूनीही, जाळणे नाही बरे ॥ २ ॥
भावपुष्पे मी दिलेली सांग ती गेली कुठे ?

तू फुले ही वाळणारी, माळणे नाही बरे ॥ ३ ॥
शोधतो, मी रोज आता या तुला स्वप्नांमध्ये

पापण्यांच्या, पैलरात्री चालणे नाही बरे ॥ ४ ॥
दूर का तू एकटीने मोहरावे बोल ना ?

मृगजळा हे जिवाशी खेळणे नाही बरे ॥ ५ ॥
जन्म आणि मृत्यू दोघे सोबती होते जेथे

मृत्तिकेला, चांदण्याने तोलणे नाही बरे ॥ ६ ॥

राजाराम दिवेकर
द्वितीय वर्ष शास्त्र

## यत्न यत्न यत्न

रूपात तुझ्या मला
प्रितीचा परमेश्वर दिसला
मी हार तुला चढवण्याआधिच
सजीव ते पाषाण झालं
डोळ्यात तुला साठवून
आगीतूनही धावत सुटलो
तुझ्या शिल्पाला जागवताना
आशेच्या चिंधड्या उडाल्या
अजब वेडा हिणवून
कुत्सित जग हसतेच
कधी रचलेलं घर
आत सपाट झालंय
वाटलं नव्हतं कधी
'प्रेममंदीर' ही ढासळतात
आता होऊनही वेडापिसा
मी मीनाक्षी घडवतोय
शिल्प तुझं साकारण्यासाठी
जीव माझा ओततोय

मधुकर जी थोरवे.
द्वितीय वर्ष कला

## मला व्हायचे नेता

भगवान का क्या बिगाडा था उसने? एक ओर पति निधन का तो दूसरी ओर माता-पिता के स्वर्गवास का सदमा, उसके मन में तुफान पैदा हुआ और उसमें घिरती हुई वह फिर स्टेशनपर आयी थी। 'वो मेमसाब, कहाँ जाना है? दो-चार गाडियॉं चली गई, आप बैंठी ही रही है।' कुली पूछ रहा था। इतनी देर तक वह अतीत में खो बैंठी थी। उसके जीवन का चित्रपट वह देख रही थी। कहाँ जाना है उसे? रेखा नहीं जानती थी कि उसे कहाँ जाना है। सर्वशक्तिमान परमेश्वर भी इस प्रश्न का उत्तर नहीं दे सकते!

कहाँ जाना है उसे?

□

## देखा प्यार तुम्हारा !

आँसू का हर बूंद
तेरी याद में
बेताब होकर घुल रही है
मिट्टी में ।
ऐसा कौन-सा गुनाह किया हमने
जो हमें यह सजा मिली ।
प्यार ही तो किया है ।
कोई पाप नहीं ।
लेकिन दुनिया की रीत ही निराली है,
प्यार माँगे नहीं मिलता ।
अब तो यह प्यार भरा दिल
कब्रिस्तान बन गया ।
वीरान हो गयी है जिंदगी
ऐसे ही– घुल-घुलकर हम
एक दिन विदा हो जाएँगे,
दूर ! दूर !! बहुत दूर !!!

– किरण गुप्ता
११ वी वाणिज्य

□

## जीवन के रंग

जीवन के हैं तीन पहलू
तीन पहलू-तीन रंग
गुलाबी, लाल-सा
अंतिम अनुभव धवल-सा

आया बचपन रंग गुलाबी
मौज-मस्ती इसकी खूबी
खिली लालगा हुए जवान
चार दिनों का यह सन्मान ।

आयी धवलता धीरे-धीरे
जर्जरता यौवन को रहती घेरे
दुनिया का आकर्षण हट जाता
आशा का दीपक बुझ जाता ।

– समशेरसिह चमलेगी
इ. ११ वी विज्ञान

## मन की बात

तेरे लिए यह गुलाब लाया
लेकिन मन मेरा घबराया

कैसा तरीका यह प्यार का
डर मुझे तेरे इन्कार का ।

आकाश में हैं बादल
लेकिन बरसात नहीं

दिल में है प्यार-सी वह बात
पर होती नहीं अपनी मुलाकात ।

गुलाब यह तेरे होठों का
चाँद है मेरे प्यार का
लेकिन डर है मुझे काँटों का ।

प्यार को न नफरत से देखो
काँटों से मत परेशान करो

अर्ज है तेरे प्यार की
प्यास नहीं है तेरे तन की
कही है यह बात मन की ।

– दादासाहेब कदम
द्वितीय वर्ष शास्त्र

□

## हँसी-खुशी से जीना सीखो

जीने को हम जग में आए, हँसी-खुशी से जीना सीखो,
सदाचार, कर्तव्य हमारा, शुभ कर्मों को करना सीखो,
लेने वाला दुःख भोगेगा, देने वाला सुखी रहेगा,
जग के हित में अपना हित हैं, तन-मन धन देना सीखो,
हँसी-खुशी से जीना सीखो ।।

लोभ मोह का संग छोडकर, माया के सब बन्ध तोडकर,
जिससे हो कल्याण सभी का, ऐसी करनी करना सीखो,
सुख में कभी न इतराना, दुःख में कभी न घबराना,
सुख-दुःख दोनों में सम रहकर, जीवन सफल बनना सीखो,
हँसी-खुशीसे जीना सीखो ।।

कोई दुर्घटना हो जाए, जीवन को घायल कर जाए,
फिर भी हम हिम्मत न हारे, ऐसा जीवन जीना सीखो,
हँसी-खुशी से जीना सीखो ।।

– अनिलकुमार तिवारी
इ. ११ वी शास्त्र

## बारहवीं कक्षा के लडके की कल्पना

अभी तो एफ्. वाय. मैं जाना पडेगा,
शेर शायरी आने लगी है मुझे ।

अभी तो एफ् वाय. में जाना पडेगा,
प्यार की राह मिली है मुझे ।

अभी तो एफ्. वाय. मे जाना पडेगा,
दूसरों को इस राह पर चलवाने के लिए ।

अभी तो एफ्. वाय. में जाना पडेगा,
अपना हमसफर ढुंढने के लिए ।

लेकिन,
अभी बारहवीं में पास होना पडेगा,
एफ्. वाय. में जाने के लिए ।

– राजेंद्र पारगे
प्रथम वर्ष शास्त्र

## गॅस सिलेंडर

आज का दिन तो क्या निकल आया है ।
उफ् फरिस्ते, न जाने कौन आनेवाला है ।
घर में खुशी छाई हुई है ।
वह तो बडी सपनों में खोई हुई लगती है ।
सुबह से बता रही है उसके बारे में ।
वह तो कुछ ज्यादा ही खुश नजर आ रही है ।
आज तो उसके ओठों पर गीतों के साहिर है ।
ना जाने आज उसे कौन से समिंदर का साहिल मिला है ।
अरे दोस्त, नहीं नहीं... यह गलतफहमी दूर करो
वो...वो नहीं जो तू समझ रहा है,
पर वह है एस्. ओ. का लाल रंगवाला
गॅस सिलेंडर ।
जिसका बेसबरी से इंतजार है उस घर की
माशूका को ।

– जयश्री कुलकर्णी
प्रथम वर्ष वाणिज्य

## हम सब एक है

भारत देश हमारा, देश हमारा
लगता है सबको प्यारा प्यारा ।

रहते हैं सब एक साथ ऐसे
लगते हैं गुलाब की पंखुडियाँ जैसे ।

सब पंखुडियाँ मिलके होता हैं फूल
होती हैं हमसे कभी ना कभी भूल ।

उस भूल को हम बुरा न समझते
बडा दिल करके माफ कर देते ।

हम सब का दिल हैं एक
लेकिन हमारे विचार हैं अनेक ।

इसलिए हर भारतीय कहता है
हम सब एक हैं, हम सब एक है ।

– कु. फरिदा सैय्यद
प्रथम वर्ष वाणिज्य

## शादी से परेशान

जब से हुई मेरी शादी आँसू बहा रहा हूँ।
आफत गले पडी हैं उसको निभा रहा हूँ ।
सुबह के नौं बजे हैं, श्रीमती सो रही हैं,
बच्चों की फौज बैंठी मेरी जान रो रही हैं ।
बच्चों के बीच बैंठा घंटी हिला रहा हूँ
आफत गले पडी निभा रहा हूँ ।

लेटी हैं वह पलंग पर सीर दर्द के बहाने,
किसकी मजाल हैं जो जाए उसे जगाने ।
मुझ पर हँसो न यारों मैं चूल्हा जला रह हूँ,
आफत गले पडी हैं उसको निभा रहा हुँ ।

मैंडम पास हैं बी. ए. वह काम क्या करेगी
वह लक्स से नहाकर खुशबू में तर रहेगी ।
उससे बचे जो तुकडे उससे नहा रहा हूँ ।
आफत गले पडी हैं उसको निभा रहा हूँ ।

— नविन्दरसिह सीतल
द्वितीय वर्ष शास्त्र

## बहुमूल्य चीज

गई थी मैं एक काव्य संमेलन में
ले गई थी एक बहुमूल्य चीज ।
मेरी दृष्टि से वह मेरी जान से भी ज्यादा थी ।
पता नहीं आप उसे कौन-सी दृष्टि से देखोगे ।
मैंने सिर्फ मेरी सहेली को बताया था ।
वह किमती चीज मैंने आखिर छुपाली ।
मगर डर था,
अगर कोई ले गया तो, होगी बडी तकलीब
जान पे आयेगी आफत
बहुत सोचा, मन को बहुत समझाया
मगर कोई आयडिया मेरे काम न आया ।
देखा सहेली ने मैं खोयी खोयी थी,
वह जोर से चिल्लायी,
अरे तेरी चप्पल यहाँ तो थी !

फरिदा सय्यद
प्रथम वर्ष वाणिज्य

## मेरा वतन मेरा जज़्बात

मेरा वतन हैं यह,
प्यार हैं मुझको इससे, इसका इकरार हैं ।
पर नाज कर सकूँ इस पर,
यह उम्मीद अब मुझसे बेकार हैं ।
तब और अब की क्यों करें तुलना
दोनों पलडी पर अपनें ही बाँटों से चाहते हैं हम तुलना ।

गुजर गया था जो कल,
वह आज के लिए हैं वह सिर्फ बसोहूत ।
पाक दामन पर लग गया दाग,
आज की हैं यही...हकीकत ।
मजहबों, जातियों. रिश्तों के सारे तमाशे,
अपनी ही नींव को कर रहे है खोखला बेचारे ।
आज तक एक न हुये, सचमुच सब हिन्दोस्तानी,
अब भी सच न कबूलें तो, हर बात हो जाये बेमानी -

मेरे वतन के जिगर पर,
अनगिनत हैं खरोंचे,
हर पल हर दिन,
खाता रहता हैं नयी चोटें
इसी जमीं पर द्रौपदी का हुआ था एक अफसाना,
हंसते हैं कई जिस पर, कोई हैं सिर झुकाता ।
आज फिर बन गये हैं तमाशाई,

नसों का लहू जाने क्यों हो रहा हैं पानी ।
अपनी संस्कृतीका चीरहरण,
अपनों से हो रहा हैं यहाँ पर,
पाँचों पांडव अवश से,
बैंठे हैं जहाँ पर ।
चेतनाशून्य होकर जड हो गये हैं कुद्द तो,
बाकि तडप कर चिल्ला रहे हैं बस करो, बस करो ।

बहुतों को होता हैं, दुःख,
पर जाने क्यों गुस्सा आता नहीं ?
हाय क्या हो गया हैं मेरे वतन को,
फिर कोई अर्जुन क्यों गांडीव उगता नहीं ?

— संजयकुमार भारद्वाज
तृतीय वर्ष विज्ञान

पुणे विद्यापीठ हिंदी विभाग की रजत जयंती के अवसर पर आयोजित काव्य पठण स्पर्धा में पुणे जिला में प्रथम.

## चल लौट चले !

अरे दिग भ्रमित पथिक पंछी
चल लौट चलें बसेरे की ओर।
धरा की देह से थोडासा ऊपर उठ,
सौंधी सी महक में लिपटी सोना माटी
पीली सी पकी सरसों, जो गदराये यौवन की
बाहों मे रही हैं झूम,
स्मृतियों के झरोखों से झांकते तेरे साथी,
तेरी प्रतिक्षा में मग्न हैं सब बावरे,
चल बांधे एक पावन प्रेम की डोर,
अरे दिग्भ्रमित पथिक...

आपाद मस्तक, हरित श्रृंगार से युक्त
व्योघरों की असिमित केश राशि फैलाये धरा,
जातकों के कलखों के नूपुरों की साज पर
उन्मुक्त यौवन के ज्ञान से 'मुक्त'
राह निहारे हैं तेरी व्याकुल सुन्दरी वसुंधरा
जल लहरों पर मानव क्रीड़ा को देख
मुस्काता हैं जहाँ हर नदिया का हर द्वार
अरे दिग्भ्रमित पथिक...

संवेदना से रहित इन गगनचुंबी अट्टालिकाओसे दूर
शीतल पवन के संग नृत्य करती संध्या के स्वागतार्थ,
झोपडीयों में आता हैं दियों से नूर।
घुंघट की ओट मे छिपे सलज्ज लोचन वादकर
छोड़ दे पागल मृगतृष्णा का मोह
अरे दिग्भ्रमित पथिक...

बैलों की जोडी के संग हल
ये तेरे हाथों का हैं बल
भूल जा शेष सब कुछ
जो तेरी अपनी आशाओंका हैं हल।
प्रपंच स्वार्थो का जाल निर्बल तुझे बना रहा
तेरे सुखी सपनों का काल, मिथ्या इन्द्रधनुषी सपने
सजा रहा
दूर जाता हैं क्यों रे ?
जननी का आंचल छोड़,
अरे दिग्भ्रमिक पथिक...

पीपल कें नीचे, तेरी चोढी के सम्मुख,
पायेगा जब तू, रंमाती गौओ का सुख।
स्वर्णिम गोधूलि की आभा से, प्रतिवल शोभित,
विश्वास कर यहाँ नहीं होगा, तेरा कोई भी स्वप्न
खंडित।
भाग्य की नाव को, परिश्रम के हाथों से चलाना सीख,
पुरुषार्थ को अपने तू, प्रकृतिकी राहों पर दे मोड।
अरे दिग्भ्रमित पथिक... ॥

– संजयकुमार भारद्वाज
तृतीय वर्ष विज्ञान

## हमारा समाज

तुमने अभी देखा ही क्या हैं यार,
तुम्हारे तो चारों ओर हैं प्यार ही प्यार ॥
जरा दूसरी ओर तो झाँको
उस समाज पर भी नजर फेंकों ॥
दलित नंगे बच्चे रहते हैं जहाँ,
बस दर्द ही दर्द बसा हैं वहाँ ॥
किन मुसीबतों सें गुजारते वे अपने दिन,
दिनभर कुछ भी पेटमें खाये बिन ॥
कभी नहीं जाते वे पाठशाला,
है न कोई उन्हें वहाँ भेजनेवाला ॥
उनके पास है माँ की रोती ममता,
और बाप जो गुस्से से डाँटता ॥
दिनभर करते है मजुरी काम,
पर मिलता है उन्हे बहुत कम दाम ॥
जरा देखो तो इन बच्चो कें मासूम चेहरे,
इने समाज में पाँव रखने के पहरे ॥
अब देखो इस समाज के हँसते खेलतें बच्चे,
जरा निहार के देखो क्या है वह मन के सच्चे ॥

करते है वह हर साल पढाई,
जिनपर लोग देते है बढाई ॥
उनके पास है माँ का ममता बरसता,
और बाप का पैसा है खर्चता ॥
खाते है ये रोज भरपूर आमलेट ॥
हाथों में भरे है इन के हरदम चॉकलेट ॥
इसी समाज में रहते है सच्चे झूठे नेता, ॥
जो अन्याय के खिलाफ आवाज उठाता ॥
गरीबों के घर कर के बरबाद,
रखते है ये अपना घर आबाद ॥
क्या करे वे भूखे-प्यासे दलित नंगे बच्चे,
भरे होंगें तुम्हारे भी दिल अगर हैं सच्चे ॥

—पाटील सुंदर लता
प्रथम वर्ष वाणिज्य

□

| पुणे विद्यापीठ आंतरराष्ट्रीय युवक वर्ष १९८५ शुभारंभ १२ जानेवारी १९८५ उत्कृष्ट घोषवाक्य तृतीय क्रमांक | आंतरराष्ट्रीय युवक वर्ष १९८५–८६ प्रभात फेरी १२ जानेवारी १९८६ सांघिक परिणाम तृतीय क्रमांक |
|---|---|

ESSAY CONTEST : FIRST PRIZE FOR SENIOR COLLEGE

# Unsolved Problems in Mathematics

★

Miss. Nivedita Shripad Bodas, T. Y. B. Sc.

Mathematics Association of I. I. T. Bombay holds 'MATHEMATICS OLYMPIAD' every year. This consists of written tests and Essay Competition. Our student Miss Nivedita Bodas Secured First Prize in Essay Competition for Olympiad 85. Her essay as it is given here.

It is universally acknowledged that man's life is full of problems. Since Mathematics is also an intimate part of man's every-day experience, it is but natural that it should abound with problems. Whil there are several areas in Mathematics, each withe its own array of problems, ' Number theory ' is one area which seems to offer apparently simple problems, whose solutions are world shaking

One of the most famous unsolved problems is, of course, Fermat's last theorem. Fermat was a remarkable mathematician who was immensely gifted in number theory. He was famous for his marginal notes. He used to write the small proofs of different problems in the margins. In his copy of The work of Diophantus, about the proof of this theorem he says that,-

" I have discovered a truly woderful proof of this, but the margin is too small to contain it. "

With one exception, all the other results which Fermat claimed to have proved, have been verified by other mathematicians, however years have passed, but this problem is unsolved.

This French Mathematician, Pierre de Fermat ( 1601-1665 ), stated the problem as –

For $x, y, z \in z^+$

$$x^n + y^n = z^n \quad \text{for } n \geqslant 3$$

has no integral solution.

On this problem a lot of research has been done. The case of 3 i. e. $n = 3$ was tested by Arab astronomer and mathematician Alhogendi. He made 970 unsuccessful attempts. In 1763 L. Euler proved the same case of $n = 4$ the first proof was given by Frenicle de Bessy ( 1602-1675 ). His method of proving was coincident with the method proposed by Fermat. In 1747 Euler ga ve proof showing that,

$$x^{4s} + y^{4s} = z^{4s} \qquad (s = -1, 2, \ldots\ldots)$$

is non-solvable.

Further for cases of $n = 5$ and $n = 7$ this problem was solved by Gauss – the mathematician who needs no introduction. Afterwards Dirichlet and Lame also gave a part of the proof for the same result. The rest was mainly tested for primes.

The mathematician Ernst Eduard Kummer ( 1810–1893 ) proved the result for a certain class of primes for which the equation

$x^n + y^n = z^n$ is solvable. This great achievement was not only a step forward in the solution of Fermat's problem, but also had a much deeper significance. Now, it has also been shown that–

$x^n + y^n = z^n$ has no solutions for

$x, y, z \in z^+$ where $3 \leqslant n < 25{,}000$.

But the problem is not completely solved. Parhaps some day, this citadel will also fall at the hands of some accomplished mathematician. But that day seems to be a long way off.

The second unsolved problem in number theory is the problem of infiniteness of prime twin pairs, i. e. whether there exist infinitely many prime twin pairs or there is a largest prime twin pair present.

There are different observations made about these prime twin pairs, about their frequency of occurrency presence or absence of prime twin pairs in some typical intervals etc. It has been found that in the interval 1 io 750 there are 30 prime twin pairs, and in the interval 751 to 1500 there are 20 prime twin pairs. It was noted that by neglecting noticeable irregularities, there is the decrease in the frequency of prime twin pairs. This problem of prime twin pairs cannot be solved on the same basis as Euclid's proof of prime numbers A proof patterned on Euclid's proof can be given as follows :

Let $m = (2 \times 3 \times \ldots p) - 1$,

$n = (2 \times 3 \times \ldots p) + 1$ be

two numbers, where p is a prime, then for certain cases as fallows :

$m = 2 \times 3 - 1 = 5 \quad n = 2 \times 3 + 1 = 7$

$m = 2 \times 3 \times 5 - 1 = 29 \quad n = 2 \times 3 \times 5 + 1 = 31$

$m = 2 \times 3 \times 5 \times 11 - 1 = 329 \quad n = 2 \times 3 \times 5 \times 11 + 1 = 331$

but in case of –

$m = 2 \times 3 \times 5 \times 7 - 1 = 209$

$n = 2 \times 3 \times 5 \times 7 + 1 = 211$

and

$m = 2 \times 3 \times 5 \times 7 \times 11 \times 13 - 1 = 30029$

$n = 2 \times 3 \times 5 \times 7 \times 11 \times 13 + 1 = 30031$

But in which 209 and 30031 are not primes hence the proof is invalid. Therefore the numbers m and/or n in the proof beyond a certain point are the composite numbers. Yet the problem is unsolved.

So much for those problems which have withstood the attacks of many, on their bastions and are still unconquered. In order to not paint too lismal a picture of the accomplishment of mathematicians, let us look at certaiu problems, which have been solved albeit after a long struggle. Certain problems such as the squaring of a circle, trisecting of an angle and the duplicating of a cube, come immdiately to mind. The famous four colour problem was solved as recently as in 1976.

In 1742 Golbach conjectured the at positivei ntegrals greater then 2 can be written as sum of two primes such as :

$4=2+2$, $6=3+3$, $8=3+5$, $10=3+7$ etc.

In 1964 Mek-Kong-Shen showed that the conjecture is true for integers upto 33, 000,000.

Two important problems known as Bieberbach's conjecture and Riemann's hypothesis are also solved recently.

It is the important conjecture in complex theory Bieberbach's conjecture is that $|a_h| \leqslant n$ holds for all $f(z) \in c$ and $n \geqslant 2$, where f (z) is the univalent| function. The univalentf unction f (z) is the function which is regular in the domain D for $w = f(z)$ assumes different values of w for different z in D. The conjecture has been proved in 1984 just few months back. It is one of the most recent development in Mathematics.

It is clear that these problems and othors unmentioned but not forgotten, have earned a place in the history of Mathematics. Whether they are completely solved or not, they will stand as a tribute to the complexity of the human mind, which cannot fathom a solution to its own questions.

□

A summary of the Project Report that won 2nd prize in the Project Report Competition arranged by the Commerce Association.

# Pattern - Making

★

Ujwala S. Lanawat, Swati S. Joshi, Sangeeta M. Gijare, Bhavati S. Babel, F. Y. B. Ccm.

Really speaking, when we entered in F. Y. B. Com, we were just bookworms. We even didn't know that activities such as " Project Report Competition, " are carried on by our Commerce Association. Our madame Mrs. Rahane gave detailed information about this project report competition and encouraged us. The aim of taking part in this competition was not only to get the prize but to get an experience and some extra knowledge.

You may think how these girls have chosen this subject i. e. pattern making which isn't related to our daily life. Actually we all were also puzzled when one of our friends suggested us to prepare report on this subject. As we are the commerce students we knew the word ' pattern ' but we were not aware of pattern making which is the heart of all large scale industries. Though it is the base industry, it is neglected by large scele industries as well as by common peaple.

Pattern making industry is a labour oriented industry. It is the very basis of engineering industry. Without patterns one can't have raw nature of product. Pattern making is generally carried on a small scale. But it may be on large scale also. It is an ancilliary business unit. Pattern makers make the patterns according to the drawings or designs given by the customers. They have to use their skill and intelligence while making such patteerns. This industry depends on large scale industries.

Pattern making is defined as, ' An art and heart of the foundry; foundation of the industry; mathematics with accuracy; metallurgy of the composition, machinist for quality; carpentary for carving; engineer

for light but sturdy construction and prompt delivery; good foundryman to produce quality castings or duplicate.'

Wood, metal, cast iron, brass, aluminium are the raw materials mainly used for patterns The most common wood used for parrten is ' teakwood.' Patterns are quoted according to the colour code system (I. S. I.) or British colour code system.

As discussed above pattern making industry is a small scale industry so it has to face all types of problems which all the small scale industries have to face. In addition to this it has its own problems also. The main problem faced by this industry is regarding payments Another problem is that they don't have their own association or organisation. Due to this their problems remain unsolved. This business isn't secured because it is a tailor made job.

From tne forgoing analysis and the opinion trend we can say that it has tremendous scope. As long as large scale industries exist pattern makers have full scope. Because as when as any new product is manufuctured by an industry or any product changes its shape, patterns have to be made. But as long as pattern making isn't recommended as an industry new pattern makers won't be willing to enter in it.

To collect the information we visited some of pattern making industries which are mentioned in our report. As these indusiries are on a small scale and neglected there is one man show. Sowe were doubtful whether he can spare time for us to have the detail information regarding the unknown trade for us. But fortunately we got the detail information from the owner of one of these industries. We explained them our view and intention of our subject and in the meetings and discussions not only we got the detailt of and in & outs of the pattern making and therehow we got encouraged for this projecs report. But in case of some industries the owners and other persons were not willing to give the information.

We thoroughly enjoyed preparing the report. We all friends came close to each other. We came close to our professors also. We think that this was a challenge to us. And we are happy that we accepted it and got success in it. We also feel that it will be useful in our future life. After completion of this report even till today we feel that all of us are in the same trade.

❑

# वार्षिक अहवाल १९८५–८६

## क्रिडा संघटना (वरिष्ठ महाविद्यालय)

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध स्पर्धांत भाग घेऊन नेत्रदिपक यश संपादन केले आणि महाविद्यालयाच्या किर्तीत भर घातली.

सतत दुसऱ्या वर्षी आंतर महाविद्यालयीन बॉल-बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष संघाने व सतत तिसऱ्यांदा महिला संघाने विजेतेपद मिळविले.

तसेच महिलांच्या आंतरमहाविद्यालयीन खो-खो, कबड्डी स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाने उपविजेतेपद संपादिले

आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत गोळाफेकमध्ये कु. शामला पाटील हिने रौप्यपदक मिळविले.

आंतरमहाविद्यालयीन मुष्टीयुद्ध स्पर्धेत राजेश हवालदार याने रौप्यपदक मिळविले. आंतरमहाविद्यालयीन कुस्तीस्पर्धेमध्ये श्री. कोकाटे एस. जी. याने ४८ किलो गटात उपविजेतेपद मिळविले. तसेच श्री. कामठे एस. एल. याने ५७ किलो गटात तृतीय क्रमांक मिळविला.

आंतर विभागीय स्पर्धेमध्ये आमच्या महविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी पुणे शहर विभागातर्फे प्रतिनिधीत्व केले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. सीमा जोशी | तृ. व. वाणिज्य | खो-खो |
| २) | कु. सुनिता लोखंडे | तृ. व. वाणिज्य | खो-खो |
| ३) | कु. उज्ज्वला कळसकर | द्वि. व. वाणिज्य | बॉल-बॅडमिंटन, व्हॉलीबॉल. |
| ४) | कु. विनीता अवसरीकर | तृ. व. वाणिज्य | बॉल-बॅडमिंटन |
| ५) | कु. सविता नेने | द्वि. व. वाणिज्य | ,, |
| ६) | कु. सुनंदा सूर्यवंशी | द्वि. व वाणिज्य | कबड्डी |
| ७) | कु. भारती रणपिसे | तृ. व वाणिज्य | ,, |
| ८) | कु. शुभांगी बागवडे | द्वि. व. कला | ,, |
| ९) | कु. शामला पाटील | द्वि. व. वाणिज्य | ,, |
| १०) | कु. माधवी भावे | द्वि. व. वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| ११) | कु. मनीषा गंभीर | द्वि. व. वाणिज्य | हँडबॉल व बास्केटबॉल |
| १२) | श्री. राजेंद्र कदम | तृ. व. कला | बॉल-बॅडमिंटन, व्हॉलीबॉल |
| १३) | श्री. रविंद्र पिसाळ | एम. कॉम. २ | ,, |
| १४) | श्री. वामन परांजपे | प्र. व. वाणिज्य | मल्लखांब |
| १५) | श्री. सुनिल पटेल | तृ. व. शास्त्र | बॉल-बॅडमिंटन |
| १६) | श्री. श्रीनिवास शास्त्री | तृ. व. वाणिज्य | ,, |
| १७) | श्री. अरविंद चव्हाण | तृ. व. कला | व्हॉलीबॉल |
| १८) | श्री. राजाराम खेडेकर | द्वि. व. वाणिज्य | बास्केट बॉल |

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | श्री. सुधीर मोघे | द्वि. व. कला | क्रिकेट |
| २०) | श्री. उमेश शिंदे | तृ. व. वाणिज्य | ,, |

आंतरविद्यापीठ महिला खो-खो स्पर्धेत पुणे विद्यापीठाला सतत तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवून देण्यात आमच्या खालील विद्यार्थिनींचा सहभाग होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. सीमा जोशी | तृ. व. वाणिज्य | खो-खो |
| २) | कु. सविता लोखंडे | तृ. व. वाणिज्य | खो-खो |

त्याप्रमाणे भारतीय ऑलिम्पिक स्पर्धात महाराष्ट्राला महिला खो-खो चे सुवर्णपदक मिळवून दिल्याबद्दल यांचे अभिनंदन. आंतरविद्यापीठीय क्रीडा इतर स्पर्धात खालील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पुणे विद्यापीठ संघात प्रतिनिधीत्व करून महाविद्यालयाच्या किर्तीत अनमोल भर टाकली,

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कु. उज्वला कळसकर | द्वि. व. वाणिज्य | व्हॉलिबॉल |
| २) | माधवी भावे | द्वि. व. वाणिज्य | ,, |
| ३) | कु. शामला पाटील | द्वि. व. वाणिज्य | ,, |
| ४) | कु. सुनंदा सूर्यवंशी | द्वि. व. वाणिज्य | कबड्डी |
| ५) | कु. मनिषा गंभीर | द्वि. व. वाणिज्य | हॅंडबॉल |
| ६) | श्री. राजेंद्र कदम | तृ. व. कला | व्हॉलीबॉल |

राज्यपातळीवरील स्पर्धात आमच्या महाविद्यालयाच्या खालील विद्यार्थी-विद्यार्थिनीनी विविध खेळात प्रतिनिधित्व केले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. राजेंद्र यादव | द्वि. व. कला | ज्यूदो |
| २) | कु. उज्ज्वला कळसकर | द्वि. व. वाणिज्य | बॉल-बॅडमिंटन |
| ३) | कु. माधवी भावे | द्वि. व. वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| ४) | कु. शामला पाटील | द्वि. व. वाणिज्य | व्हॉलीबॉल |
| ५) | कु. सीमा जोशी | तृ. व. वाणिज्य | खो-खो |
| ६) | कु. संगिता लोंखडे | तृ. व. वाणिज्य | खो-खो |
| ७) | श्री. राजेंद्र कदम | तृ. व. कला | व्हॉलीबॉल |
| ८) | श्री. सचिन सावंत | ति. व. वाणिज्य | बास्केट बॉल |

तसेच ह्यांची पश्चिम विभागीय संघात निवड झाली आणि अखिल भारतीय सराव शिबिरासाठी निवड झाली होती. श्री. राजाराम खेडेकर याने पुणे युनिव्हर्सियाड मध्ये पुणे विद्यापीठातर्फे बास्केट बॉलचे प्रतिनिधीत्व केले. पुणे विद्यापीठ आयोजित युनिव्हर्सियाड मध्ये आमच्या व्हॉलीबॉल संघाला तिसरा क्रमांक मिळाला.

राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात खालील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी प्रतिनिधित्व केले.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. राजेंद्र कदम | तृ. व. कला | व्हॉलीबॉल |
| २) | श्री. सचिन सावंत | द्वि. व. वाणिज्य | बास्केट बॉल |
| ३) | श्री. अनिल डांगे | तृ. व. वाणिज्य | सॉफ्ट बॉल |
| ४) | कु. माधवी भावे | द्वि. व. वाणिज्य | व्हॉली बॉल |
| ५) | कु. शामला पाटील | द्वि. व. वाणिज्य | व्हॉली बॉल |
| ६) | कु. उज्ज्वला कळसकर | द्वि. व. वाणिज्य | बॉल-बॅडमिंटन |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | कु. सीमा जोशी | तृ. व. वाणिज्य | खो-खो |
| ८) | कु. स गीता लोखंडे | तृ. व. वाणिज्य | खो-खो |

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाविद्यालयात आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. ह्या स्पर्धात तृ. व. कला या वर्गास सर्वसाधारण विजेतेपद मिळाले

'मॉडर्न श्री' चा बहुमान अनिल पवार द्वि. व. वाणिज्य ह्याला मिळाला.

आंतरविद्यापीठ महिला खो-खो स्पर्धेत पुणे विद्यापीठाला तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवून दिल्याबद्दल कु. संगिता लोखंडे तृ. व. वाणिज्य हिला विद्यापीठाने सुवर्णपदक देवून गौरव केला.

क्रीडा मंडळाचा पारितोषिक वितरण समारंभ प्रख्यात क्रीडापटू श्री. रमेश तावडे यांच्या हस्ते झाला.

या स्पर्धांना प्राचार्यांचे मार्गदर्शन लाभले. तसे प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व कार्यालयीन कर्मचारी ह्यांचे सहाय्य लाभले. आम्ही त्यांचे आभारी आहोत.

| | | |
|---|---|---|
| अनिल पाटील | किरण लागू | डॉ. अशोक पाथरे |
| उज्ज्वला कळसकर | क्रीडा संघटक | कार्याध्यक्ष |
| आंतरमहाविद्यालयीन क्रीडा प्रतिनिधी. | | |

# वार्षिक अहवाल १९८५–८६

## कनिष्ठ महाविद्यालय 'क्रीडा संघटना'

विविध क्रीडा प्रकारांमध्ये स्पृहणीय आणि अभिनंदनीय यश मिळवणे ही मॉडर्नच्या कनिष्ठ महाद्यालयाच्या क्रीडा संघटनेची परंपरा आहे. १९८५–८६ हे वर्ष देखिल या परंपरेत भरच टाकणारे ठरले हे सांगावयास अतिशय आनंद होत आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे जिल्हापरिषद पुणे, संयोजित आंतर शालेय पावसाळी व हिवाळी सत्रस्पर्धांमध्ये आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग दिला.

बास्केट बॉल, व्हॉलीबॉल, टेबल-टेनिस, कबड्डी, मैदानी स्पर्धा, हॉकी, फुटबॉल, पोहणे, हॅडबॉल. – अशा विविध स्पर्धांमध्ये आमच्या स्पर्धक खेळाडूंनी यशस्वी प्रतिनिधीत्व केले. त्यांच्या कौतुकास्पद कामगिरीकडे पाहिले तर खात्री पटते.

आंतर जिल्हा स्तर :–

| | | |
|---|---|---|
| जयदीप पाटणे | विजेता | ज्युदो |

मैदानी स्पर्धा

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ५००० मी. धावणे | प्रथम क्रमांक | अनिल पवार |
| २) | कुस्ती | प्रथम क्रमांक | बाबुराव वायकर |
| ३) | लांब उडी | दुसरा क्रमांक | संतोष सावंत |
| ४) | उंच उडी | तृतीय क्रमांक | ओंकार वाघमारे |

आमच्या महाविद्यालयातील काही विद्यार्थी स्पर्धकांनी मुलांच्या राज्य व राष्ट्रीय स्पर्धेतही नेत्रदीपक कामगिरी केली. त्यानी मिळविलेल्या यशाने मॉडर्न महाविद्यालयाचे नांव केवळ मराष्ट्रातच नव्हे तर भारतात गाजले.
आंतर राज्य स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू .–

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री बाबुराव वायकर | ...... | कुस्ती |
| २) | श्री. संतोष सावंत | ...... | लांब उडी |
| ३) | श्री. अनिल पवार | ...... | ५००० मी. धावणे |
| ४) | श्री. संजय यनपुरे | ...... | हॉलीबॉल |
| ५) | कु. धनश्री पोळ | ...... | खो-खो |
| ६) | कु. मंजुषा दातार | ...... | जिमनॅस्टिक |

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी निवड :–

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. जयदीप पटणे | ...... | ज्युदो |
| २) | श्री. सुधीर पालांडे | ...... | व्हॉलीबॉल |
| ३) | श्री. अजय गांधी | ...... | बॅडमिंटन |
| ४) | कु. धनश्री पोळ | ...... | खो-खो |
| ५) | कु. मंजूषा दातार | ...... | जिमनॅस्टिक |

एक विशेष करून नमूद करावेसे वाटते की श्री. अजय गांधी याची आंतरराष्ट्रीय पातळीवर बॅडमिंटन या क्रीडा प्रकारात खेळण्यासाठी व पतियाळा कॅम्पसाठी निवड झाली.

या सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन...!

प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयाच्या सांघिक व वैयक्तिक अशा आंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या अकरावी 'अ' या वर्गाने मुलांचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. बारावी 'बी' या वर्गातील संतोष सावंत हा मुलांच्या वैयक्तिक नैपुण्यपदाचा मानकरी ठरला. तर मुलींचे सर्वसाधारण वैयक्तिक नैपुण्यपद अकरावी 'अ' मधील संगीता कदम या विद्यार्थीनीने पटकावले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडा संघटनेस मा. प्राचार्य, उपप्राचार्य, कार्याध्यक्ष, उपकार्याध्यक्ष, जिमखाना संघटनेचे कार्यकारी मंडळ, कार्यालयीन कर्मचारी व सेवकवर्ग यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. क्रीडा संघटना आज याच पाठिंब्यावर दिमाखदार यश मिळवीत आहे. सर्वांच्या सहकार्याबद्दल, मार्गदर्शनाबद्दल आम्ही ऋणी आहोत.

धन्यवाद...!

जी. एम् बनसोडे
उपकार्याध्यक्ष

श्री. विनय शेरीकर
श्री. विनोद छाब्रा
क्रीडा संघटक

# शारीरिक शिक्षण विभाग

## वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय

शरीर माधंम खलु धर्म साधमम्

महाविद्यालयाच्या १९८५–८६ या शैक्षणिक वर्षाच्या शारीरिक शिक्षणांच्या तासांना ८–७–१९८५ पासून सुरवात झाली. व विद्यार्थ्यांमधूनच शारीरिक शिक्षण संघनायकांची निवड करण्यात आली आणि त्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

प्रथम वर्ष कला, वाणिज्य व शास्त्र, या वर्गासाठी आठवड्यातून ३ वेळा (मंगळवार, गुरुवार, शनिवार) सकाळी महाविद्यालय सुरू होण्यापूर्वी ६–४० ते ७–२० ह्या वेळात शारीरिक शिक्षणाचे तास घेण्यात आले.

तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शारीरिक शिक्षणाचे तास हे त्यांच्या वर्गाच्या वेळापत्रकानुसार महाविद्यालयाचे नियमित वेळात घेतले गेले. ते प्रतिवर्ग आठवड्यास दोन याप्रमाणे होते.

वरील शारीरिक शिक्षणाच्या तासांना, विद्यार्थ्यांना, विविध खेळाचा सराव त्याचे कौशल्य, तंत्र, आणि त्यासाठी आवश्यक असणारी शारीरिक क्षमता विद्यार्थ्यात निर्माण करण्यात आली.

कनिष्ठ महाविद्यालयाची वर्षातून दोन वेळा शारीरिक क्षमता कसोटी घेण्यात आली· त्यात १०० मी. पळणे गोळा फेक व लांब उडी या प्राथमिक कौशल्याचा समावेश होता.

वरिष्ठ महाविद्यांलयातील विद्यार्थ्यांसाठी वर्षअखेर शारीरिक क्षमता कसोटी घेण्यात आली त्यात १०० मी धावणे, लांब उडी, स्कॉट ॲण्ड थ्रस्ट' शरीर खेच (पुल अप्स), सीट अप्स् आणि दोरीवरच्या उड्या (स्किपींग) यांचा समावेश होता.

शारीरिक शिक्षणाद्वारे शारीरिक दोषांचे उच्चाटन करणे, मसाज, आरोग्य विषयक सल्ला, उंची वाढविणे अंगातून मेद कमी करणे, चौरस आहार या विषयी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आले.

वैद्यकीय तपासणी :–

दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी प्रथम वर्ष शास्त्र, कला व वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी शारीरिक शिक्षण विभागाच्या पुढाकाराने घेण्यात आली.

२६ जानेवारी व १५ ऑगस्ट हे राष्ट्रीय सण विद्यार्थ्यांनी साजरे केले.

आंतरराष्ट्रीय युवक वर्षाच्या सांगता समारंभानिमित्त पुणे विद्यापीठाने दि. १२· जानेवारी १९८६ रोजी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची प्रभात फेरी आयोजित केली होती. त्यामध्ये आमच्या महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला होता. प्रा. जयंत जोर्वेकर यांनी विद्यार्थीनींना व विद्यार्थ्यांना संचलन गीताचे उत्कृष्ट मार्गदर्शन केले. त्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

खालील विद्यार्थ्यांनी उत्तम संघनायक म्हणून काम केले.

| | | |
|---|---|---|
| १) | कु प्रतिभा उपाध्ये | व्दि. व. कला |
| २) | कु. निलीमा आगाशे | तृ. व. कला |
| ३) | कु. कल्पना रणपिसे | १२ वी आर्टस् |
| ४) | श्री. पवन वासन | व्दि. व. शास्त्र |

५)	श्री. जगदीश सातव	तृ. व. वाणिज्य
६)	श्री. संतोष सावंत	१२ वी आर्टस्

मा. प्राचार्य, कार्यालयीन कर्मचारी, संघनायक, श्री. यादव, श्री. अनिल पाटील' कु. उज्वला कळसकर श्री. राजेंद्र कदम यांच्याकडून लाभलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

श्री. विनोद छाब्रा
श्री. विनय शेरीकर
शा. शिक्षण, शिक्षक,
कनिष्ठ महाविद्यालय

श्री. किरण लागू
संचालक
शा. शिक्षण विभाग

## साहित्य संघटना, १९८५–८६

साहित्य संघटनेच्या वतीने १९८५–८६ या शैक्षणिक वर्षात पुढील कार्यक्रम करण्यात आले.

१–८–८५ 'लोकमान्य टिळकांचे राजकारण व कर्मसिद्धान्त' या विषयावर डॉ. अ. म. देशपांडे यांचे भाषण (वादविवाद मंडळाचे सहकार्याने)

१५–८–८५ 'राष्ट्रभाषा' हिंदी भित्तिपत्रकाचे प्रकाशन.

१४–९–८५ 'हिंदी दिवस' सांस्कृतिक कार्यक्रम या कार्यक्रमाचे निमित्ताने विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

२४–९–८५ 'पवनाकांठचा धोंडी' या कादंबरीवर प्रा. वीणा देव यांचे व्याख्यान

२४–९–८५ 'मानस–नस–विकृति–उपचारपद्धति' या विषयावर प्रा. आर. व्ही. किंकर (वाडिया महाविद्यालय) यांचे भाषण.

२–१०–८५ 'सत्तान्तर' या कादंबरीवर परिसंवाद डॉ. विद्याधर पुंडलीक, डॉ. श्रीलेखा साने, डॉ. सुप्रिया अत्रे, प्रा. दत्तात्रय लिमये व कु. नीता संसारे व श्री. लोंढे यांनी परिसंवादात भाग घेतला.

१२–९–८५ 'भिंती' (लेखिका – विनया खडपेकर) व 'कुणाच्या खांद्यावर' (लेखक – बा. ग. केसकर) या कादंबऱ्यांवर विद्यार्थ्यांची लेखकांशी खुली चर्चा. अध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे.

१५–९–८५ 'माणसं' (ले. अनिल अवचट) या पुस्तकावर प्रा. यशवंत सुमंत यांचे द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान.

३०–९–८५ 'संगीत सौभद्र' या विषयावर डॉ. वि. भा. देशपांडे यांचे द्वि. व. कला विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान.

द्वितीय सत्रात पुढील कार्यक्रम झाले.

हिंदी विभागातर्फे हिंदी निबंध व वक्तृत्व स्पर्धा आयोजिल्या होत्या.

महाराष्ट्र, गुजरात राज्य हिंदी निबंध स्पर्धेत कु. सुशीला गोंड (द्वि. व. वाणिज्य) या विद्यार्थिनीस द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

१३–१–८६ मानसशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी येरवडा येथील केंद्रीय मानसिक आरोग्य व संशोधन संस्थेला शैक्षणिक भेट दिली.

१७-१-८६ गोखलेनगर येथील 'कामायनी' या मतिमंद मुलांच्या विकासासाठी चालविण्यात येणाऱ्या शाळेस मानसशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक भेट.

या कार्यक्रमांव्यतिरिक्त अर्थशास्त्र विभाग नियोजन चर्चा मंडळ व साहित्य संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पुढील कार्यक्रम झाले.

श्रीमती लता भिसे यांचे 'नियोजन आणि स्त्री' या विषयावर व्याख्यान.

प्रा. प्र. ना. परांजपे, प्रमुख, वृत्तविद्या विभाग, पुणे विद्यापीठ यांचे 'वृत्तपत्रे आणि आपण' या विषयावर व्याख्यान व चर्चा.

डॉ. सुधाकर भोसले, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, यांचे 'आपण साहित्य का वाचतो ?' या विषयावर व्याख्यान.

डॉ. सु. व्यं. घायगुडे,
कार्याध्यक्ष, साहित्य संघटना.

## शास्त्र संघटना

व्यवस्थापक समिती :–

अध्यक्ष : प्राचार्य स. य. गंभीर — कार्याध्यक्ष : प्रा. अ. वि. रायरीकर

प्राध्यापक सदस्य

श्री. श्री. न. भिडे
श्री. वा. र. अहिरराव
श्री. प्र. श्री. कापरे
डॉ. सौ. कांचनगंगा गंधे
डॉ. हे. वि. घाटे
श्री. प्र. दि कुलकर्णी
श्री. ए. व्ही. देशपांडे

विद्यार्थी प्रतिनिधी :– तृतीय वर्ष शास्त्र

कु. वंदना श्रीवास्तव
श्री. दिलीप पांडे
कु. सविता पाटील
श्री. संजय भारद्वाज
श्री. संजय कन्हेर
श्री. मिलींद क्षीरसागर

द्वितीय वर्ष शास्त्र

श्री. प्रशांत दिवेकर
श्री. मनोज कुलकर्णी
श्री. अभय ठकार
श्री. महेंद्र पटेलिया
श्री. पंडीत शेळके
कु. कल्पना कोल्हे
श्री. राजाराम दिवेकर

कार्यालयीन व्यवस्था : भू. र. दोशी

१९८५-८६ या वर्षासाठी श्री. दिलीप पांडे (तृ. व. शास्त्र) या विद्यार्थ्याची विद्यापीठासाठी शास्त्र संघटनेच प्रतिनिधी म्हणून निवड एकमताने झाली. त्याबद्दल त्याचे अभिनंदन संघटनेतर्फे खालील उपक्रम करण्यात आले.

१) विज्ञान विश्व :–

"विज्ञान विश्व" या भित्तीपत्रिकेचे यावर्षी एकूण चार दर्जेदार अंक सादर करण्यात आले. या अंकामधून नवनवीन, विविध शास्त्रीय विषयांवर मनोरंजक माहिती देण्यात येते. सदर अंकासाठी विद्यार्थी खूपच साहित्य आणून देतात हे नमूद करण्यास आम्हास आनंद वाटतो. या भित्तीपत्रिकेसाठी श्री. मिलिंद क्षीरसागर याने विशेष परिश्रम घेतले. त्याला सर्वश्री संजय भारव्दाज, दिलीप पांडे, संजीव कन्हेरकर, शैलेश चव्हाण व महेश बेंडे यांची मदत झाली.

३) विभागीय उपक्रम : गणित विभाग

अ) Rose & Lera moris Trust यांच्या सौजन्याने तृ. व. शास्त्र (गणित) च्या विद्यार्थ्यांसाठी पर-वर्षीप्रमाणे 'Computer Programming in Basic' या विषयीचा अभ्यासक्रम दिवाळीच्या सुट्टीत आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी Computer वर प्रात्यक्षिके केली. आमचेच माजी विद्यार्थी श्री. संजय देशपांडे व सतीश दुराफे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आम्ही या संस्थेचे विश्वस्त तसेच ग्रंथपाल श्री. पटवर्धन यांचे आभारी आहोत. वरील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी यस्वीपणे पूर्ण केला. त्याबद्दल ट्रस्टतर्फे त्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली.

ब) ५, ६ व ७ जानेवारी १९८६ या काळात Morris Trust व Computers Sosiety of Indta यांच्या विद्यमाने टिळक स्मारक मंदिरात गणक यंत्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमात आमच्या तृ. व. शास्त्र (गणित) च्या सर्व विद्यार्थ्यांनी भाग घेतला. गणकयंत्राचे कार्य त्यांनी लहान आज्ञावली Programme च्या मदतीने प्रेक्षकांना समजावून सांगितले· ट्रस्टतर्फे आमचे माजी विद्यार्थी श्री. संजय देशपांडे व सतीश दुराफे यांना सुवर्ण पदके देण्यात आली.

क) १३ जानेवारी ८६ रोजी तृ. व. शास्त्र (गणित) च्या विद्यार्थ्यांची टेल्को (पिंपरी) कारखान्याच्य कॉम्प्युटर विभागाला अभ्यास सहल आयोजित करण्यात आली. या विभागातील अधिकारी श्री. जयराज व श्री. अगरवाल यांचे आम्ही आभारी आहोत.

ड) २ फेब्रुवारी १९८६ रोजी I. I. T. मुंबईच्या "Mathematics Association" ने "Maths olympiad" ही स्पर्धा आयोजित केली होती. त्यासाठी गणित विभागाचे तृ. व. शास्त्र (गणित) चे ११ विद्यार्थी व तृ. व. शास्त्र (गणित) चे २ विद्यार्थी पाठविले होते. तृ. व शास्त्रचा श्री. बर्सैन्नर याने सदर परीक्षेत ७५ टक्के गुण मिळवून स्पृहणीय यश संपादन केले. तसेच I. I. T. ने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेमध्ये प्र. व. शास्त्राचा श्री. उमेश पोटभरे याने On Zero हा निबंध पाठविला.

मागील वर्षाच्या या स्पर्धेमध्ये कु. निवेदिता बोडस या विद्यार्थीनीने प्रथम पारितोषिक मिळविले सदर निबंध ' Unsolved Problems in Mathematies" यात्र अंकात प्रसिद्ध केला आहे.

३) विभागीय उपक्रम (भौतिकी विभाग)

Indian Physics Associatian ने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन "Physics Quiz" या स्पर्धेमध्ये आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी भाग घेऊन उपविजेतेपद मिळविले.

| | | |
|---|---|---|
| १) | कु. वासंती नवाथे | (१२ वी शास्त्र) |
| २) | कु. भुवना सुब्रम्हण्यम | (१२ वी शास्त्र) |
| ३) | श्री. तारक राईलकर | (प्र. व. शास्त्र) |
| ४) | श्री. पंडीत शेळके | (द्वि. व. शास्त्र) |
| ५) | श्री. बामगोळे | (तृ. व. शास्त्र) |

४) विभागीय उपक्रम (संख्याशास्त्र)

१५ जानेवारी १९८६ रोजी डॉ. अनिल गोरे (प्रपाठक, संख्याशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ) यांचे "चूल आणि मूल" या विषयावर शास्त्रीय परंतु मनोरंजक व्याख्यान झाले.

तसेच २० जानेवारी १९८६ रोजी डॉ. धर्माधिकारी (प्रपाठक, संख्याशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ) यांचे Use of Statistlcal Methods in Industrial Problems या विषयावर अत्यंत माहिती पूर्ण व्याख्यान झाले.

५) विभागीय उपक्रम (भूगोल विभाग)

अ) २० सप्टेंबर १९८५ रोजी डॉ. शशिकांत सावंत (प्रपाठक, भूगोल विभाग, पुणे विद्यापीठ) यांचे

Growth of Poona City या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात डॉ. सावंत यांनी पुणे शहराच्या विकासातील विविध ऐतिहासिक, भौगलिक व सांस्कृतिक घटकांचे सविस्तर विविचेन करून वस्तीविकासाच्या अवस्थांचे शास्त्रीय स्पष्टीकरण केले.

ब) प्रथम वर्ष विज्ञान व द्वि. व. विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांनी गरवारे विद्यालयात प्रा. अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली खडकांच्या वैशिष्टयपूर्ण प्रदर्शनास भेट दिली. या भेटीत विद्यार्थ्यांना दख्खन पठारावरील व सागरी परिसरातील खडकांचे विविध प्रकार शंख, शिपले, मोती पंकाश्म यांची निर्मिती, गुणधर्म, उपयोग इ. माहिती मिळाली.

क) " Geographical Events " हा भूगोल शास्त्रातील अद्ययावत् माहितीचा उपक्रम भौगोलिक घटनांचे विषयवार वर्गीकरण व संग्रह तयार करून अधिकाधिक विद्यार्थ्यांना परिचित करून देण्यात आला.

५) विभागीय उपक्रम (रसायनशास्त्र)

रसायनशास्त्र विभागाने ७ मार्च १९८६ रोजी डॉ. टी. एस्. राव (प्रपाठक, रसायनशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ) यांचे Fumctions of Thermodynamics या विषयावर व्याख्यान आयोजित केले.

६) विभागीस उपक्रम (वनस्पतीशास्त्र विभाग)

१७ जानेवारी रोजी वनस्पतीशास्त्र विभागाने डॉ. व्ही. डी. रानडे (प्राध्यापक, गरवारे महाविद्यालय) यांचे Myxomycetes या विषयावर व्याख्यान ठेवले होते. व्याख्यान खूपच छान व माहितीपूर्ण झाले.

७) शास्त्र संघटना व हिंदी मंडळ यांच्या विद्यमाने डॉ. गोयल (प्रपाठक, प्राणीशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ) यांचे "यौन शिक्षा का महत्त्व" या विषयावर माहितीपूर्ण व उपयुक्त व्याख्यान झाले.

८) व्यवसाय मार्गदर्शन शिबिर :–

दरवर्षीप्रमाणे वाणिज्य संघटनांच्या सहकार्याने ८ व ९ मार्च या दोन दिवसात तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यासाठी "व्यवसाय मार्गदर्शन शिबिर" आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात अर्ज कसा लिहावा ? मुलाखत कशी द्यावी ? इ. बद्दल सविस्तर माहिती दिली जाते. तसेच गुणवत्ता चाचणी घेण्यात येते. या शिबीरासाठी निरनिराळ्या क्षेत्रातील नामवंत व्यक्तींना बोलावले जाते.

आपल्या महाविद्यालयातील प्रा. सौ. शाळिग्राम व प्रा. सौ. परूळेकर यांचाही मोठा सहभाग या शिबिरात होता. सदर शिबीरास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

## भूगोल विभाग शैक्षणिक सहल वृत्तांत १९८५-८६

१) २२ डिसेंबर व २९ डिसेंबर १९८५ या दिवशी अकरावी (कला) या वर्गातील भूगोलाच्या विद्यार्थ्यांनी नऱ्हे व नांदेड या पुणे परिसरातील ग्रामीण वस्त्यांचे भौगोलीक सर्वेक्षण प्रा. विलास आल्हाट व प्रा. मानसिंग साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

४ जानेवारी १९८६ रोजी अकरावी विज्ञान व द्वितीय वर्ष विज्ञान या वर्गातील भूगोलाच्या विद्यार्थ्यांनी पुणे परिसरातील भूगाव या ग्रामीण वस्तीचे भौगोलीक सर्वेक्षण केले. प्रा. वाल्मिकी अहिरराव व प्रा. रामचंद्र झगडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

नन्हे, नांदेड व भूगाव या ग्रामीण वस्ती सर्वेक्षण वस्तीची जागा, ठिकाण व स्थिती, भूरचना, जलप्रणाली नै. वनस्पती, मृदा या भौगोलीक अंगांबरोबरच सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक बाबींचे नकाशा निरीक्षण, प्रश्नावली व मुलाखतींद्वारे ग्रामीण वस्त्यांच्या समस्या व विकासाचें भौगोलीक स्वरूप अभ्यासण्यात आले.

२८ डिसेंबर १९८५ ते ३ जानेवारी १९८६ या काळात द्वितीय व तृतीय वर्ष कला या वर्गातील भूगोल (विशेष) विषयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल मडगांव-वास्को-पणजी येथे आयोजित केली होती. या सहलीत सह्याद्रीची भूरूप वैशिष्ठये, अरबी समुद्र किनाऱ्याचे गुणधर्म व परिवर्तने, मानवीजीवन व राष्ट्रीय सागरशास्त्र संशोधन संस्था (N. I. O.) यांचा अभ्यास करण्यात आला. प्रा. आपटे व श्रीमती कारखानीस यांनी मार्गदर्शन केले.

या वर्षाच्या शास्त्र संघटनेच्या उपक्रमांच्या यशामध्ये सर्व प्राध्यापक सदस्यांचा व विद्यार्थी प्रतिनिधींचा वाटा आहे. श्री. दोशी यांची खूपच मदत झाली. संघटनेच्या प्रत्येक उपक्रमात प्राचार्य, उपप्रचार्य व सर्व विभाग प्रमुखांचे सहाय्य मिळाले. संघटनेच्या कामास ज्यांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हातभार लागला त्या सर्वाची शास्त्र संघटना आभारी आहे.

प्रा. अ. वि. रायरीकर (कार्याध्यक्ष)

## वाणिज्य संघटना

वाणिज्य संघटनेचा १९८५-८६ चा वार्षिक अहवाल सादर करण्यास मला आनंद होत आहे.

या वर्षासाठी खालील पदाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| डॉ. माधवी मित्र | कार्याध्यक्ष | |
| प्रा. य. र. वाघमारे | प्राध्यापक मार्गदर्शक | |
| प्रा. संजीवनी शहाणे | ,, | |
| प्रा. सुनील दाढे | ,, | |
| प्रा. रेखा आगाशे | ,, | |
| श्रीनिवास शास्त्री | विद्यार्थी प्रतिनिधी | तृ. व. वाणिज्य |
| सीमा सावडकर | ,, ,, | द्वि. व. वाणिज्य |
| मंजुषा साठे | ,, ,, | ,, |
| माधुरी देवधर | ,, ,, | ,, |
| सुनीता राठी | ,, ,, | प्र. व. वाणिज्य |

संघटनेतर्फे या वर्षी खालील प्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

भित्तिपत्रक : संघटनेच्या कार्यक्रमांची सुरुवात 'कॉम' या भित्तिपत्रकाच्या प्रकाशनाने दि. १५ ऑगस्ट १९८५ रोजी झाली. कॉमच्या या वर्षीच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन प्रा. स. य. गंभीर यांच्या हस्ते झाले. या वर्षी

कॉमचे एकूण पाच अंक प्रकाशित झाले. त्यापैकी एक अंक कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तयार केला.

शैक्षणिक भेटी : विद्यार्थ्यांनी खालील संस्थांना भेटी देऊन त्यांच्या कार्यपद्धतीचे निरीक्षण केले.

बँक ऑफ महाराष्ट्र : मुख्य कार्यालय, पुणे.

सकाळ पेपर्स प्रा. लि. पुणे.

राजाबहादुर मोतीलाल मिल्स, पुणे

वरील संस्थांनी या भेटी आयोजित करण्यास परवानगी दिल्याबद्दल संघटने तर्फे त्यांचे आभार.

प्रकल्प अहवाल स्पर्धा : दर वर्षी प्रमाणे यंदाही प्रकल्प अहवाल स्पर्धा आयोजित करण्यात आली. १५ गटांनी या स्पर्धेत भाग घेऊन विविध विषयांवर अहवाल तयार केले. श्री. श्रीकांत जोशी व्यावसायिक सल्लागार व प्रा. मुकुंद महाजन यांनी परीक्षक म्हणून काम केले. खालील प्रमाणे तीन पारितोषिके देण्यात आली.

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक : | राजश्री देशमुख, शुभदा गोडबोले<br>वैशाली कानडे, मेघा जोशी |
| द्वितीय क्रमांक : | उज्वला लूनावत स्वाती जोशी<br>संगीता गिजरे, भारती बाबेल |
| तृतीय क्रमांक : | रोहिणी गोखले, मंजुश्री मांडके<br>मनिषा जोशी, वृंदा केळकर |

पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन.

लघु प्रकल्प स्पर्धा – या वर्षी प्रथमच कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यासाठी लघु-प्रकल्प स्पर्धा आयोजित केली होती. आपल्याच महाविद्यालयातील प्रा. यशवंत सुमंत व प्रा. वसुंधरा हिरडे यांनी परीक्षक म्हणून काम केले. प्रा. प्र. स. चिरपुटकर यांच्या हस्ते खालील प्रमाणे पारितोषिके देण्यात आली.

| | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक : | दीपा पारखी व गौरी होनप. |
| द्वितीय पारितोषिक : | शर्मिला नाईक |
| तृतीय पारितोषिक : | प्रज्ञा पोरे |

वरील दोन्ही स्पर्धांच्या परीक्षकांनी आपला वेळ खर्चून सर्व अहवाल वाचून त्यांचे परीक्षण केले आणि नंतर असे अहवाल कसे तयार करावेत या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

व्यवसाय मार्गदर्शन शिबीर : दर वर्षी प्रमाणे यंदाही शास्त्र संघटनेच्या सहकार्याने व्यवसाय मार्गदर्शन शिबीर ८ व ९ मार्च रोजी आयोजित करण्यात आले. महाविद्यालयातील प्राध्यापकांखेरीज इतर अनेक मान्यवर व्यक्तिंनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. सहस्रबुद्धे, पुणे विद्यापीठ, संगणक विभाग, ब्रिगेडियर पित्रे, श्री मिजार, बँक ऑफ महाराष्ट्र, श्री. खिरे, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, श्री. बालसुब्रम्हण्यम, वनाज इंजीनियरिंग, श्री. चाफळकर यांनी या संदर्भात दिलेल्या सहाय्याबद्दल संघटना त्यांची आभारी आहे.

वरील सर्व कार्यक्रम आयोजित करण्यात अनेक प्राध्यापक व विद्यार्थी यांचे सहकार्य मिळाले त्याबद्दल त्यांचे आभार. या वर्षी विद्यार्थी प्रतिनिधींचा सहभाग जरा कमी झाल्यासारखा वाटला. त्यात पुढील वर्षी सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे.

कार्यालयीन कामाची जबाबदारी श्री. दिलीप खोपकर यांनी व्यवस्थित सांभाळली त्याबद्दल त्यांचेही मन:पूर्वक आभार.

माधवी मित्र

## पदव्युत्तर विद्यार्थी संघटना

महाविद्यालयातील एम. कॉम च्या विद्यार्थ्यांची संघटना १९७७-७८ पासून कार्यरत आहे. संघटनेतर्फे व्याख्याने परिसंवाद. औद्योगिक भेटी इ. प्रकारचें कार्यक्रम आयोजित केले जातात. संघटनेच्या १९८५-८६ या शैक्षणिक वर्षासाठी पुढील विद्यार्थ्यांनी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून काम पाहिलें. कु. राजश्री भागवत, कु. आरती फाटक, श्री. विकास पेशवे, श्री. कोठावले, श्री. राजडे व श्री पंडीत. एम कॉम पार्ट १ या वर्गाचे वर्ग प्रतिनिधी म्हणून श्री. जालिंदर कामटे यांची निवड झाली. व एम कॉम पार्ट २ साठी श्री. रविंद्र पिसाळ यांची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

१) व्याख्याने : संघटनेतर्फे या वर्षी पुढील कार्यक्रम आयोजित करण्यात आले. वैकुंठलाल मेहता इन्स्टिटयूट ऑफ को ऑपरेटीव्ह मॅनेजमेंट या संस्थेतील प्राध्यापक डॉ. कामत ह्यांची 'मॅनेजमेंट ऑफ को ऑपरेटीव्ह सेक्टर' या विषयांवर व्याख्याने झाली. तसेच वाडिया वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एम. सी. दिक्षित 'प्रिन्सिपल्स अॅन्ड प्रॅक्टीसेस ऑफ फायनान्शिअल मॅनेजमेंट इन पब्लिक सेक्टर' या विषयावर व्याख्याने झाली.

२) औद्योगिक संस्थांना भेटी – एम कॉम पार्ट एक व दोन च्या विद्यार्थ्यांनी पुणे येथील स्टॉक एक्स्चेंजला भेट दिली व तेथील कामकाज कसे चालते त्याचा अभ्यास केला. तेथील अधिकाऱ्यांशी विद्यार्थ्यांनी विविध मुद्यावर चर्चा केली.

३) भित्ती पत्रक – संघटनेतर्फे Sudden boom on Stock exchange या विषयावर एक भित्तीपत्रक प्रकाशित करण्यात आले. पदव्युत्तर संघटनेला विद्यार्थी व वाणिज्य व अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांचे भरपूर सहकार्य लाभले.

अ. गो. गोसावी
(कार्याध्यक्ष)

## नियोजन चर्चा मंडळ

**अध्यक्ष :** प्राचार्य स. य. गंभीर
कार्याध्यक्ष : प्रा. रमेश शहा
प्राध्यापक सदस्य : प्रा. कु. वसुंधरा हिरडे, प्रा. वसंत राजगुरू
प्रा. सौ. नीता जोशी, प्रा. सौ. सुमन कौशल
विद्यार्थी प्रतिनिधी : कु. संध्या जागीरदार, श्री. विवेक तावरे
श्री. आर. यू पिंगळे
कार्यालयीन व्यवस्था : श्री. डी. एस. खोपकर

प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी नियोजन चर्चा मंडळाने खालील उपक्रम यशस्वीपणे पार पाडले.

१) शैक्षणिक भेटी :

नियोजन मंडळातर्फे खालील ठिकाणी शैक्षणिक भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या.
(अ) रुपी को-ऑपरेटिव्ह बँक, जंगली महाराज रोड शाखा, पुणे.
(ब) भगिनी निवेदिता बँक, नारायण पेठ, पुणे.
(क) 'हस्तकला प्रदर्शन', बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे.

२) व्याख्याने :

नियोजन चर्चा मंडळ आणि साहित्य संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने युवक वर्षाच्या निमित्ताने खालील

कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

(अ) श्रीमती लता भिसे यांचे 'नियोजन आणि स्त्री' या विषयावर व्याख्यान व चर्चा.

(ब) प्रा. प्र. न. परांजपे वृत्तविद्या विभाग प्रमुख, यांचे "वृत्तपत्रे आणि आपण" या विषयावर व्याख्याने व चर्चा.

(क) डॉ. सुधाकर भोसले, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ, यांचे 'आपण पुस्तके का वाचतो ?" या विषयावर व्याख्यान.

३) व्हॉट्स द गुड वर्ड स्पर्धा :

विद्यार्थ्यांकरिता ही खुली स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे संचालन प्रा. कु. वसुंधरा हिरडे यांनी केले. यात खालील विद्यार्थ्यांच्या गटाला पहिले क्रमांक मिळाले.

श्री. राजेन्द्र पिंगळे, श्री. किरण कुंभार, कु. शर्मिला कांबळे व कु. विद्या जोशी.

भित्ती पत्रके :

कु. संध्या जहागीरदार, श्री. विवेक तावरे, कु. शर्मिला कांबळे, श्री. नायडू, साधना दिवेकर, स्मिता साळवी, श्री. कुमार इत्यादी विद्यार्थ्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विविध घटकांची माहिती देणारी भितीपत्रके तयार केली.

५) वर्ष अखेरचा उपक्रम, अर्थशास्त्र विभाग, व नियोजन चर्चा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानें 'अंदाज पत्रक' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात द्वितीय वर्ष वाणिज्यच्या यलौंनी भाग घेतला. या चर्चा सत्राचे आयोजन प्रा. वसुंधरा हिरडे यांनी केले.

या सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद होता. या कार्यक्रमांच्या आयोजनात प्राचार्य स. य. गंभीर, उपप्राचार्य सीताराम रायकर, उपप्राचार्य चिरपुटकर, यांच्या प्रोत्साहनाचा वाटा होता. डॉ. पुंडे व डॉ. घायगुडे यांचे वरील कार्यक्रमात सहकार्य लाभले. संघटनेच्या कार्यक्रमात ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

प्रा. रमेश शहा

## कलामंडळ

सालाबादप्रमाणे १९८५–८६ या वर्षातसुद्धा, आमच्या कलामंडळाने निरनिराळ्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये उज्ज्वल यश मिळविले.

